कर्नाटक सरकार

# माय-मराठी

# 9

## मराठी प्रथम भाषा
## MARATHI FIRST LANGUAGE

इयत्ता नववी

©KTBS
Not to be republished

**KARNATAKA TEXT BOOK SOCIETY (R.)**
No.4, 100 Feet Ring Road, Banashankari 3rd Stage,
Bengaluru - 560 085

# PREFACE

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF – 2005 sinceJune 2010. Textbooks are prepared in 12 languages; sof them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS, mathematics and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

**NCF – 2005 has a number of special features and they are:**

- ❖ connecting knowledge to life activities
- ❖ learning to shift from rote methods
- ❖ enriching the curriculum beyond textbooks
- ❖ learning experiences for the construction of knowledge
- ❖ making examinations flexible and integrating them with classroom experiences
- ❖ caring concerns within the democratic policy of the country
- ❖ making education relevant to the present and future needs.
- ❖ softening the subject boundaries- integrated knowledge and the joy of learning.
- ❖ the child is the constructor of knowledge

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/

©KTBS Not to be republished

her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

The most important objectives of teaching language are listening, speaking, reading, writing and reference work. These skills have been given a lot of importance in all the language textbooks. Along with the inculcation of these skills, fundamental grammar, opportunities for learners to appreciate beauty and imbibe universal life values have been integrated in language textbooks. When learners master these competencies, they would stop studying textbooks for the sake of passing examinations. In order to help learners master these competencies, a number of paired and group activities, assignments and project work have been included in the textbooks. It is expected that these activities would help learner master communicative skills. Ultimately, it is expected that students master the art of learning to learn and make use of these competencies in real life.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks. A few works of some writers and poets have been included in these textbooks. The textbook society is extremely grateful to them for giving their consent for the inclusion of these pieces in the textbooks.

Place : Bangalore
Date : 1.3.2013

**Prof G S Mudambadithaya**
Coordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bangalore, Karnataka

**Y T Gurumurthy**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bangalore, Karnataka

©KTBS
Not to be republished

# मनोगत

विद्यार्थी / शिक्षक बंधूनो !

नववी मराठी प्रथम भाषा पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे.

एन.सी.ई.आर.टी.च्या 2005 च्या नव्या अभ्यासक्रमानुसार कर्नाटक पाठ्यपुस्तक संघाने अभ्यासक्रमाची रूपरेषा ठरविलेली आहे. त्यानुसार हा अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक मंडळाने तयार केलेला आहे.

हा अभ्यासक्रम तयार करताना श्रवण, भाषण, वाचन व लेखन ही जी मराठी भाषेची उद्दिष्टे आहेत त्या उद्दिष्टांना येथे प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसारच गद्यपाठ व पद्यपाठ घेण्यात आले आहेत. स्वाध्याय व उपक्रमाची रचनाही त्यास अनुसरून करण्यात आली आहे.

हा अभ्यासक्रम तयार करताना मराठी साहित्याचा ऐतिहासिक, सामाजिक, वैचारिक आणि साहित्यिक अशा सर्व दृष्टिकोनातून विचार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व संस्कारसंपन्न व्हावे यासाठी विविध स्वरूपाच्या जीवनमूल्यांचे दर्शन या पुस्तकातून त्यांना घडावे असा प्रयत्न केलेला आहे. विद्यार्थ्यांनी जीवनाकडे व समाजाकडे पाहताना वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा तसेच पर्यावरण संवर्धन, सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मता यांची जाणीव त्यांनी करून घ्यावी म्हणजे लोकशाहीला पोषक ठरणारे विचार व कृती यांना आपोआपच प्राधान्य मिळेल असे वाटते. याशिवाय प्राचीन, अर्वाचीन व आधुनिक काळातील साहित्याचाही या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

हे पाठ्यपुस्तक परिपूर्ण करण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळाने सर्वतोपरीने प्रयत्न केले आहेत. नजरचुकीने या पाठ्यपुस्तकात काही त्रुटी राहणे शक्य आहे. अशा काही त्रुटी निदर्शनास आणल्यास पुढील आवृत्तीत नक्कीच सुधारणा केली जाईल.

आपल्याला हे पाठ्यपुस्तक आवडेल असा विश्वास आहे.

–पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ

©KTBS Not to be republished

# Text Book Preparation Committee

| | | | |
|---|---|---|---|
| **Chairman** | : | | **Shri Suresh Vasantrao Patil,**<br>Jyoti Pre.University College, Belagavi. |
| **Members** | : | 1. | **Smt. Rashmi Gopalrao Kulkarni,**<br>Vidyamandir High School, Nipani,<br>Tal. Chikodi, Dist. Belagavi. |
| | | **2.** | **Shri Prabhakar Balkrishna Shimpukade,**<br>Shri G.M.Sankpal High School Shirpewadi,<br>Tal. Chikodi, Dist. Belagavi. |
| | | **3.** | **Shri Pundalik Devappa Patil,**<br>Karmaveer Bhaurao Patil High School Gojage,<br>Tal. & Dist. Belagavi. |
| | | **4.** | **Shri Sunil Mukundrao Kulkarni,**<br>R.D. High School Chikodi, Dist. Belagavi. |
| | | **5.** | **Smt. Vasanti Ram Mali,**<br>V.S.M.'s G.I.Bagewadi Boys High School Nipani<br>Tal. Chikodi, Dist. Belagavi. |
| **Scrutinizer** | : | | **Prof. Vasant Anant Kulkarni**<br>H.O.D. in Marathi<br>M.M. Arts and Commerce College,<br>Khanapur, Dist. Belagavi. |
| **Artist** | : | | **Shri Raju Shankar Bades**<br>P.J.N. High School,<br>Kalloli, Tal. Gokak, Dist. Belagavi. |
| **Chief Co-ordinator** | : | | **Prof. G. S. Mudambadithaya,**<br>Retired Joint Director,<br>Pre University Board.<br>Bengaluru. |
| **Advisors** | : | | **Sri. Narasimhaiah**<br>Managing Director<br>Karnataka Text Book Society,<br>Bengaluru - 85 |
| | | | **Sri. C. Nagamani**<br>Deputy Director<br>Karnataka Text Book Society,<br>Bengaluru - 85 |
| **Programme Co-ordinator** | : | | **Smt. Asharani. N**<br>Assistant Director, Karnataka Text Book Society,<br>Bengaluru - 85 |

©KTBS Not to be republished

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರಿಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ

©KTBS Not to be republished

ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು  ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

**(ನರಸಿಂಹಯ್ಯ)**
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

**(ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ)**
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು–85

©KTBS Not to be republished

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

**ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು**

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

**ಅಧ್ಯಕ್ಷರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

**ಸದಸ್ಯರು**

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, GI ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ. ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ. ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ, ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್. ಎಸ್. ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

**ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:**

**ಶ್ರೀ ನರಸಿಂಹಯ್ಯ** : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇಹಂತ ಬೆಂಗಳೂರು–85.

**ಶ್ರೀಮತಿ ಸಿ. ನಾಗಮಣಿ** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು–85.

**ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:**

**ಶ್ರೀಮತಿ ಆಶಾರಾಣಿ. ಎನ್.** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು–85.

©KTBS Not to be republished

# अनुक्रमणिका

## गद्य


| अ. क्र. | पाठाचे नाव | साहित्य प्रकार | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | गुराख्याचे नेत्रपतन | प्राचीन गद्य | म्हाइंभट्ट | 1 |
| 2. | राजे लोकीं बहुत सगुण असावें | आज्ञापत्र | रामचंद्रपंत अमात्य | 5 |
| 3. | पोट | लघुनिबंध | वि.स. खांडेकर | 10 |
| 4. | कर्णाचे शल्य | नाट्यउतारा | वि.वा. शिरवाडकर | 15 |
| 5. | एनाक्षीमिया आणि वाघीण | वन्यजीवन कथा | मारूती चितमपल्ली | 24 |
| 6. | ओळख | ललित लेख | शांता शेळके | 29 |
| 7. | संत पुरंदरदास | चरित्र | डॉ. प्र.न. जोशी | 35 |
| 8. | बाबाखान दरवेशी | व्यक्तिचित्र | व्यंकटेश माडगूळकर | 43 |
| 9. | वाचू आनंदे | वैचारिक लेख | डॉ. स्नेहलता देशमुख | 52 |
| 10. | उडती तबकडी आणि अफलातून टोळी | विज्ञान कथा | डॉ. जयंत नारळीकर | 58 |
| 11. | सा रम्या नगरी मास्को | प्रवास वर्णन | अश्विनी धोंगडे | 67 |
| 12. | यंत्र | दलित कथा | योगीराज वाघमारे | 73 |


©KTBS Not to be republished

# पद्य


| अ. क्र. | कवितेचे नाव | साहित्य प्रकार | कवी / कवयित्री | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|
| 1. | अभंग त्रिदल | प्राचीन पद्य | संत गोरा कुंभार<br>मुक्ताबाई, नामदेव | 80 |
| 2.◆ | सत्वर पाव ग मला | भारूड | संत एकनाथ | 86 |
| 3. | सुश्लोक वामनाचा | पंडिती काव्य | वामन पंडित | 89 |
| 4. | फटका | फटका | अनंत फंदी | 96 |
| 5. | अखंड | अखंड | महात्मा जोतीराव फुले | 100 |
| 6.◆ | प्रेमस्वरूप आई | भावकविता | माधव जूलियन | 103 |
| 7. | पोया (पोळा) | ग्रामीण कविता | बहिणाबाई चौधरी | 106 |
| 8.◆ | आचंद्रसूर्य नांदो | देशभक्ती गीत | ग.दि. माडगूळकर | 111 |
| 9. | हिरवळ आणिक पाणी | निसर्ग कविता | बा.भ. बोरकर | 114 |
| 10.◆ | सुंदर ते ध्यान | विडंबन कविता | पु.ल. देशपांडे | 118 |
| 11. | माहेराची वाट | भावकविता | इंदिरा संत | 122 |
| 12. | पाखरांनो तुम्ही | सामाजिक | रमेश तेंडुलकर<br>(मुक्तछंद) | 126 |
| 13. | जग बदल घालुनी घाव | दलित कविता | आण्णा भाऊ साठे | 130 |
| 14. | व्याकरण, लेखन,<br>शब्दसंग्रह | | | 132 |


◆अशी खूण असलेल्या कविता पाठांतरासाठी आहेत.

©KTBS Not to be republished

# १. गुराख्याचे नेत्रपतन

**म्हाइंभट्ट**

## परिचय :

म्हाइंभट्ट (मृत्यू 1303) हे महानुभावपंथाचे निष्ठावंत अनुयायी व संप्रदायाचे प्रवर्तक होते. म हानुभाव वाङ्मयातील आद्य ग्रंथकार व चरित्रकार होते. नगर जिल्ह्यातील सराळे गावचे राहणारे होते. ते पांडित्याच्या बाबतीत 'अपरसूर्यच' होते. त्यांनी श्री चक्रधरस्वामींचा अनुग्रह घेतला होता. ते त्यांचे शिष्य झाले. श्री गोविंदप्रभु हे श्री चक्रधरांचे गुरु होते. म्हाइंभट्टांना श्री गोविंदप्रभुंचे सान्निध्य लाभले होते. चक्रधरांच्या निर्वाणानंतर त्यांनी नागदेवाचार्यांच्या सहकार्याने परिश्रमपूर्वक त्यांच्या आठवणी जमा करून 'लीळाचरित्र' या ग्रंथाचे लेखन केले. त्यांनी महानुभावपंथाच्या तत्त्वज्ञानाच्या व आचारधर्माच्या प्रसारासाठीं ग्रंथलेखन केले. तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक जीवन समजण्याच्या दृष्टीने 'लीळाचरित्र' ग्रंथ महत्त्वाचा ठरतो. यात एकूण 1509 लीळा आहेत. त्यांचे 'श्री गोविंदप्रभुचरित्र' व काही 'आरत्या' असे साहित्य प्रसिद्ध आहे.

हा उतारा श्री भालचंद्र सोहनी यांनी संपादित केलेल्या 'लीळाचरित्र एकांक' या पुस्तकातून घेतला आहे. त्यातील ही 36वी लीळा आहे. लाच खाणाऱ्या गुराख्याला पळून जाताना, त्याला अडवून सर्व लोकांनी मारले. मारताना त्याच्या डोळ्याला जखम झाली. श्री चक्रधरस्वामींनी त्याचा डोळा बरा केला. एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला तर त्याला शिक्षा झाली पाहिजे. व शिक्षेबरोबर त्याच्यावर प्रेमही केले पाहिजे. ही शिकवण या लीळेतून मिळते.

### (मूल्य –दया, प्रेम)

दोही गावामध्ये वृक्षातळि आसन : खीरारी एकु दाटुनि सीवारु चारी : तयासि गांवीचे (लोकु) लांचु देतिः मग : तो गोरूवें परती : तैसेंचि तीए गावी सीवारु चारुं लागला: बोंब जाली : धावणें निगालें गोसावीं ही बीजें केलें : गोसावीं तळुसुति केली : सर्वज्ञें म्हणीतलें : हें जैसे तेयाचे आठावेठीचें पाइक : ऐंसें हें पुढां पुढां वाढीनलें : एकी वासना : खीरारीया भांडण जालें : वारितां खीरारी धरेना : आणि गोसावी चडकणा हाणौणि तेयाचा डोळा खालि पाडीला : आणि : कळि समलीं मग श्रीकरी डोळा घेउनि लावीला: श्रीमुखीचेया तांबूळाची पींड बांधलीं : डोळा निकाळ जाला : मग तेथौनि बीजें केलें ।।

## शब्दार्थ व टीपा :

■ खीरारी - गुराखी ■ दाटुन-दामटुन, घुसवून ■ सीवारु - रानात, शेतात ■ चारी - चारत असे ■ गोरूवे - गुराखी ■ परती - परत आला ■ तयासि - त्याला ■ लाचु देति - लाच देतात ■ बोंब जाली - दोन गटात

भांडण झाले ■ धावणे निगाले - (त्याला पकडायला) धावपळ सुरू झाली. ■ पींड बांधणे -जखम बांधणे ■ तळुसुति - कंबर कसून ■ पुढां पुढां - पुढे पुढे ■ वाढीनलें - पळत असता ■ बीजे करणे- जाणे ■ निकाळ जाला - बरा झाला ■ तांबूळ - विडा ■ चडकणा - हाताचा प्रहार करून ■ दामटुन - घुसकळ

## टीपा :

**लीळाचरित्र :** एकांक - यामध्ये श्री चक्रधरस्वामींच्या आठवणी लिहिलेल्या आहेत. या आठवणी एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशा तीन भागात आहेत. एकांकातील श्रीचक्रधर हे आपल्याला संसारी माणसासारखे सामान्य, रागलोभ असणारे वाटतात. जीवनातील पुत्र, पती, मित्र, खेळगडी, सेवक, कैदी, मुक्तिदाता अशा विविध नात्यांच्या अनुषंगाने त्यांचे दर्शन आपल्याला घडते. प्रथम माणूस आणि नंतर अवतार या क्रमामुळे त्यांचे व्यक्तित्व आपल्याला भावते.

**अनुवाद :** एकदा श्री चक्रधरस्वामी, गावच्या शिवेवर असलेल्या एका वृक्षाखाली बसले होते तेथे एक गुराखी चोरून आपली गुरे दुसऱ्याच्या मालकीच्या जागेत चारीत असे याबद्दल त्यास लाच मिळत असे तेव्हा गावातील दोन गटात भांडण जुंपले. त्यास पकडण्यासाठी धावपळ सुरू झाली. जणू काही श्रीचक्रधरच त्या पक्षापैकी एक होत. तो गुराखी पुढे पळत असता चक्रधरांनी कंबर कसून त्याचा पाठलाग केला व तो आटोक्यात येत नाहीसे पाहून गुराख्यास धडा शिकविण्यासाठी स्वत: चक्रधरांनी हाणामारीत भाग घेतला, त्यावेळी त्यांच्याकडून गुराख्याच्या डोळ्यास सपाटून मार बसला. डोळा कामातूनच गेला, याबद्दल वाईट वाटून लगेच त्यांनी आपल्या तोंडातील तांबूळ त्याच्या डोळ्यावर बांधून तो डोळा परत नीट करून दिला. जशास तसे वागावे पण दु:खितावर प्रेमही करावे ही शिकवण, पटवून देऊन श्री चक्रधरस्वामी पुढील मुक्कामास गेले.

## स्वाध्याय :

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) महानुभावपंथाचे संस्थापक हे होते.**

(अ) श्री गोविंदप्रभु (ब) बाईदेवबास

(क) श्री चक्रधरस्वामी (ड) म्हाइंभट्ट

**(आ) म्हाइंभट्ट येथे राहणारे होते.**

(अ) पैठण (ब) आळंदी

(क) सराळे (ड) सौंदल

**(इ) लीळाचरित्र ग्रंथात यांच्या आठवणी आहेत.**

(अ) श्रीकृष्ण (ब) श्री चक्रधरस्वामी

(क) श्री गोविंदप्रभु (ड) श्रीराम

Not to be republished ©KTBS

**(ई) 'गुराख्याचे नेत्रपतन' हा उतारा यांनी संपादित केलेल्या पुस्तकातून घेतला आहे.**

(अ) शं.गो. तुळपुळे (ब) लीना सोहनी

(क) भालचंद्र सोहनी (ड) डॉ. यू.म. पठाण

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) श्री चक्रधरस्वामी कोठे बसले होते?

(आ) श्री चक्रधरांनी कोणाचा पाठलाग केला?

(इ) गुराख्याने कोणता अपराध केला होता?

(ई) गुराख्याला शिक्षा देण्यासाठी चक्रधरांनी काय केले?

(उ) या लीळेतून कोणता संदेश मिळतो ?

**प्र.3 (रा) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) तयासि गावीचे (लोकु) लांचु देति :

(आ) आणि : कळि समलीं मग श्रीकरी डोळा घेउनि लावीला :

(इ) धावणे निगाले गोसावी ही बीजें केले :

**प्र.4 (था) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) गावात भांडण का निर्माण झाले?

(आ) चक्रधरांनी गुराख्याला पकडण्याचा प्रयत्न का केला?

(इ) चक्रधरांनी त्या गुराख्याला धडा शिकविण्यासाठी काय केले?

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) श्री चक्रधरांनी गुराख्याचा जखमी झालेला डोळा कसा बरा केला?

(आ) या पाठाचा सारांश लिहा.

**भाषाभ्यास :**

**प्रमाण मराठी भाषेत लिहा.**

(अ) दोही गावामध्ये वृक्षातळि आसन:

(ब) खीरारी एकु दाटुनि सीवारु चारू:

©KTBS Not to be republished

(क) गोसावी चडकणा हाणौणि तेयाचा डोळा खालि पाडीला:

(ड) श्रीमुखीचेया तांबूळाची पींड बांधली:

(इ) डोळा निकाळ जाला:

**उपक्रम :**

- प्रा. भालचंद्र सोहनी यांचे 'लीळाचरित्र एकांक' हे पुस्तक वाचा.
- समर्थ रामदासस्वामींच्या 'सज्जनगड' येथील मठाला भेट द्या.
- श्रीकृष्णाच्या बालक्रीडेचे वर्णन असलेले वामनपंडितांचे 'वनसुधा' हे काव्य वाचा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अनसूया | अभिजित | अधीक्षक |
| उज्ज्वल | उल्हास | अध्याहृत |

©KTBS Not to be republished

# २. राजे लोकीं बहुत सगुण असावें

**रामचंद्रपंत अमात्य**

**परिचय :**

रामचंद्रपंत नीलकंठ अमात्य (1650-1733) हे शिवकालीन मुत्सद्दी लेखक होत. त्यांचे वडील नीलकंठ उर्फ निळो सोनदेव अमात्य, हे इ.स. 1647 च्या सुमारास शिवाजी महाराजांचे अमात्य झाले. त्यांचे इ.स 1672 मध्ये निधन झाले. त्यानंतर त्यांचे चिरंजीव रामचंद्रपंतांनी छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी राजे, राजाराम यांच्या कारकिर्दीत उत्तम प्रकारे कारभार सांभाळला. शिवरायांची ध्येये व राजनीतिविषयक धोरणे पुढे चालू ठेवून धन्यास व राज्यास सांभाळण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. ते धूर्त, अनुभवी व निःस्वार्थी होते. त्यांची दृष्टी सखोल व बारकाईची होती. त्यांना 'हुकुमतपन्हा' हा किताब मिळालेला होता. इ.स. 1714 साली राजारामाचा मुलगा श्रीराम शंभु छत्रपती गादीवर आल्यावर त्यांनी रामचंद्रपंतांकडून 'आज्ञापत्र' लिहून घेतले होते.

मध्ययुगातील मराठी गद्याच्या परंपरेत 'आज्ञापत्र' हा ग्रंथ अनन्यसाधारण असा आहे. शिवाजी म हाराजांच्या राज्यकारभाराचे महत्त्व व वैशिष्ट्य समजून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त आहे. याची नऊ प्रकरणे आहेत. सर्व प्रजेचा नियंता राजा. त्याचे गुण, कर्तव्ये, कारभार, धर्मकारण, युद्ध, संरक्षण, व्यापार, सैन्य इ. विषयासंबंधीचे लेखन यात येते.

प्रस्तुत उतारा श्री प्र. न. जोशी यांनी संपादित केलेल्या 'आज्ञापत्र' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतलेला आहे. या उताऱ्यात राजाने कसे आचरण करावे, सेवकांची निवड कशी करावी यासंबंधीचे विवेचन आले आहे.

**(मूल्य : कर्तव्यनिष्ठा)**

प्रथम राजे लोकीं, सकल सृष्टि ईश्वरनिर्मित, सकलांचा नियंता ईश्वर, त्याणें निर्माण केले. जनामध्यें आपण एक परंतु पुष्कळांच्या प्रकृति भिन्न, त्यास एक नियम करून संरक्षणकर्ता नसतां परस्पर विरोध पावून नाशातें पावतील असें न व्हावें. आपली सकल प्रजा निरुपद्रव होत्साती धर्मपथप्रवर्तक असावी, या प्रजेचे करुणेस्तव ईश्वरें संपूर्ण कृपानुग्रहें आपणांस राज्य दिलें आहे, या ईश्वराज्ञेस अन्यथा केल्याने ईश्वराचा क्षोभ होईल हें पूर्ण भय चित्तांत आणून राज्यपदारूढ न होतां सर्वकाल अप्रमत्त होऊन प्रजेच्या हितकार्यी सादर असावें. तसेंच आपले लाभालाभ ईश्वराधीन आहेत, ते कोणाच्यानें अन्यथा करवत नाहींत, हा दृढ निश्चय चित्तांत आणून, सर्वकाल ईश्वरास शरण असून, अंतरंगे पराधीन न होतां सेवक लोकीं केले सेवेची अवगणना न करितां, यथान्यायें यथाधिकारें यथोचित सेवक लोकांचे मनोधारण करून वर्तावें. परंपरागत जो उत्तम,

© KTBS Not to be republished

वाडवडील आचरत आले असतील तोच धर्म आचरोन जेणेंकरून कीर्तिलाभ होय तेंच करावें, सकल कार्यांमध्ये अपकीर्तीचे भय बहुत वागवावें. ब्राह्मण, वैदिक, शास्त्रज्ञ, निस्पृह, अयाचित, वनवासी, तपस्वी, सत्पुरुष, यांचेच ठायीं परमनिष्ठा धरून जे जे जेथें असतील तेथें त्यांचे योगक्षेमाचा निर्वाह करून देऊन सर्व प्रकारें संतुष्ट करून आपले कल्याणभिवृध्दीविषयीं आशीर्वाद संपादित जावा. वेषधारी, फकीर, जोगी, जंगमादि जे केवळ भुताटकी करून फिरणारे यांचा विश्वास न धरितां, मोह न पावतां, अल्प, स्वल्प भिक्षा देऊन परभारें वाटेस लावावे. तपस्वी, शीघ्रकोपी यांचा सहवास न करितां दुरूनच त्यांचा परामृष करून ते संतोषरूप राहत, आशीर्वाद देत, तें करावें. अंध, पंगु, आतुर, अनाथ, अनुत्पन्न जे असतील त्यांचे ठायी भूतदया धरून ते जिवंत असती जों, तों त्यांचा जीवनोपाय करून देऊन चालवीत जावें.

राजेलोकांहीं निदान युध्दाव्यतिरिक्त स्वशरीरसंरक्षणांविषयीं सर्वकाळ अत्यंत सावध असावें. पाकालय, जलस्थान, फलस्थान वसनागार, आदिकरून हे नाजूक महाल, यांविरहित आणखी कारखाने यांवर जे लोक ठेवणें ते परम विश्वासु पारंपर्यसेवक अलालुची, प्रामाणिक जे असतील ते परीक्षा करून ठेवून, ज्याचा अधिकार जो असतो त्याचेच हातें घेऊन अधिकारपत्वें सकलांवर सारखा लोभ करून त्यास आपले योगक्षेमाविषयीं कोणाची अपेक्षा न पडे असा संतोष परामृष करून चालवावे.

तशीच जवळील सेवक अत्यंत विश्वासु, सुज्ञ, आपला मनोभिप्राय जाणून वर्तत, इंगितसंज्ञा जाणत, आणि शूर, दर्शनीय सलक्षणिक हतास्थ, निर्दय, आणि दुराग्रही दृष्टिचित्त नव्हत, असे परीक्षून ठेवावे. राजे लोकांस विनोदाचें व्यसन एकंदर नसावे. सुहृद झाले तरी सेवक लोक, त्यांसी विनोद करितां विनोदांत मर्यादा राहत नाही. तेव्हां आपली मर्यादा आपण उणी करून घेतली असे होतें.

आयव्यय विचार पाहून जेणेंकडून दिवसेंदिवस राज्यांत खजीना होय तें करावें. खजीना म्हणजे राज्याचे जीवन, पडले प्रसंगी खजीना असल्याने सर्व संकटांचा परिहार केला जातो. याकरितां हा अर्थ अगोदर चित्तांत आणून खजीना संग्रह करावा. याची बरी नजर करावी.

सेवकलोकांची वेतनें नेमस्त करून त्याप्रमाणें बिलाकसूर पावावीं, कार्य विशेष केल्यानें अथवा कुटुंबी असल्यानें कांही बक्षीस म्हणोन द्यावे. तऱ्हेवाईक, शेरखोर, अमर्याद, बालभाष्य, व्यसनी, कुचोद्य, कुचाळ्या करणार व एका धन्यापासून हरामखोरी करून आला असेल, असे लोक हुजरातीत एकंदर ठेवूच नयेत. राजेलोकी लहान अथवा थोर कोणी एक सेवकाचा दोष मुखें उच्चारीत जाऊं नये. आढळल्यास दुसऱ्याजवळ बोलू नये. आपल्याच चित्तांत ठेवून त्याचे परिहाराचा उपाय योजीत जावा.

**शब्दार्थ व टीपा :**

■ धर्मपथप्रवर्तक - धर्माचरण करणारी ■ नियंता - नियंत्रण ठेवणारा ■ ईश्वराज्ञेस-ईश्वराच्या आज्ञेचे ■ अन्यथा केल्याने - पालन न केल्यास ■ क्षोभ - अवकृपा ■ ऊहापोह-चर्चा ■ अप्रमत्त- नम्र

©KTBS Not to be republished

■ अवगणना - निंदा, अपमान ■ अव्याहत - सतत ■ योगक्षेम - चरितार्थ, उपजीविका ■ निर्वाह करणे - पार पाडणे ■ योगक्षेमाचा निर्वाह करणे - चरितार्थाची सोय करून देणे ■ पाकालय - स्वयंपाक घर ■ वसनागार - कपडे ठेवण्याची जागा ■ अलालुची - निर्लोभी ■ परामृष - परामर्श ■ हतास्थ - हलगर्जीपणा करणारे ■ मर्यादा - मान ■ उणी करणे - कमी करणे ■ कुचोद्य - कुचाळे करणे ■ शेरखोर - उन्मत्त ■ बिलाकसूर - बिनचूक ■ हुजरात- राजाचे खास सैन्य ■ नेमस्त करणे - नेमणूक करणे.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) 'राजे लोकीं बहुत सगुण असावे' या पाठाचे मूल्य हे आहे.**

(अ) श्रद्धा (ब) भक्ती
(क) कर्तव्यनिष्ठा (ड) मानवता

**(आ) 'आज्ञापत्र' या पुस्तकाचे संपादन यांनी केले.**

(अ) डॉ.यू.म. पठाण (ब) डॉ.वि.भि. कोलते
(क) प्र.न.जोशी (ड) ग.प्र. प्रधान

**(इ) 'आज्ञापत्रा'चे लेखन यांनी केले.**

(अ) छत्रपती शिवाजी महाराज (ब) रामचंद्रपंत अमात्य
(क) कवि भूषण (ड) कृष्णाजी शामराव

**(ई) अमात्यांना हा किताब मिळाला.**

(अ) पद्मश्री (ब) हुकुमतपन्हा
(क) शौर्यपदक (ड) सरकार

**(उ) .............. म्हणजे राज्याचे जीवन.**

(अ) खजीना (ब) जलसंपत्ती
(क) सैन्य (ड) खनिजसंपत्ती

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) मराठ्यांच्या राज्याला संकटातून कोणी निभावून नेले?
(आ) परमेश्वराने याविश्वात प्रथम कोणाला निर्माण केले?
(इ) राजाने कशाचे भय बाळगावे?

©KTBS Not to be republished

(ई) राजाने कोणाचा सहवास दुरून करावा?

(उ) राजाने कशाविषयी अतिशय सावध राहावे?

(ऊ) कोणत्या सेवकांची नेमणूक करू नये?

(ए) राजाला कोणते व्यसन असू नये ?

(ऐ) ईश्वराचा क्षोभ केव्हा होईल?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) ईश्वराने राजास का निर्माण केले?

(आ) राजाने सेवकांची नेमणूक कशी करावी?

(इ) राजाला विनोदाचे व्यसन का नसावे?

(ई) राज्याच्या खजिन्याबद्दल कोणता विचार मांडला आहे?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''राजे लोकास विनोदाचे व्यसन एकंदर नसावे.''

(आ) खजीना म्हणजे राज्याचे जीवन.

(इ) सकलकार्यामध्ये अपकीर्तीचे भय बहुत वागवावे.

(ई) 'राजे लोकी लहान अथवा थोर कोणी एक सेवकाचा दोष मुखे उच्चारीत जाऊ नये.''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) ब्राह्मण, वैदिक, शास्त्रज्ञ, सत्पुरुष इत्यादी लोकांबरोबर राजाने कसे वागावे?

(आ) पाकालय, जनस्थान, वसनागार, फलस्थान, कारखाने इत्यादी ठिकाणी नेमावयाचे सेवक कसे असावेत?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) परमेश्वराने राजालाच राज्य करण्यास का निर्माण केले?

(आ) राजाने सेवकांची नेमणूक परीक्षा करूनच का करावी?

(इ) आदर्श राजा कसा असावा?

(ई) राज्य कारभार करताना राजाने कोणत्या गोष्टी ध्यानात ठेवाव्यात असे अमात्य सुचवितात?

© KTBS Not to be republished

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

योगक्षेमाचा निर्वाह करणे, उणी करणे, नेमस्त करणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

योगक्षेम, अप्रमत्त, प्रमत्त, अवगणना, मर्यादा, निस्पृह.

**(इ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

शेरखोर, अपकीर्ती, अंध, अनाथ, विश्वास, संतुष्ट, व्यसनी.

**उपक्रम :**

- श्री प्र.न.जोशी संपादित 'आज्ञापत्र' हे पुस्तक वाचा.
- रणजित देसाई यांची श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील 'श्रीमान योगी' ही कादंबरी वाचा
- रायगडची सहल आयोजित करा.
- 'छत्रपती शिवाजी महाराज' यांच्या जीवनावर माहिती लिहा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| ऊहापोह | तज्ञ | संयुक्तिक |
| विकसित | भूमिपुत्र | अद्ययावत |

©KTBS Not to be republished

# ३. पोट

**वि.स.खांडेकर**

**परिचय :**

विष्णू सखाराम खांडेकर हे (1898-1976) प्रतिभावंत, ध्येयवादी, जीवनवादी लेखक होत. त्यांचे 'सांजवात', 'सूर्यकमळे', 'प्रातःकाल' हे लघुकथासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'दोन ध्रुव', 'उल्का', 'क्रौंच-वध', 'कांचनमृग' या गाजलेल्या कादंबऱ्या आहेत. 'चांदण्यात', 'सायंकाळ', 'वायुलहरी', 'मंजिऱ्या' हे लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच मराठीचा नाट्यसंसार, वनभोजन, गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय असे इतर लेखनही त्यांनी केले आहे. त्याग, ध्येयवाद, लोकशिक्षण, लोकरंजन ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये. 'साहित्यकार जीवनाचा भाष्यकार असतो' या सुवचनाची प्रचीती त्यांच्या कादंबऱ्या वाचताना येते. त्यांच्या 'ययाती' या कादंबरीला 1974 साली ज्ञानपीठ पारितोषिक मिळाले आहे.

'पोट' हा पाठ 'वायुलहरी' या लघुनिबंध संग्रहातून संक्षिप्त रूपात घेतलेला आहे. या पाठात लेखकाने पोट हे परमेश्वराप्रमाणे सर्वव्यापी आहे. जगाचा गाडा सुरळीतपणे चालविण्याचे श्रेय वीतभर पोटालाच आहे. असे पोटाचे महत्त्व सांगितले आहे.

**(मूल्य – जीवनवादी वृत्ती)**

''आधी पोटोबा मग विठोबा'' हे काव्य कोणत्या साधूने रचले याची नक्की माहिती मला नाही; पण या शब्दांवरच त्याचे नाव यावच्चंद्रदिवाकरौ मराठी भाषेत राहील यात शंका नाही. विठोबाचे भजन महाराष्ट्रात हजारो लोक करीत असले तरी जगातील झाडून सारे प्राणी पोटोबाच्या भजनी लागले आहेत. विठ्ठलाची आठवण व्हायला आषाढीकार्तिकीसारख्या सुट्ट्याच जागवाव्या लागतात : (या महाएकादश्यांच्या दिवशीही पोटोबांच्या पूजेकडेच बहुतेकांचे लक्ष लागलेले असते हे 'एकादशी, दुप्पट खाशी' या लोकप्रिय भावगीतावरून दिसून येईल.) पण पोटोबाची आठवण दररोज सकाळी अकरा वाजण्यापूर्वीच प्रत्येकाला होऊ लागते.

पोट हा परमेश्वर आहे हे वेदान्ताने देखील सिद्ध करता येईल. प्रत्येक प्राण्यात परमेश्वराचा अंश असतो असा आमच्या धर्मशास्त्राचा ठाम सिद्धांत आहे. आता राव-रंक, शेठ-शेतकरी, गवई-गवंडी, कवी-कपी या सर्वात सामान्यतः आढळून येणारा भाग म्हणजे पोट हाच होय. शिवाय ज्याप्रमाणे परमेश्वराचा अंत कुणालाच लागत नाही त्याप्रमाणे एखाद्याच्या पोटात काय आहे याचा पत्ता तो जिच्या मुठीत असतो त्या बायकोला देखील लागत नाही. परमेश्वर प्रलयकाळी वटपत्रावर निजण्याइतका लहान होतो; पण त्याचे खरे स्वरूप विश्व व्यापूनही उरते. पोटाचेही तसेच आहे. 'वीतभर पोटाची खळगी' अशा क्षुद्र शब्दांनी पोटेश्वराची नित्य संभावना होत असली तरी ही खळगी जगाला कधीही पुरी भरता येत नाही. परमेश्वराला पत्र, पुष्प, पाणी काहीही चालते, त्याप्रमाणे पोटालाही चहा, दूध, दारू, विष

©KTBS Not to be republished

काहीही चालते. पैसा म्हणजे विष आहे असे म्हणतात; पण या विषाची पिंपेच्या पिंपे पिऊन टाकून हालाहल प्राशन करणाऱ्या शंकराला लाजविणारे पोट न्यायाधीशांच्या साक्षीदाराच्या किंबहुना प्रसंगी कारकुनाच्या शरीराला देखील कधी कधी चिकटलेले आढळून येते.

पोट परमेश्वर आहे असे म्हणण्यापेक्षा ते परमेश्वरापेक्षा अधिक श्रेष्ठ आहे असे म्हणणेच सयुक्तिक होईल. या जगात परमेश्वराचे अस्तित्व न मानणारे हरीचे लाल (त्यांना हरीचे लाल कसे म्हणावयाचे? सृष्टीचे सखे, निसर्गाचे भक्त. असे काहीतरी नाव द्यावे झाले.) जगात थोडे तरी आढळतील. पण पोटाचे अस्तित्व अमान्य करणारा महात्मा अद्याप झाला नाही व पुढे होणेही शक्य नाही. अर्धांगीला टाकून देणाऱ्या मनुष्यालाही आपले पोट टाकून देता येत नाही. संन्यासी संसार, भिकारी लाज, गर्भश्रीमंताची पोरे शाळा व देशभक्त भीती सहज सोडून देतात; पण पोट मात्र कुणालाही सोडता येत नाही. उलट विद्या दिल्याने जशी दुप्पट होते त्याप्रमाणे पोट सुटले की, त्याची पकड पूर्वीपेक्षा अधिक घट्ट होते. पोट परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे याचा मला लहानपणी आलेला अनुभव येथे नमूद करणे अयोग्य होणार नाही.

अस्मादिकांच्या मनात त्या दिवशी शाळेला जावयाचे नव्हते. कुणीतरी बडा पुरुष मरण पावल्याची बातमी कानावर येईल म्हणून मी नऊ वाजेपर्यंत वाट पाहिली; पण मृत्यूला काही माझी दया आली नाही. मुसळधार पाऊस पडू लागला तर आई मला शाळेत जाऊ देणार नाही हे मला माहीत होते; पण मी गच्चीवर जाऊन चातकाप्रमाणे आकाशाकड़े पाहू लागलो तरी एकही मेघ माझ्याकडे वळला नाही. निर्वाणीचा उपाय म्हणून बाबांच्या खिशातील एक पैसा हळूच काढला व तो मुठीत घेऊन देव्हाऱ्यातल्या देवाला गाऱ्हाणे घातले. पण देवही कंट्रोलच्या वेळच्या अधिकाऱ्याप्रमाणे थोड्याशा रकमेवर खूष होईना. मला वकिलीत पाण्यासारखा पैसा मिळू लागल्यावर मी त्याची संततधार तुझ्या डोक्यावर धरीन असा नवस करण्याचा उदारपणाही मी दाखविला; पण व्यवहारचतुर व्यापाऱ्याप्रमाणे देव या उधारीच्या सौद्याला कबूल झाला नाही. दहा वाजून गेले. आता काय करावे हा मोठा प्रश्न माझ्यापुढे पडला. इतक्यात माझे पोट माझ्या मदतीला धावून आले. स्वतः दुखू लागून त्याने माझे सुख साधून दिले. त्या आनंदाच्या भरात 'पोटा, थोर तुझे उपकार' म्हणून मी गाऊही लागलो, माझा आवाज विशेष चांगला नसल्यामुळे पोटदुखीने मी रडत आहे असा आईला भास झाला आणि माझे हे स्फूर्तिजन्य काव्य बाहेर फुटले नाही.

डोके, डोळे, ओठ वगैरेंच्या मानाने पोटाची योग्यता कितीतरी मोठी आहे. पण कवी लोक वेडे असल्यामुळे अद्याप एकाही प्राण्याने पोटावर काव्य रचले नाही. तसे पाहिले तर पोटाकडे पाहिले म्हणजे कितीतरी चमत्कृतिजनक कल्पना सुचतात. ते पुढच्या बाजूला दिसत असले तरी नेहमी पाठीमागे लागलेले असते. पोट हा हृदयापेक्षाही मनुष्याच्या शरीराचा नाजूक भाग आहे. प्रसंगी मनुष्य हृदयभेदक शब्द आनंदाने सोशील; पण पोटाला नुसता चिमटा बसला की, तो कळवळून आकांत केल्याशिवाय राहात नाही. पोट नसते तर कचाला मद्यातून शुक्राचार्यांच्या पोटात जाता आले नसते, देवांना संजीवनी विद्येचा उपयोग झाला नसता व सारे जग राक्षसांनी भरून गेले असते. पोटाचे जगावर केवढे उपकार झाले आहेत हे!

©KTBS Not to be republished

पोट नसते तर? पोट नसते तर काय झाले असते याची कल्पना करणे कालिदासासारख्या कवीलासुद्धा कठीण जाईल. पोट नसते तर शाळा वाढविण्याऐवजी शाळा बंद करण्याचे ठराव पसार झाले असते! पोट नसते तर रोगी मरायला टेकला असतानाही डॉक्टर बिझिकच्या खेळातील राजाराण्यांची लग्ने लावण्यात दंग झाले असते. पोटाचा पाश नसता तर अशिलाचा गळा फासात सापडेल म्हणून वकिलांनी मुळीच धावपळ केली नसती! पोटाच्या अभावी खाणावळी, उपाहारगृहे, आचारी हे नामशेष झाले असते!

पोट नसते तर कुटुंबात काय दाणादाण उडाली असती हे पाहणे मोठे गमतीचे आहे. नवऱ्यांनी नोकऱ्यांना व बायकांनी नवऱ्यांना सोडचिठ्ठ्या दिल्याची दृश्ये पदोपदी दृष्टीला पडली असती. घरातील चूल नेहमी थंड असल्यामुळे कमी झालेली उष्णता परस्परांवर धुमसणाऱ्या आप्तेष्टांना भरून काढावी लागली असती. मुलांनी नोकरी लागेपर्यंत अगर मुलींनी लग्न होईपर्यंत आईबापांच्या हुकमतीत राहण्याची आवश्यकताही उरली नसती. सारांश, अराजक राज्याप्रमाणे कुटुंबात व समाजात पोटाच्या अभावी बेबंदपातशाही माजली असती. जगाचा गाडा सुरळीत चालविण्याचे श्रेय जर कुणाला असेल तर ते धर्म, कायदे वगैरे मोठ्या नावाच्या मंडळीपेक्षा वीतभर पोटालाच आहे.

पोट नसते तर आणखी एक मोठा अनर्थ जगावर ओढवला असता! प्रत्येक गावाला कविमंडळे उत्पन्न होऊन त्यांची परस्परांत युध्दे झाली असती! दुष्काळात मरणाऱ्या माणसाऐवजी कवितांनी गुदमरून जाणाऱ्या माणसांचे देखावे जगाच्या दृष्टीला पडले असते! अमुक ठिकाणी पाऊस किती इंच पडला याऐवजी अमुक कवीची वाक्ये किती मैल लांब, रुंद व उंच आहेत याविषयीची बातमी अधिक महत्त्वाची वाटली असती.

पण 'पोटोबा' ने अवतार घेतल्यामुळे या सर्व भयंकर आपत्तीतून जगाची मुक्तता झाली आहे. असे असूनही 'पोट जाळण्याच्या' गोष्टी लोक बोलत असतातच! लोकांनी एवढे लक्षात ठेवावे की, शस्त्रक्रियेसाठी पोट फाडले तरी ते मरत नाही. पोट जाळण्यासाठी कुणी स्वाभिमानावर निखारा ठेवला तरी त्याची राख होत नाही. उजाडले हे दाखविण्यासाठी ज्याप्रमाणे सूर्य त्याप्रमाणे माध्यान्हकाल दाखविण्यासाठी ते नेहमी राहणारच!

## शब्दार्थ व टीपा :

■ ठाम - दृढ ■ राव - राजा ■ रंक -गरीब ■ कपी - वानर, प्राणी ■ वटपत्र -वडाचे पान ■ वट - वडाचे झाड ■ पत्र - पान ■ खळगी - खड्डा ■ संभावना होणे - निंदा होणे ■ हालाहल - एक प्रकारचे भयंकर विष ■ प्राशन करणे - पिणे ■ सयुक्तिक - योग्य ■ अर्धांगी - पत्नी ■ निर्वाणीचा - शेवटचा प आकांत करणे - ओरडणे ■ हुकमतीत राहणे - धाकात राहणे ■ हुकमत - धाक, वर्चस्व ■ बेबंदपातशाही माजणे - अराजकता माजणे, गोंधळ माजणे ■ अनर्थ - संकट ■ आपत्ती - संकट ■ निखारा - विस्तव ■ नमूद करणे- लिहून ठेवणे ■ यावच्चंद्रदिवाकरौ - सूर्य चंद्र असे पर्यंत, कालातीत

©KTBS Not to be republished

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) जगातील सारे प्राणी यांच्या भजनी लागले आहेत.**

(अ) विठोबा (ब) संपत्ती

(क) पोटोबा (ड) लक्ष्मी

**(आ) प्रलयकाळी परमेश्वराचे स्वरूप कसे असते?**

(अ) विराट (ब) भयंकर

(क) वटपत्रावर निजण्या इतके लहान (ड) रौद्र

**(इ) 'एकादशी ........ '**

(अ) उपाशी रहाशी (ब) भजन करशी

(क) देवाला जाशी (ड) दुप्पट खाशी

**(ई) देवांना संजीवनी विद्येचा उपयोग झाला नसता तर सारे जग कशाने भरून गेले असते?**

(अ) सोन्याने (ब) राक्षसांनी

(क) माणसांनी (ड) प्राण्यांनी

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) माणसाला रोज पोटाची आठवण केव्हा होते?

(आ) विश्वाला व्यापूनही उरणारे खरे स्वरूप कोणाचे असते?

(इ) पोटेश्वराची संभावना कोणत्या शब्दात केली जाते?

(ई) मनुष्याच्या शरीराचा अतिशय नाजूक भाग कोणता?

(उ) कवी लोक वेडे आहेत असे लेखक का म्हणतो?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पोट नसते तर आणखी कोणते मोठे अनर्थ ओढवले असते?

(आ) लोकांनी पोटाच्या बाबतीत कोणती गोष्ट लक्षात ठेवावी असे लेखकाला वाटते?

(इ) पोटाचे जगावर कोणते उपकार झाले आहेत?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'पण त्याचे खरे स्वरूप विश्वव्यापूनही उरतो. पोटाचेही तसेच आहे.'

(आ) 'पण पोट मात्र कुणालाही सोडता येत नाही.'

(इ) 'पोटा, थोर तुझे उपकार' म्हणून मी गाऊही लागलो.'

©KTBS Not to be republished

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

अ) पोट परमेश्वर आहे हे लेखकाने कसे सिद्ध केले आहे?

आ) पोट नसते तर कुटुंबावर त्याचा कसा परिणाम झाला असता?

(इ) पोट नसते तर शाळा, रोगी, वकील, आचारी व खाणावळी यावर कोणता परिणा झाला असता?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) पोट परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे यासाठी लेखकाने सांगितलेल्या स्वत:च्या अनुभवाचे वर्णन करा.

(आ) पोट परमेश्वरापेक्षा श्रेष्ठ आहे हे पटवून देण्यास कोणती उदाहरणे दिली आहेत.

**भाषाभ्यास :**

**(अ) शब्दाचा व वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

संभावना होणे, खळगी, प्राशन करणे, ठाम, आकांत करणे, हुकमतीत राहणे, नमूद करणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

राव, रंक, पत्र, पुष्प, पाणी, दूध, दया, लहानपण.

**(इ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

अंत, आठवणे, श्रेष्ठ, अमान्य, देव.

**उपक्रम :**

- वि. स. खांडेकरांचा 'वायुलहरी' हा लघुनिबंध संग्रह वाचा.
- 'आधी पोटोबा, मग विठोबा' कल्पना विस्तार करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अग्निपरीक्षा | पीतांबर | शिवून |
| बधिर | हरिणी | मध्यांतर |

©KTBS Not to be republished

# ४. कर्णाचे शल्य

**वि.वा.शिरवाडकर**

**परिचय :**

विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज हे (1912-1999) मराठीतील प्रतिभासंपन्न ज्येष्ठ कवी, नाटककार, कादंबरीकार व ललितलेखक म्हणून ओळखले जातात. मानवता, बंधुता, स्वातंत्र्य, समता आणि न्याय ही त्यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांचा अग्नीसंप्रदायी कवी म्हणून गौरव केला जातो. त्यांचे 'विशाखा', 'जीवनलहरी', 'हिमरेषा', 'वादळवेल', 'किनारा', 'स्वगत', 'मराठी माती', 'प्रवासी पक्षी', 'मुक्तायन' इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. 'नटसम्राट', 'कौंतेय', 'ययाती आणि देवयानी', 'वीज म्हणाली धरतीला', 'चंद्र जिथे उगवत नाही,' 'दूरचे दिवे' इ. त्यांची नाटके आणि 'कल्पनेच्या तीरावर', 'जान्हवी', 'वैष्णवी' इ. कादंबऱ्या असे विविध प्रकारचे साहित्य प्रसिद्ध आहे. 1964 मध्ये मडगाव येथे झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 1988 चा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

'कौंतेय' या नाटकातून हा पाठ घेण्यात आला आहे. या पाठात अर्जुन आणि कर्ण यांचा युद्धप्रसंग, कर्णाच्या मनात निर्माण झालेले प्रश्न आणि कुंतीविषयी असणारे कर्णाचे प्रेम आणि जांघिलाची स्वामीनिष्ठा व्यक्त होते.

**(मूल्य – निष्ठा–प्रेम)**

(त्याच दिवसाची सायंकाळ. कुरुक्षेत्राचा एक भाग. एका बाजूस कर्णाचा रथ असून त्याचे एक चाक जमिनीत खोलवर रूतलेले आहे. योद्ध्याच्या वेषात असलेला कर्ण ते चाक उपसून काढण्याचा यत्न करीत आहे.)

जांघिल : (प्रवेश करीत- रक्तानं माखलेला) महाराज - स्वामी -

कर्ण : कोण जांघिल ? जांघिल, तिथेच उभा रहा. माझ्याजवळ येऊ नकोस. शत्रू या स्थळावर बाणांचा आणि अस्त्रांचा वर्षाव करीत आहे ! भावाच्या पराजयानं संतप्त झालेला अर्जुन तीन वेळा सिंहासारखा माझ्यावर तुटून पडला. तीन वेळा मी त्याला लीलेनं मागं परतवलं आहे. पण पृथ्वीनं पांडवांचा पक्ष घेऊन माझ्या रथचक्राचा अधाशीपणानं घोट घेतला आहे. शल्यमहाराज माझी सेना घेऊन शत्रूला अडविण्यासाठी अग्रभागी गेले आहेत ! पण- जागेवरचा मारा कमी झालेला नाही. हे चक्र बाहेर निघेपर्यंत कुणीही माझ्याजवळ येऊ नका.

जांघिल : महाराज, मला आता मृत्यूची भीती उरलेली नाही!

कर्ण : म्हणजे ?



©KTBS Not to be republished



जांघिल : स्वामी, मी अगोदरच मेलो आहे, मेल्यासारखाच आहे ! सात्यकीशी लढताना त्याचे बाण लागून माझ्या छातीची चाळणी झाली आहे. फुटून गेली आहे ती ! पण महाराज, मी आनंदात आहे ! सात्यकीच्या सेनेचा चुराडा करून मी मरता मरता त्यालाही पिटाळून लावलं आहे ! आपल्या अंगावर तो चढाई करू पहात होता. म्हटलं जांघिलाच्या प्रेतावर पाय ठेवल्याशिवाय तुला कर्णराजांपर्यंत पोचता यायचं नाही ! महाराज, आपल्यासारख्या देवमाणसाची सेवा करण्याचं भाग्य मला लाभलं! भाग्याचं जीवन लाभलं, आता भाग्याचं मरण मिळतं आहे! आता एकदा आपल्या पायांवर- आपल्या पायांवर-

कर्ण : (पुढे जाऊन) पायांवर ? जांघिला, अरे खरी देवमाणसं तुम्ही ! किती सहजपणानं, किती उदारपणानं तुम्ही जिवाचं दान देता! ये मित्रा, तुझी जागा माझ्या हृदयाजवळ आहे. पायाशी नाही!

(दोघेही भेटतात)

जांघिल : महाराज, मी धन्य झालो. शेवटची एक विनंती आहे. आग्रहाचं मागणं आहे.

कर्ण : कोणती विनंती - कसलं मागणं ?

जांघिल : आपण विरथ झाला आहात. आपण ताबडतोब माघारी जा. या ठिकाणी चाक उपसून काढण्याच्या नादामध्ये राहू नका! अर्जुन पुन्हा आपल्यावर चढाई करण्याच्या तयारीनं येत आहे. पण अजून वेळ आहे! आपण विरथ, निःशस्त्र आहात ही वार्ता सर्वत्र पसरली

©KTBS Not to be republished

आहे. धर्माधर्माची तमा न बाळगता अर्जुन आपल्यावर निकराचा हल्ला केल्याशिवाय राहणार नाही! म्हणून आग्रहाचं सांगण आहे, आपल्या आवडत्या सेवकाचा शेवटचा हट्ट आहे. आपण परत जा-आपण परत जा-

कर्ण : ज्या मागण्या पुऱ्या करता येत नाहीत त्याच ऐकायचं सध्या कर्णाच्या नशिबी आलं आहे!

जांघिल : स्वामी, मला जास्त बोलवत नाही. - आपण परत जा-

कर्ण : (हसतो) परत जाऊ? आणि परत जाऊन काय करू? जांघिला, तुझी छाती फुटली आहे, माझं कपाळ फुटलं आहे! मी लढतो आहे खरा. पण मला काहीही सुचत नाही, उमजत नाही, माझी शस्त्रविद्या देखील मला आठवेनाशी झाली आहे. पण आता माघारी जाणं शक्य नाही!

जांघिल : महाराज, माझी शपथ आहे! आजपर्यंत आपल्याजवळ कधी काही मागितलं नाही. हे एकच मागतो आहे. युद्ध अजून आपल्या बाजूचं आहे. आपण जिवंत राहाल तर कौरवांच्या पक्षाचा, आपल्या पक्षाचा, निश्चितच विजय होईल -

कर्ण : आपला पक्ष? कोणता पक्ष माझा! जांघिल, माझा पक्ष कोणता याचीच मला भ्रांत पडली आहे. शेजारी मित्र आहेत. आणि समोर भाऊ आहेत- कोणता पक्ष माझा?

जांघिल : महाराज, आपण हे काय बोलत आहात? आपण बेचैन आहात, उद्विग्न आहात, आपण शिबिरात माघारी जा -

कर्ण : नाही, जांघिल, वीराचं मस्तक तुटलं तरी त्याचा नुसता हात क्षणभर शस्त्र परजीत राहतो. लढणं हाच एक कर्णाचा धर्म आहे. या धर्मापासून मी परावृत्त होणार नाही. आणि कशासाठी होऊ ? मला प्रकाश दिसतो आहे तो फक्त मृत्यूच्या दिशेलाच. मी लढता लढता मरेन. माझ्या मित्राच्या ऋणाची भरपाई करता करता मरेन. एवढ चाक मात्र-

जांघिल : महाराज, हे चक्र रथाचं नाही, दुर्दैवाचं चक्र आहे ते! - आपण नाही ऐकत - महाराज, आपला निरोप घेतो मी. परमेश्वर आपल्याला - (मरतो).

कर्ण : जा, जांघिल, सुखानं जा - होय, तू म्हणालास ते खरं आहे! हे चक्र दुर्दैवाचंच आहे, क्षमाशील, सर्वांना पोटाशी धरणारी म्हणून या धरित्रीचा लौकिक-पण तीही कर्णाशी वैर धरून त्याचा घात करायला सिद्ध झाली!
(दूरवर अस्त्रांचा लखलखाट दिसतो व रथांचा आवाज ऐकू येतो.)

कर्ण : नाही ! मी असा पराभव पत्करणार नाही ! हे रथचक्र बाहेर निघालं तर अजूनही मी पार्थाचा वध केल्याशिवाय राहणार नाही! पार्थाचा-कुंतीच्या आवडत्या अर्जुनाचा वध! अर्जुनाला मारून तू आईच्या समोर गेलास तर ती तुला जवळ करील का? कर्णही तिचा मुलगा असला तरी तो दुरावलेला आहे- अर्जुन तिच्या पदराखाली वाढलेला - अर्जुनाचं दुःख तिला अधिक होईल- पण मी राजेश्वराला वचन दिलं आहे,- कुंतीच्या अश्रुंची मी कदर करणार नाही.

©KTBS Not to be republished

(चाक उपसू लागतो. रथांचा आवाज जवळ ऐकू येतो. शंखांचे रणवाद्यांचे आवाज ऐकू येतात - बाणांचा व अस्त्रांचा वर्षाव होतो, रंगभूमीवरील प्रकाश अंधुक होत जातो.)

कर्ण : आला! - माझा भाऊ - माझा पराक्रमी शत्रू जवळ येऊन ठेपला! (मोठ्याने) थांब अर्जुना, एक घटकाभर थांब! तू वीर आहेस, कुंतीचा मुलगा आहेस ! तू शत्रूवर अधर्मानं आघात करणार नाहीस! थांब, मी संकटात आहे! मी तुला भ्यायलो नाही, कर्ण कुणालाही भिणार नाही - पण हे चाक वर निघेपर्यंत मला अवसर दे - मला रथारूढ होऊ दे - मला सशस्त्र होऊ दे - अर्जुना, अधर्मानं लढू नकोस-

(रंगभूमीवर पूर्ण काळोख होतो. त्या काळोखात शस्त्रास्त्रांच्या प्रकाशरेषा विजांप्रमाणे लखलखतात.)

कर्ण : थांब, अर्जुना, तुझ्या वीर वृत्तीला लांछन लावू नकोस -

(एक आवाज : (सहास्य) अर्जुना! हीच वेळ आहे! हा कर्ण धर्मयुद्धात अजिंक्य आहे! पृथ्वीनं त्यांच रथचक्र गिळून तुला आज अखेरची संधी दिली आहे. कर, बाणांचा, अस्त्रांचा वर्षाव कर ! -)

कर्ण : श्रेष्ठ पांडवा, अधर्माचा आश्रय करू नकोस !

(एक आवाज : अधर्म ? अधर्मा, आज तुला धर्माचं स्मरण झालं काय? उन्मत्तांनो, धर्म हा शब्द उच्चारण्याची तरी तुमची पात्रता आहे काय? हा आमचा अधर्म नाही. तुम्ही सर्पाप्रमाणं पोसलेला हा तुमचाच अधर्म आज तुमचा नाश करीत आहे! पार्था, अस्त्रांचा वर्षाव कर! लाक्षागृहात पांडवांना जाळण्याचं कारस्थान करताना हा धर्म तुम्हांला आठवला नाही! द्यूतामध्ये असत्याचा आश्रय घेताना तुम्हांला धर्माचं स्मरण झालं नाही! भर राजमंडळात पांचालीच्या निरीला हात घालताना तुम्ही धर्माचा विचार केला नाही! तुम्ही पावलोपावली लाथाडलेला धर्म आता तुमचं रक्षण करील काय? अर्जुना, कसलाही विचार करू नकोस- या सुवर्णसंधीचा फायदा घे आणि या गर्वाढ्य सूतपुत्राचा नायनाट कर! )

कर्ण : म्हाताऱ्या विधवांप्रमाणे गतगोष्टींचा डांगोरा पिटणाऱ्या वीरांनो तुम्हांला कर्णाचे प्राणच हवे आहेत ना? घ्या, खुशाल घ्या! हा महारथी कर्ण - हा धर्मनिष्ठ कर्ण - उघडया छातीनं तुमच्या पुढं उभा आहे. कर्णाचा प्राण घ्या, पण कौरवांच्या अधर्माबद्दल आक्रोश करू नका! धर्म हा शब्द उच्चारण्याचा अधिकार तुमच्यापेक्षा कौरवानांच अधिक आहे! कौरव अभिमानानं वागले, अधर्मानं वागले नाहीत. भीष्म, द्रोणासारख्या श्रेष्ठ महात्म्यांचे अधर्मानं, असत्यानं खून पाडून तुम्ही जो पापाचा डोंगर रचला आहे. त्यापुढं लाक्षागृहाच्या आणि द्यूताच्या शेळपट गोष्टींची काय कथा? आई ग-मारा, कर्णालाही अधर्मानंच मारा ! कर्णाचा पराभव फक्त अधर्मच करू शकेल! दुर्योधना, मी तुझ्यासाठी - आई ! मारा -मारा - हाय!

©KTBS Not to be republished

(रथाजवळ कोसळून पडतो. रंगभूमीवर एकदम पूर्ववत प्रकाश पडू लागतो. पडद्यात कोलाहल : पडला! कर्ण पडला! - महारथी कर्णाचा निःपात झाला! - शाबास पार्था, शाबास! शाबास कर्णा, वीरासारखा लढलास - पूर्ण प्रकाश. एका बाजूने कुंती धावत येते व कर्णाचे मस्तक मांडीवर घेते. दुसऱ्या बाजूने भीम, अर्जुन व नकुल प्रवेश करतात.)

कुंती : बाळ, मी तुझ्यासाठी धावत आले होते रे! पण उशीर झाला!

भीम : महारथी कर्णाचा निःपात झाला! कौरवांचा सेनापती, कौरवपक्षाचा आधारस्तंभ कोसळून पडला! आई, तू इथं रणांगणावर कशी? आणि हे काय?

कुंती : भीमा, कौरवांचा सेनापती गेला नाही. दुर्योधनाचा मित्र गेला नाही! माझा कर्ण गेला! माझा मुलगा गेला! भीमा, अर्जुना, तुमचा थोरला भाऊ गेला रे!

अर्जुन : थोरला भाऊ? काय म्हणतेस आई हे?

कुंती : होय, थोरला भाऊ! मीच त्याचा जन्मापासून त्याग करणारी, त्याची हरपलेली आई. मीच चांडाळणीनं त्याला जन्म दिला! आणि आज त्याला मरणही दिलं!

कर्ण : आई, तू सर्वांना सांगितलस? मी थोरला भाऊ हे पांडवांना सांगितलस आई-आई- माझ्यासाठी तुला किती यातना भोगाव्या लागल्या असतील गं! माझ्या आईला मी दुःखी कष्टी केलं हे एवढं एकच दुःख मला आहे, बाकी काही नाही -

कुंती : बाळ, माझ सारं दुःख या क्षणाला नाहीसं झालं आहे! तुझ्यासारख्या महावीराला मी जन्म दिला एवढंच समाधान, एवढाच अभिमान शिल्लक राहिला आहे आता.जा, लाडक्या, सुखानं, शांततेनं जा बरं! कसलंही दुःख मनात ठेवू नकोस. या दांभिक जगात तुझी मानखंडना झाली. तुला अघोर आपत्ती सोसाव्या लागल्या. पण कुरुक्षेत्रातील कोणत्याही वीराला लाभणार नाही असं पुण्य तुझ्या पदराशी आहे. स्वर्गाच्या वेशीमध्ये उभा राहून प्रत्यक्ष परमेश्वर तुझी वाट पाहात असेल. बाळ, माझे-तुझ्या आईचे अखेरचे आशीर्वाद घेऊन जा-

कर्ण : अमृताचा-अमृताचा अभिषेक होत आहे अंतःकरणावर! साऱ्या जखमा भरून गेल्या. सगळ्या वेदना नाहीशा झाल्या! आई, मी सुखानं जातो आहे. अशा सुखाच्या मरणासाठी दुःखानं भरलेली शंभर आयुष्य पत्करायला मी तयार आहे. आई, माझ्या वैऱ्यांकडून मी मारला गेलो नाही. कोणताही शत्रू मला पराभूत करू शकला नसता. मला माझ्या भावांनी-माझ्या लाडक्या पराक्रमी भावांनी मारलं! त्यांना म्हणावं, हे कळल्यावरती दुःख करू नका!

©KTBS Not to be republished

अर्जुन : दु:ख करू नका! आई, काय झालं माझ्या हातून हे? कुरुक्षेत्रावरील हा सर्वश्रेष्ठ वीर, हा महारथी कर्ण, हा अलौकिक महात्मा. आमचा भाऊ आणि या करंट्या हातांनी मी त्यांचा वध केला, आणि तोसुध्दा अधर्मानं! आई, हे आधी का नाही सांगितलंस ?

भीम : मातृहत्येचं पातक पत्करूनसुद्धा या गदेनं तुझ्या मस्तकाचा चुराडा करून टाकावा असं वाटतय मला!

अर्जुन : दादा -

भीम : काय केलंस हे! हा कर्ण आमचा भाऊ आहे हे अगोदर ठाऊक असतं तर साऱ्या पृथ्वीचं राज्य मिळवून ते आम्ही त्याच्या पायावर वाहिलं असतं; नाही-पृथ्वीच्या राज्यावरही लाथ मारून आम्ही त्याच्या पायाची सेवा करीत बसलो असतो!

कर्ण : भीमा, अर्जुना, आपल्या आईला कुणीही काही टाकून बोलू नका! दु:खाचा डोंगर तिनं-आयुष्यभर छातीवर बाळगला आहे! तुम्ही कोणीही कष्टी होऊ नका. मला तुमच्या हातून मरण येत आहे हे माझं मोठं भाग्य आहे. शेवटी-अगदी शेवटच्या घटकेला का होईना, पण माझी आणि भाग्याची गाठ पडली. माझ्या आईच्या मांडीवर मी पडलो आहे -माझे लाडके भाऊ माझ्याजवळ उभे आहेत! आई-आई - जातो मी-माझा दुर्योधन कुठे आहे? त्यानं मला जन्मोजन्मीचं ऋणी केलं आहे-त्याला माझे प्रणाम सांगा-आई, मी तुझा मुलगा-तुझा कर्ण

(मरतो)

कुंती : कर्णा! माझ्या बाळा -

(पडदा)

**शब्दार्थ :**

■ करंटा-अभागी ■ तमा-पर्वा ■ लांछन - कलंक ■ अस्त्र-मंत्रोच्चाराने उगारण्याचे आयुध (हत्यार) ■ अधाशीपणे - हावरटपणे ■ विरथ- रथहीन ■ निकराचा हल्ला- शर्थीचे आक्रमण ■ शस्त्रविद्या- हत्यार चालविण्याची विद्या ■ ऋण- उपकार ■ वध- ठार मारणे ■ गर्वाढ्य- अहंकारी ■ सूतपुत्र- सारथ्याचा मुलगा ■ दांभिक- खोटा दिखाऊपणा, अहंकार ■ मानखंडना- अपमान ■ कुरुक्षेत्र- युद्धभूमी ■ अधम- नीच ■ अधर्म- धर्माला सोडून ■ भ्रांत- साशंक, घोटाळ्यात पडलेला ■ उद्विग्न- हताश ■ बेचैन- अस्वस्थ, उदास

©KTBS Not to be republished

**टीपा :**

■ कर्ण-कुंतीला कुमारीका अवस्थेत दिव्य मंत्राच्या सहाय्याने सूर्यापासून झालेला पुत्र. पाच पांडवांचा सवर्ात मोठा भाऊ परंतु तो एका सारथ्याने व त्याच्या राधा नावाच्या पत्नीने सांभाळला म्हणूनच तो आयुष्यभर सूतपुत्र म्हणून ओळखला गेला.

■ जांधिल-कर्णाचा स्वामीनिष्ठ सेवक ■ एक आवाज-श्रीकृष्णाच्या उपदेशाची आठवण आवाजाच्या रूपात ■ कुंती-पंडुराजाची पत्नी, पाच पांडवांची व कर्णाची माता.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) पृथ्वीने कोणाचा पक्ष घेतला ?**

(अ) कौरवांचा (ब) पांडवांचा
(क) कुंतीचा (ड) कृष्णाचा

**(आ) विरथ व नि:शस्त्र कोण झाले होते?**

(अ) शल्य (ब) जांधिल
(क) दुर्योधन (ड) कर्ण

**(इ) उदारपणाने जीवाचं दानं देणारा खरा देवमाणूस कोण?**

(अ) भीष्म (ब) अर्जुन
(क) जांधिल (ड) सात्यकी

**(ई) मातृहत्येचं पातक पत्करण्यासही तयार व्हावे असे कोणास वाटते?**

(अ) अर्जुन (ब) कुंती
(क) भीम (ड) कर्ण

**(उ) कुंतीने, कर्णबाळास जन्माला घालताच काय केले?**

(अ) पदराखाली घेतले (ब) वात्सल्याने पाहिले
(क) त्याग केला (ड) आपल्यासोबत नेले

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) कर्णाला कशाची भ्रांत पडली होती?

(आ) जांधिल कोणाचा सेवक होता?

©KTBS Not to be republished

(इ) कौरवांचा आधारस्तंभ कोणाला म्हटले आहे?

(ई) कर्णाचा वध कोणी केला?

(उ) पांडवांच्या मातेचे नाव काय?

(ऊ) जांघिलाने कोणाच्या सेनेचा पराभव केला?

(ए) कर्णाचे शल्य कोणते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कौरवांनी कोणते कारस्थान केले होते?

(आ) जांघिलाच्या छातीची चाळणी कोणी व का केली?

(इ) कर्ण विरथ का झाला?

(ई) कर्णाच्या मृत्यूनंतर भीमाने आपला संताप कसा व्यक्त केला आहे?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'तुझी जागा-माझ्या हृदयाजवळ आहे, पायाशी नाही!'

(आ) 'आई गं-मारा, कर्णालाही अधर्मानंच मारा!'

(इ) माझा कर्ण गेला! माझा मुलगा गेला!

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) कौरवांनी कोणता अधर्म केला होता?

(आ) जांघिलाने कर्णाला शेवटी कोणती विनंती केली?

(इ) एका आवाजाने अर्जुनास कोणता संदेश दिला?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) कर्णाची स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

(आ) कुंतीच्या स्वभावाची वैशिष्ट्ये लिहा.

(इ) जांघिलाची व्यक्तिरेखा रेखाटा.

©KTBS Not to be republished

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

तुटून पडणे, भ्रांत पडणे, बेचैन होण, उद्विग्न होणे, मानखंडना होणे, कदर करणे, डांगोरा पिटणे

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

सर्प, दुःख, मृत्यू, चक्र, लांछन

**(इ) खालील शब्दांचे संधी सोडवा**

राजेश्वर, निःशस्त्र, निःपात, परमेश्वर, महात्मा

**(ई) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा**

रथचक्र, असत्य, सूतपुत्र, महारथी, अधर्म, सर्वश्रेष्ठ, महात्मा

**(उ) खालील ओळीतील अलंकार ओळखा**

(अ) काळोखात शस्त्रांच्या प्रकाशरेषा विजांप्रमाणे लखलखतात

(आ) हे रथाचे चक्र नव्हे! दुर्दैवाचे चक्र आहे.

**उपक्रम :**

- व्यासांनी लिहिलेल्या 'महाभारत' या ग्रंथाचा थोडक्यात परिचय घ्या.
- 'मृत्युंजय' ही शिवाजी सावंत यांनी लिहिलेली कादंबरी वाचा.
- आपल्या शाळेच्या स्नेहसंमेलनात 'कर्णाचे शल्य' हे नाटक सादर करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| मातृच्छाया | दैदीप्यमान | तत्त्व जादा |
| वागी | श्वरी | सर्वोत्कृष्ट |

©KTBS Not to be republished

# ५. एनाक्षीमिया आणि वाघीण

**मारूती चितमपल्ली**

**परिचय :**

मारूती चितमपल्ली जन्म : 5 नव्हेम्बर 1932 सोलापूर येथे. सोलापूर येथे शिक्षण. पुण्यात परंपरागत पद्धतीने संस्कृत साहित्याचे अध्ययन. जर्मन आणि रशियन भाषाचाही अभ्यास. पाक्षितज्ञ म्हणून ख्यातिप्राप्त. वन्यजीव व्यवस्थापन, वने, वन्यप्राणी आणि पक्षिजगताविषयी उल्लेखनीय संशोधन.

आतापर्यंत एकवीस पूस्तके प्रकाशित. अनेक पुरस्कार प्राप्त. सोलापूर येथिल 79 व्या आखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. सुवर्ण गरुड या कथासंग्रहातन एनाक्षीमिया आणि वाधीण ही कथा घेतली आहे.

**(मूल्य – मनुष्य व प्राणीयांच्यातील मैत्री)**

तुम्ही जंगलातील गावांतून हिंडू लागलात, की फकीर आणि वाघ यांच्या निकट सान्निध्या विषयीच्या गोष्टी तेथील आदिवासी तुम्हाला ऐकवतात. अशा कथांत किती वास्तविकता असते ती शोधण्याचा छंद मी वनविभागात प्रवेश केल्यापासून जोपासला आहे. मी कोकणात होतो, तेव्हा अलिबागजवळच्या एका जंगलात फकीर आणि वाघाविषयी कथा ऐकली. चौकशी करत घटनास्थळी गेलो, परंतु पुरावा हाती लागला नाही. आदिवासी वाघाची देव म्हणून पूजा करतात. अशा वाघदेवांचे दर्शन अनेक ठिकाणी झाले. नवेगाव बांध येथे असताना तेथून वीस-पंचवीस किलोमीटर अंतरावरील प्रतापगड किल्ल्यावर एक फकीर राहात असे. त्याच्याजवळ मध्यरात्रीनंतर वाघ येत असल्याचे ऐकल्यावर याचा शोध घेण्यासाठी गेलो. परंतु वाघ त्या दिवशी आणि त्यानंतर आलाच नाही.

मी नागझिरा अभयारण्यात असताना प्रसिद्ध लेखक पु.ल.देशपांडे यांच्याबरोबर आनंदवनाचे बाबा आमटे अभयारण्य पाहायला आले होते. बाबा आमटे यांनी एनाक्षीमिया आणि वाघिणीच्या कबरीविषयी गोष्ट सांगितली होती ती अशी-

फार वर्षांपूर्वी चंद्रपूर-मूल रस्त्यानजीक एका डोंगराच्या पठारावर एनाक्षीमिया नावाचा फकीर झोपडीत राहात असे. झोपडीसमोर लहान फांदया आणि गवताने शाकारलेला मांडव होता. मांडवाच्या मध्यभागी झाडाचा बुंधा जमिनीत पुरून बैठक केली होती. त्यावर बसून मिया समोरच्या धुनीकडे पाहात बसलेला असे. त्या मांडवात अहोरात्र धुनी पेटलेली असे.

©KTBS Not to be republished

डोंगराच्या पायथ्यावरील गावात तो रोज भिक्षा मागण्यासाठी जाई. त्यामुळे सारे गाव त्याला ओळखत असे. एखाद्या घरी कोणी गरोदर स्त्री असेल तर तिला कष्ट पडू नयेत म्हणून एनाक्षीमिया खराटा घेऊन तिचे सारे अंगण झाडून द्यायचा. विहिरीतील पाणी पोहऱ्याने काढून द्यायचा. डोहाळे लागलेल्या स्त्रीला रानमेवा आणून द्यायचा. गावात कुणी आजारी असेल तर त्याला औषध देऊन बरा करायचा. साहजिकच सारा गाव त्याच्या परिचयाचा होता.

मध्यरात्रीनंतर जंगलातील एक वाघीण या धुनीजवळ एनाक्षीमियाच्या शेजारी-येऊन बसे. तो तिच्याशी तासन्‌स् बोले. ती सारे एकचित्ताने ऐके. मध्येच त्याच्या पायावरून आपली मान घासे. खरेतर वाघाच्या जातीला आगीची भीती वाटते. ते आगीच्या जवळपास देखील फिरकत नाहीत. परंतु त्या वाघिणीला एनाक्षीमियाविषयी आकर्षण आणि प्रेम वाटे. आगीला ती भीत नसे.

हळूहळू ही गोष्ट साऱ्या गावकऱ्यांना माहीत झाली. त्यामुळे मध्यरात्रीनंतर त्याच्या झोपडीकडे जाण्याची कोणी हिंमत करीत नसे. मियाला जंगली प्राणी वश आहेत ही बातमी साऱ्या दशक्रोशीत पसरली होती.

ते दिवस थंडीचे होते. ऐन डिसेंबर महिन्यात इथल्या भागात अवकाळी पाऊस पडतो. गारांचा वर्षाव होतो. गारांच्या माऱ्याने जंगलातील पाखरे जमिनीवर गतप्राण होऊन पडतात, तर काही जखमी होतात. एनाक्षीमिया अशा इजा झालेल्या पाखरांवर औषध उपचार करून त्यांना बरे करी. नंतर ही पाखरे झोपडीभोवतीच हिंडू फिरू लागत. रात्र झाली की आजूबाजूच्या झाडांवर जाऊन बसत. सकाळ होताच मिया त्यांना चारा घाली. याच दिवसांत झाडांची पानगळ होई. जमिनीवर पसरलेल्या अशा पाचोळ्यातून वाघालादेखील आपली पावले न वाजवता चालता येत नसे. पानगळ झालेली झाडे काष्टशिल्पांसारखी उभी असत. परंतु यातून विरळ उभी असलेली सदाहरित वृक्षांच्या छतावरील पाने न्हाऊन निघत. त्यामुळे त्यांना एक आगळेवेगळे सौंदर्य प्राप्त होई आणि अशा पावसानंतर एक विलक्षण शांतता त्या आसमंतात पसरे.

सरपण गोळा करण्यासाठी डोंगरात गेलेला या गावचा जानू गोंड अशा थंडीतल्या पावसात जंगलात अडकला. जिकडेतिकडे आभाळ भरून आलेले. ढगांचा गडगडाट व विजांचा कडकडाट यांबरोबर वादळ-वारे सुटले. विजेच्या आगीचा लोळ एखाद्या झाडावर पडला, की ते झाड समोरच भस्मसात व्हायचे. त्यामुळे त्याला झाडाचा आसरा घेता येईना. डोक्यावरचे ओझे फेकून देऊन तो पिसाटासारखा पायवाटेने धावत एनाक्षीमियाच्या झोपडीजवळ पोचला, तेव्हा मध्यरात्र झाली होती.

सारी झोपडी आणि समोरचा मांडव धुक्यात दिसत नव्हता. धुनीचा अंधुकसा प्रकाश चमकत होता. जानू गोंड एनाक्षीमियाच्या झोपडीजवळ पोचला. जानू गोंडाने एनाक्षीमियाला हाक मारली, तसा मिया झोपडीबाहेर आला. जानूला पाहताच असा अपरात्री येण्याबद्दल त्याला दोष दिला. नेहमीच्या प्रथेप्रमाणे जानूला शिव्यांची लाखोली वाहिली.

©KTBS Not to be republished

परंतु जंगलातून रोज मियाकडे येणाऱ्या वाघिणीची वेळ झाली होती. जानूला अशा अपरात्री परत पाठवणे त्याला योग्य वाटले नाही. शिवाय वाघीण आणि त्याची भेट झाली असती, तर तिने जानूवर हल्ला केला असता आणि झोपडीत लपवून ठेवावे, तर अपरिचित व्यक्तीच्या वासावरून तिने त्याला हेरले असते. जानू गोंडाच्या या अनाहूत येण्यामुळे एनाक्षीमिया विवंचनेत पडला.

मियाला एक युक्ती सुचली. त्याने जानूला कपडे काढायला सांगितले. त्याच्या संर्वांगाला धुनीतली राख फासली. अशामुळे शरीराचा गंध प्राण्यांना येत नाही. स्वतःची कफनी त्याच्या अंगात घातली. जानूचे ओले कपडे धुनीवर सुकवून मियाने स्वतः घातले. रस्त्याने येणाऱ्या वाघिणीला सामोरे जावे म्हणून मिया जंगलातून चालू लागला. तिची सावट एकाग्रतने ऐकू लागला. अपेक्षेप्रमाणे तिची वाटेत भेट झाली. परंतु दुरूनच तिने गुरगुरून आपला राग व्यक्त केला, हे पाहून मियाला आश्चर्य वाटले. तिने त्याला ओळखले नाही आणि त्याच्यावर कडकडून हल्ला केला. त्यात मिया गतप्राण झाला.

आकाशात चंद्र प्रकाशत होता. त्याचा प्रकाश मियाच्या चेहऱ्यावर पडला होता. आता तिने त्याला ओळखले होते. आपली चूक लक्षात येताच तिने आक्रोशाने डरकाळी फोडली आणि जमिनीवर पडून शेपटी जोरजोराने आपटत आपले प्राण सोडले.

जानू गोंडाला हे सारे झोपडीत एकू येत होते. नंतर जिकडेतिकडे शांत झाले. बराच वेळ झाला तरी एनाक्षीमिया परतला नाही, म्हणून तो आवाजाच्या दिशेने शोध घेत त्या घटनास्थळी पोचला. पाहतो तो मिया आणि वाघीण मरून पडलेले दिसले. हे बघून तो भीतीने गर्भगळीत झाला. जेव्हा तो भानावर आला तेव्हा मोठ्याने रडत म्हणाला, काय केलंस मिया, माझ्यासारख्या साध्या माणसाचा जीव वाचवण्याकरता स्वतःचे प्राण दिलेस. एवढंच नव्हे तर वाघीणही मेली.

तसाच तो बोंबलत रडत गावात पोचला, तेव्हा पहाटेचा कोंबडा आरवला होता, त्याच्या रडण्या-ओरडण्यामुळे गावतील काही बाया-माणसे त्याच्याभोवती जमली. त्याने जंगलात घडलेली सारी हकीकत गावकऱ्यांना सांगितली. तोपर्यंत उजाडले होते. सारे गावकरी जमले आणि त्यांनी आपला मोर्चा घटनास्थळी वळवला. जानू साऱ्यांच्या पुढे रडत चालला होता. स्त्रियादेखील आक्रोश करू लागल्या. मिया गेल्याचे खूप दुःख त्यांना झाले होते.

गावकऱ्यांनी एनाक्षीमिया आणि वाघिणीची अन्त्ययात्रा काढली. वाजत गाजत त्यांचे मृतदेह गावात आणले. त्यांचा दफनविधि केला. त्यावर शेजरीशेजारी दोन कबरी बांधल्या. या कबरी चंद्रपूर-मूल रस्त्याकडेला गावाच्या सीमेवर आजही आहेत.

गोष्ट संपली इथे मला फकीर आणि वाघाच्या सहचर्याचा एकमेव पुरावा मिळाला. वाघासारख्या जंगली प्राण्यांना बरे करून त्यांच्याशी मैत्री करता येते याची खात्री झाली.

©KTBS Not to be republished

**शब्दार्थ :**

■ धुनी - यज्ञकुंडात पेटविलेला अग्नी ■ दशक्रोशी - समोवतालची दहा गावे ■ अवकाळी पाऊस - अवेळी पडलेला पाऊस ■ भस्मसात होणे - जळुन जाणे

**स्वाध्याय :**

**प्र1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा**

**(अ) एनाक्षीमिया कोठे राहात असे?**

(अ) झोपडी (ब) घर

(क) डोली (ड) गुहा

**(आ) पाखरे कशामुळे जखमी होत?**

(अ) उन्हामुळे (ब) पावसामुळे

(क) शिकाऱ्यांमुळे (ड) गारांच्या वर्षावामुळे

**(इ) जानू गोंड कोठे अडकला?**

(अ) पावसात (ब) गर्दीत

(क) जत्रेत (ड) डोंगरावर

**प्र2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा**

(अ) एनाक्षीमिया आणि वाघिणीची गोष्ट कोणी कोणास सांगितली?

(आ) मिया गरोदर स्त्रीची मदत कशी करत असे?

(इ) जानू गोंड जंगलात का गेला होता?

(ई) जानूला झाडाचा आसरा का घेता आला नाही?

(उ) वाघीण व मियाच्या कबरी कोठे आहेत?

**प्र3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मध्यरात्रीनंतर गावकरी मियांच्या झोपडीकडे का फिरकत नसत?

(आ) जानू गोंड कोणत्या संकटात अडकला?

**प्र4 (या) संदर्भासहित स्पष्टीकरण करा**

(अ) मियाला जंगली प्राणी वश आहेत ही बातमी साऱ्या दशक्रोशीत पसरली.

(आ) त्याने जानूला कपडे काढायला सांगितले. त्याच्या सर्वांगाला धुनीतली राख फासली.

(इ) काय केलस मीया, माझ्यासारख्या साध्या माणसाचा जीव वाचविण्याकरता स्वतःचे प्राण दिलेस.

©KTBS Not to be republished

**प्र5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा**

(अ) जानूला वाचविण्यासाठी मियाने काय केले?

(आ) मियाचा मृत्यू कसा झाला?

**प्र6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा**

(अ) जानू गोंड मियाकडे कां गेला?

(आ) मिया आणि वाघीण यांचे संबंध कसे होते?

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगुन वाक्यात उपयोग करा.**

मोर्चा वळविणे, सामोरे जाणे, गर्भगळीत होणे, कोंबडा अरवणे

**(आ) विरुद्धार्थी शब्द लिहा**

आकर्षण, अपरिचित, निष्क्रिय , क्लेशदायक

**उपक्रम:**

- व्यंकटेश माडगूळकर यांची रानमेवा, जंगलातले दिवस ही पुस्तके मिळवून वाचा
- जंगलातील जनावरांची माहीती मिळवा.

**शुद्धलेखन:**

हे शब्द असेच लिहा.

नामाभिमान भांडकुदळ

उर्जितावस्था पुनर्बांधणी

©KTBS Not to be republished

# ६. ओळख

**शांता शेळके**

**परिचय :**

शांता जनार्दन शेळके यांनी (1921-2002) मुंबई येथील महाविद्यालयात मराठी विषयाच्या प्राध्यापिका म्हणून अध्यापनाचे कार्य केले आहे. त्या प्रसिद्ध कवयित्री म्हणून परिचित आहेत. कथा, कादंबरी, बालसाहित्य इत्यादी वाङ्मय प्रकारात त्यांनी विपुल लेखन केले आहे. 'अनोळख', 'गोंदण', 'तोच चंद्रमा', 'वर्षा' इत्यादी काव्यसंग्रह. 'अनुबंध', 'काचकमळ', 'कावेरी', 'मुक्ता' इत्यादी कथासंग्रह. 'ओढ', 'पुनर्जन्म', 'भीषण छाया', 'मायेचा पाझर' इत्यादी कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले आहे.

'पावसा आधीचा पाऊस' या त्यांच्या ललित लेख संग्रहातून हा पाठ घेतला आहे. या पाठात परदेशात नोकरी निमित्त स्थायिक झालेली मराठी कुटुंबे रविवारी एकत्र येऊन गप्पागोष्टी करतात. अशावेळी सहा वर्षाच्या बालिकेला आलेला जीवनातला दाहक अनुभव, त्याचा झालेला परिणाम याचे चित्रण या पाठातून व्यक्त झालेले आहे.

**(मूल्य – बालमनाची निरागसता)**


परदेशात व्यवसायानिमित्त स्थायिक झालेल्या मराठी मंडळींचे विरंगुळ्याचे दिवस म्हणजे शनिवार, रविवार अशाच एका 'वीकएंड' ला शनिवारी संध्याकाळी पाचसहा मराठी कुटुंबे आपल्या एका मित्राकडे जेवणासाठी आली होती. जेवण हे निमित्त. एकत्र जमून काही वेळ गप्पागोष्टींत, मनोविनोदनात घालविणे हा मुख्य हेतू. परक्या देशात आपलेपण शोधण्याचा, जपण्याचा एक प्रयत्न.

यजमानांचे घर सुरेख होते. पुढल्या बाजूला चिमुकली बाग. मागे खूप दूरवर पसरलेले हिरवेगार मोकळे लॉन. त्या पलीकडून एक हायवे जात होता. कितीही दूरवर नजर टाकली तरी वाटेत कसलाही अडथळा म्हणून येत नव्हता. सरळ पाहिले तर नजर थेट निळ्याभोर क्षितिजालाच जाऊन भिडे. उन्हे कलली होती. मावळत्या सोनेरी किरणांत लॉनचा हिरवा रंग वेगळी छटा घेऊन चमकत होता. थंड वारा सुटला होता. मंडळी लॉनवरच खुर्च्या टाकून बसली होती. पुढ्यात पेये होती. काही खाद्यपदार्थ होते. गप्पांना रंग चढला होता. सारीच माणसे प्रतिष्ठित, सुसंस्कृत, बुद्धिमान. पुरुषांप्रमाणे स्त्रियाही नोकऱ्या करणाऱ्या. परदेशी पाणी साऱ्यांच्या चेहऱ्यांवर चमकत होते. पण मूळचे मराठीपण त्यातून लपत नव्हते. बाहेर सतत इंग्रजी बोलण्याचा सराव. पण इथे मंडळी मराठी बोलत होती. हसत होती. सर्वांचीच अनेक वर्षांची ओळख. त्यामुळे वागण्याबोलण्यात अकृत्रिम मोकळेपणा होता. एकमेकांना एकेरी नावाने संबोधले जात होते. घरगुती चौकश्या चालल्या होत्या. हास्यविनोदांचे रंगीत गुच्छ फुलत होते. एक सुंदर सहज वातावरण तयार झाले होते.

यजमानांची एकच छोटी मुलगी. जेमतेम पाचसहा वर्षांची असेल नसेल. कापलेले केस, गोबरे गाल, अंगात तोकडा झगा. ती इकडून तिकडे हिंडत होती. आलेल्या पाहुणे मंडळीत तिच्याबरोबरीचे एकही छोटे

©KTBS Not to be republished

मूल नव्हते. त्यामुळे तिची जरा पंचाईत झाली होती. मुलगी अतिशय चुणचुणीत, गोड. आलेले सारे अंकल अन् सगळ्या आंटी तिच्या चांगल्या ओळखीच्या. त्यामुळे ती सराईतपणे मंडळीत वावरत होती. मोठी माणसे गप्पांत रंगली होती. त्यातून त्या छोटीकडे लक्ष देणे अवघडच, तरीही सारी तिचे कौतुक करीत होती. ती कुणाच्याजवळ जाऊन त्यांच्या मांडीवर बसे. कुणाचा हात उगाचच हातात घेऊन त्याला हेलकावे देत राही. कुणाच्या पाठीमागे जाऊन त्याच्या गळ्यात हात टाकी. अशा वेळी ती व्यक्ती आपले बोलणे थांबवून तिच्याकडे हसून पाही. कौतुकाने तिची दखल घेई. एखादे वाक्य तिच्याशी बोले. खाद्यपदार्थांचा तुकडा तिच्या तोंडात घाली. आणि मग तिच्या बाबतीतले आपले कर्तव्य आपण केले, आता तिच्याकडे जास्त लक्ष द्यायचे कारण नाही अशी आपल्या मनाची समजूत घालून पुन्हा संभाषणाचा तुटलेला धागा जोडून घेई. छोटीही तेवढ्यापुरती सुखावे. या मोठया माणसांच्या मैफलीत आपल्यालाही काही स्थान आहे असे तिला वाटे. ती अधिकच लडिवाळपणे साऱ्यांशी लगट करी.



पण मधेच कधीतरी तिला परकेपणाही जाणवे. एकदम काहीतरी आठवून ती कुणाला काही सांगायला जाई तेव्हा बोलते वाक्य पुरे करून मगच ते माणूस तिच्याकडे वळत असे. कधी तिचा पुढे आलेला हात सहज बाजूला सारला जाई. कधी आईचे तोंड आपल्याकडे वळवून ती तिला काहीतरी सांगू लागे तेव्हा आई बिनचूकपणे काही वेगळेच उत्तर तिला देई. एखादा अंकल तिचे पिंगे केस मागे सारी, एखादी आंटी तिच्या गालाचा मुका घेई तेव्हा त्या क्रियांत मनःपूर्वकता नाही, काहीसा यांत्रिकपणा आहे असे तिला जाणवे. तेवढ्यापुरती ती हिरमुसली होई. काही वेळ बाजूच्या एका खुर्चीवर जाऊन बसे. चेहऱ्यावर रुसकेपणा उमटे. पण हेही थोडा वेळ टिके. छोटीला पुन्हा मैफलीत सामील व्हावेसे वाटे. मग ती हळूहळू माणसांच्या जवळ येई. ती माणसे एखाद्या विनोदाला हसली तर हीही उगाचच जोरात हसे. कुणी कुणाच्या हातावर टाळी दिली

©KTBS Not to be republished

तर ही आपणच टाळ्या वाजवून जोरजोरात खिदळू लागे. मग माणसे आश्चर्याने तिच्याकडे बघत. कुणीतरी तिला जवळ ओढून कुरवाळी. शाबासकीची थाप देई. हिचा अहंकार सुखावे. आपणही कुणीतरी महत्त्वाची व्यक्ती आहोत हा भाव तिच्या डोळ्यांत तरळून जाई.

पण एकदम काहीतरी घडे आणि छोटीची नेमकी जागा तिला दाखवून दिली जाई. लॉनवर छोटीचा एक चिमुकला स्विमिंग पूल होता. प्लास्टिकचा. त्यात पाणी भरायचे आणि आत बसून डुबक्या मारायच्या. छोटी फारच मध्येमध्ये यायला लागली तेव्हा तिची आई तिला म्हणाली, ''तुझ्या स्विमिंग पूलमध्ये पाणी भरून देऊ का? तू त्यात तुझी बदकं सोड. कशी पोहतात बघ ती.''आईने प्लास्टिकची दोन बदके तिच्या हातात दिली. छोटी जरा विचारी नजरेने बदकांकडे बघत राहिली. मग तिने ती खाली ठेवून दिली. जमलेल्या मंडळीपैकी कुणीतरी तिचा चेंडू उचलून तिच्या हातात दिला. ती चेंडू कुरवाळीत अपेक्षेने सर्वांकडे बघत राहिली. तिच्याबरोबर कुणी खेळायला आले असते तर तिची चेंडू खेळायची तयारी होती. पण कुणीच तिच्याबरोबर खेळायला उत्सुक दिसेना. तेवढ्यात तिला काहीतरी आठवण झाली. ती धावत आत गेली आणि पत्त्यांचा छोटा जोड घेऊन बाहेर आली, इतक्या मंडळीत एखादे कुणी तरी आपल्या बरोबर पत्ते खेळेल असे तिला वाटत होते. पत्ते घेऊन ती साऱ्यांच्या समोरून हिंडली. पण सगळ्यांनी गोड हसून तिला बाजूला सारले. या मोठ्या माणसांच्या बैठकीतून आपल्याला पद्धतशीर कटवले जात आहे हे तिच्या ध्यानात आले. काही वेळ ती मुकाट्याने बाजूला बसून राहिली. हातातले पत्ते चाळू लागली. पण फार वेळ दूर राहणे तिच्या वयाला, वृत्तीला शक्य नव्हते. कुणीतरी तिला खुणावून जवळ बोलावले तेव्हा ती उड्या मारीत आली. पुन्हा खुषीने मंडळींत सामील साली.

एव्हाना तास दीड तास उलटून गेला होता. सूर्य अद्याप मावळला नव्हता पण आभाळ भरून आले होते, पावसाचा रंग दिसत होता. शिवाय जेवायला उठणेही आवश्यक होते. जेवणे आटोपल्यावर मंडळींना आपापल्या गाड्यांतून दूर अंतरावरील आपापल्या घरी जायचे होते. यजमानांनी सर्वांना आत चलण्याची सूचना केली, मंडळी आत आली. टेबलावर विविध खाद्यपदार्थ मांडलेले होते. पक्वान्नांचा रुचकर दरवळ सुटला होता. हातात डिशेस, नॅपकिन्स घेऊन मंडळी टेबलाभोवती गोळा झाली. आपणाला हवे ते पदार्थ बश्यांतून घेऊ लागली. मग दिवाणखान्यात सोयिस्कर जागा बघून कुणी कोचावर आसन ठोकले तर कुणी जमिनीवरच बैठक मारली. यजमान व यजमानीण जातीने साऱ्यांकडे लक्ष देत होती. हवे, नको, विचारीत होती. प्रत्येकाच्या आवडीनुसार त्याला ते ते खाद्यपदार्थ आवर्जून वाढीत होती. यजमान व्यवसायाने डॉक्टर; पण त्यांचा शास्त्रोक्त संगीताचा व्यासंग उत्तम होता. ते स्वतः चांगले गात. मैफली करीत. आता पाहुण्यांच्या करमणुकीसाठी त्यांनी आपल्या एका मैफलीची टेप लावली होती. माणसे खात होती. गप्पा मारीत होती. गाणे ऐकत होती, गाण्यातल्या नेमक्या जागांना दर्दीपणे दाद देत होती. 'वाहवा!' 'क्या बात है' 'मार्व्हलस' असे उद्‌गार उमटत होते.

आणि छोटी? तीही या गर्दीत होतीच. आईने तिची छोटी डिश तिला भरून दिली होती, आणि ती मोठ्या माणसांत बसून त्यांच्यासारखी शिस्तीत जेवत होती. प्रौढपणाचा आव चेहऱ्यावर आणून सावकाश, चवीने खात होती. इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचे तिचे प्रयत्न आता मंदावले होते. त्यातला

©KTBS Not to be republished

व्यर्थपणा तिला कळून चुकला होता. तरीही सवयीने ती हसे. उगाचच कुणाकडे बघे. एखादा शब्द बोले. प्रतिसाद मिळाला नाही तर खाली मान घालून खायला सुरुवात करी. जेवणे आटोपत आली होती. इतक्यात बाहेर विजेचा प्रचंड कडकडाट झाला आणि वादळी वाऱ्याचा झोत वेगाने आत शिरला. दारे, खिडक्या धाडधाड उघडून वारे आत आले.

छोटी दाराशीच होती. तिने एकदम किंकाळी फोडली आणि ती मोठ्यामोठ्याने रडू लागली. अचानक सुरू झालेल्या वादळाने माणसे दचकली होती. त्यात छोटीचे किंचाळणे सुरू झाले. नेमके काय घडले आहे. कुणालाच काही कळेना. मध्यंतरी कसलाच अडथळा नसलेले वादळ क्षितिजापासून विनाअटक घरात घुसले होते. त्याने थैमान घातले होते. वारे वेड लागल्यासारखे घुमत होते आणि त्या साऱ्या कल्लोळावर छोटीचा सूर उंच चढला होता, ती विलक्षण किंचाळत होती. हातपाय झाडीत होती. सगळी माणसे धावत तिच्यापाशी गेली. 'काय झालं?' 'ही इतकी का रडते?', 'बोटबीट दारात चेंगरलं की काय? चिंतातुर स्वरात प्रश्न विचारले जात होते. छोटीच्या आईने तिला पटकन उचलून घेतले. छातीशी घट्ट धरले. कुरवाळले. पण तिचे रडणे, किंचाळणे थांबेना. ती रडत होती. आणि 'माझा स्विमिंग पूल', 'माझा स्विमिंग पूल' म्हणून सारखी किंचाळत होती. वादळाचा झोत आला होता आणि छोटीच्या कल्पनेत तिचा प्लास्टिकचा स्विमिंग पूल वाऱ्यात उडून गेला होता. ती घटना तिच्या डोळ्यांना जणू प्रत्यक्ष दिसली होती. तिच्या सुरक्षित, स्थिर जगाला जोराचा धक्का बसला होता आणि ते वादळात सापडले होते. छोटीच्या आईला एका विलक्षण संवेदनेने छोटीचे दुःख जाणवले. तिने खिडकीतून तिचा स्विमिंग पूल तिला दाखवला. तो वादळात उडून गेला नव्हता. होता तिथेच सुखरूप होता. छोटी जरा सावरली. पण घटकेपूर्वी जे कल्पनेत तिने अनुभवले त्याचा जबरदस्त हादरा तिला बसला होता. त्यामुळे ती अजूनही रडत होती. स्फुंदत होती. थरथर कापत होती आणि पुनः पुन्हा विचारीत होती; 'येवढ वादळ सुटलंच कसं? येवढा पाऊस का येतो?'

सारी संध्याकाळ तिची उपेक्षा करणारी माणसे आता तिला वेढून उभी होती. तिच्यावर प्रेमाचा, मायेचा, वात्सल्याचा वर्षाव करीत होती. कुणी तिला कुरवाळत होते. कुणी तिचे मुके घेत होते. कुणी तिची समजूत घालीत होते. पण आता तिला त्यातले काही नको होते. आयुष्यात अगदी प्रथमच जीवनाची जी अनिश्चितता तिला कळली होती, संकटाचे जे अनपेक्षित दर्शन तिला झाले होते त्याने ती मुळापासून हादरून गेली होती. स्थिर, सुरक्षित असे काहीही एका क्षणात अस्थिर, असुरक्षित बनू शकते हे ती प्रथमच पाहात होती. त्याचा अर्थ तिला कळत नव्हता आणि ती अगतिक केविलवाणेपणाने पुनः पुन्हा विचारीत होती, ''येवढा वारा येतो कसा? इतका पाऊस पडतोच कसा?''

मैफल अचानक संपली, माणसे घरोघर निघून गेली, छोटीचे हुंदके चालूच होते. आईने तिला खोलीत नेले. आपल्या छातीशी तिला बिलगून घेतले. बिछान्यावर झोपवले. उद्या सकाळी छोटी रोजच्यासारखी झोपेतून जागी होईल. तेव्हा वादळ ओसरलेले असेल. छोटीला तर त्याचा विसरही पडला असेल. पण त्या वादळाचा ठसा तिच्या अबोध मनावर कुठेतरी राहील. तो जन्मभर तिचा पाठपुरावा करील. छोटी एका रात्रीत खूपच वाढलेली असेल. ती अधिक शहाणी झालेली असेल. आणि दुःखीही. यापुढे येणाऱ्या संकटांना छोटी अधिक धीराने तोंड देईल. अपयशांना ती सामोरी जाईल, निराशा, अपमान, अपेक्षाभंग ती पचवील. कारण दुःखाशी तिची तोंडओळख झालेली आहे. वादळ तिने पाहिले आहे. क्षणापूर्वीचे स्थिर एका घटकेत कसे अस्थिर होते हे तिने अनुभवले आहे.

©KTBS Not to be republished

**शब्दार्थ :**

■ वीकएंड- आठवड्याचा शेवट ■ डोळ्यात तरळणे - नजरेत येणे ■ कटवले जाणे - दूर करणे ■ दखल घेणे- लक्ष देणे ■ स्विमिंग पूल- पोहण्याचा तलाव ■ नॅपकिन्स- लहान रूमाल ■ डिशेस-लहान ताट ■ मैफल - संगीत सभा

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) लेखिका शांता शेळके या विषयाच्या प्राध्यापिका होत्या.**

(अ) हिंदी (ब) इंग्रजी

(क) मराठी (ड) इतिहास

**(आ) 'कावेरी' या पुस्तकाचा वाङ्मयप्रकार हा आहे.**

(अ) कथासंग्रह (ब) काव्यसंग्रह

(क) कादंबरी (ड) नाटक

**(इ) मंडळी यावर खुर्च्या टाकून बसली होती.**

(अ) सतरंजी (ब) लॉन

(क) घोंगडी (ड) गादी

**(ई) छोटीचा एक चिमुकला स्विमिंग पूल याचा होता.**

(अ) सिमेंटचा (ब) रबराचा

(क) प्लास्टिकचा (ड) मातीचा

**(उ) यजमानांचा व्यवसाय हा होता.**

(अ) वकिली (ब) शिक्षक

(क) डॉक्टर (ड) उद्योगपती

**(ऊ) माणसे घरोघर निघून गेली, तरी छोटीचे हे चालूच होते.**

(अ) हुंदके देणे (ब) खेळणे

(क) वाचने (ड) बोलणे

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) लेखिका शांता शेळके यांचे पूर्ण नांव काय?

(आ) 'ओळख' हा ललित लेख कोणत्या मूळ पुस्तकातून निवडलेला आहे?

(इ) यजमानांची छोटी जेमतेम किती वर्षांची होती?

(ई) छोटी आत धावत जाऊन काय घेवून आली?

(उ) छोटी पुनः पुन्हा कोणते प्रश्न विचारीत होती?

©KTBS Not to be republished

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) यजमानांच्या घराची रचना कशी होती?
(आ) छोटी काही वेळ बाजूच्या खुर्चीवर का जाऊन बसे?
(इ) यजमानांच्या घरी मैफल कशी रंगत असे?
(ई) छोटी मुळापासून का हादरून गेली होती?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'वाहवा!' 'क्या बात है' 'मार्व्हलस'.
(आ) 'माझा स्विमिंग पूल', 'माझा स्विमिंग पूल'

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) छोटीचे लाड सगळेजण कसे करत होते?
(आ) यजमानांनी पाहुण्यांची जेवणाची सोय कशी केली होती?
(इ) छोटी संकटांना धीराने तोंड देईल असे आईला का वाटते?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) यजमानांच्या घरी सुंदर सहज वातावरण केव्हा व कसे तयार झाले होते?
(आ) अचानक आलेल्या 'वादळ, पावसाचे वर्णन करा.

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**
लगट करणे, छातीशी घट्ट धरणे, मुळापासून हादरून जाणे, कटवले जाणे, आसन ठोकणे.फ

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**
सूर्य, वारा, पाऊस, आई, चिंता, रात्र

**उपक्रम :**

- तुम्ही अनुभवलेला एक रोमहर्षक प्रसंग तुमच्या शब्दात लिहा.
- बालवयीन मुलांच्याबरोबर गप्पा गोष्टी करा व खेळा.
- मारुती चितमपल्ली यांचा 'रातवा' हा ललित लेखसंग्रह मिळवून वाचा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| नाखुश | शुभाशीर्वाद | चतुष्कोण |
| मुश्कील | उध्वस्त | निर्भर्त्सना |

©KTBS Not to be republished

# ७. संत पुरंदरदास

**डॉ. प्र.न.जोशी**

**परिचय :**

प्रल्हाद नरहर जोशी (1924-2004) हे विसाव्या शतकातील नामवंत श्रेष्ठ साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी पुणे विद्यापीठाची पीएच. डी. पदवी संपादन केली होती. पुणे येथे काही काळ अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी विविध विषयांवर लेखन केले आहे. 'अणुयुगाचे निर्माते', 'असे शोध असे शोधक', 'नव विज्ञान कथा', हे विज्ञान विषयक लेखन, 'भारतीय संत भाग एक, भाग दोन' हे संत साहित्या पर लेखन, 'असे धर्मवीर', 'आंधळी गौळण', 'काय भुललासी वरलिया रंगा' या कादंबऱ्या. मराठी वाङ्मयाच्या विवेचक इतिहासाचे प्राचीन व अर्वाचीन असे दोन खंड 'आदर्श मराठी शब्दकोश', असे विपुल लेखन त्यांनी केले आहे. त्यांना त्यांच्या साहित्य कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाकडून आठ वेळा पुरस्कार मिळाले आहेत.

'संत पुरंदरदास' हा पाठ 'आपले संत' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतलेला आहे. संत पुरंदरदासांचे व्यक्तिमत्त्व व त्यांच्या विचारांचे दर्शन या पाठातून व्यक्त होते.

**(मूल्य – भक्ती, त्याग)**

कर्नाटकाचा तुकाराम म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्या पुरंदरदासांचा जन्म 1482 च्या सुमारास पुरंदरगड येथे झाला. वरदप्पा नाईक हे त्यांचे वडील व लक्ष्मीअक्का ही त्यांची आई, दोघे मोठे सत्त्वशील व धार्मिक वृत्तीचे होते. त्यांच्या घराण्यात सराफीचा धंदा असून थोडी सावकारीही होती. सर्वप्रकाराच्या ऐश्वर्यात एक उणीव अशी की, घरात पुत्रसंतती नव्हती. तिरुपतीच्या श्रीनिवास वेंकटेशाची, बालाजीची एकनिष्ठ सेवा दोघांनी बारा वर्षेपर्यंत केली आणि त्यांना मुलगा झाला. त्याचे नाव श्रीनिवास ठेवण्यात आले. श्रीमंत घरचा हा एकुलता एक मुलगा लाडात वाढत असल्यास नवल नाही.

वडील दिवंगत झाल्यावर मुलाच्याच हाती कारभार आला. श्रीनिवास किंवा शिवप्पा नाईक यांचे नाव सर्वत्र दुमदुमत होते. जात्याच बुद्धिमान असणाऱ्या या पोराने थोड्याच अवधीत आपला जम चांगला बसविला. व्यापार वाढविला. संपत्तीची रास उभी केली. विजयनगर, गोवळकोंडा, गुलबर्गा आदी राज्यांत हिरे, मोती, माणके इत्यादी रत्नांचे उत्तम पारखी म्हणून याचा लौकिक वाढत होता. विद्या, संगीतादी कला यातही शिवप्पाने प्रावीण्य संपादन केले. सत्त्वशील, सुशील व धार्मिक प्रवृत्तीची पतिपरायण स्त्री सरस्वती व शिवप्पा यांचा प्रपंच उत्कर्षाने व ऐश्वर्याने चालला होता. नवकोटनारायण म्हणूनच यांना लोक ओळखू लागले. या धनसंपत्तीच्या विकासाबरोबर जी मनाची उदारता वाढावयास हवी होती, ती मात्र येथे संकुचित झाली. धनसंपत्तीची भूक वाढली पण उदारवृत्ती कमी झाली. पैसा, पैसा, केवळ पैसा, हीच एक दृष्टी

©KTBS Not to be republished

श्रीनिवासाची बनली. घरी पत्नीसही मोठ्या धाकात त्यांनी ठेविली. कोणी अतिथी असल्यास कसे तरी त्याला पिटाळून लावावे, फारसा दानधर्म करू नये, अशीच वृत्ती बनत राहिली. उदारता, दया, क्षमा, सहानुभूती हे सद्‌गुण संपत्तीस शोभून दिसतात; पण येथे त्यांना अवसर नव्हता.



©KTBS Not to be republished

एके दिवशी एक भिकारी ब्राह्मण श्रीनिवासजींच्या दुकानी आला आणि गयावया करू लागला. ''शेटजी, गरीब ब्राह्मण आहे. अन्न मिळणे मुश्कील आहे. काही दया करा. मुलगी लग्नाची आहे. लग्न होणे अवघड आहे. थोडी पैशाची मदत कराल का?'

शेटजींनी चटकन उत्तर दिले, ''आज काही बोलू नकोस. उद्या ये परत.'

ब्राह्मण परत दुसऱ्या दिवशी आला व बोलला, 'शेट, मी गरीब ब्राह्मण आहे. मुलीच्या लग्नाचे पुण्य घ्या.'

पुन्हा शिवप्पा म्हणाले, 'उद्या या.''

शिवप्पाचे 'उद्या या' संपेना व ब्राह्मण हेलपाटे घालण्याचे थांबविना. पाच ते सहा महिने सारखे हेच चालले होते. शेवटी शिवप्पा या प्रकारास पाहून संतापले. ब्राह्मणास चिडविण्याच्या निमित्ताने त्यांनी त्याच्यापुढे एक पैसा फेकला व घेऊन जा असे फर्माविले. गरीब बिचारा ब्राह्मण पैशाकडे न पाहता त्याच पावली परत गेला.

पण तो तेथून जो निघाला तो शिवप्पा नाईक यांच्या घरीच गेला. साध्वी पत्नी सरस्वती घरात स्वयंपाकपाणी करण्यात गुंतली होती. ब्राह्मणाने हाक दिली, ''बाई, मी एक दरिद्री ब्राह्मण. घरी फार गरिबी आहे. मुलीचे लग्न करावे म्हणतो, पण जवळ काही नाही. थोडी कृपा करा आणि मदत द्या. फार उपकार होतील बाई, कन्यादानाचे पुण्य घ्यावे.''

या गरीब ब्राह्मणाची दया त्या थोर स्त्रीस आली. तिने सुचविले, ''तुम्ही असे करा ना, दुकानी जाऊन सर्व सांगा, कदाचित तुम्हाला काही मदत होईल.'' नवऱ्याचा कंजूष स्वभाव तिला माहीत होता. पण ती बोलून गेली. ब्राह्मणाने घडलेली सर्व हकिगत सांगितली तेव्हा बाई अधिकच पेचात पडली. नवरा संतापी, करारी, निश्चयी, आपण काही दिले या ब्राह्मणाला तर भयंकर प्रसंग ओढवणार! काय करावे? कशी मदत याला द्यावी? या बिचाऱ्याचे संकट कसे दूर करावे? आपल्या हाती काय आहे? अशा विवंचनेत असताना तिच्या ध्यानात आले, आपल्या नाकातील नथ आपल्या वडिलांनी दिली आहे. ती देऊन टाकू. पुढचे पुढे पाहू. एक क्षणाचाही विलंब न लावता भारी किंमतीची नथ तिने नाकातून काढली व ब्राह्मणाला दिली आणि म्हणाली, ''ही घे बाबा. दुसरे मजजवळ काही नाही. पण यात भागेल तुझे.'' ब्राह्मणाने बाईस दुवा दिला. मोठ्या आनंदाने तेथून निघाला. पण ब्राह्मण पाहा किती विचित्र, तो परत शिवप्पाच्या दुकानी आला. शेटजीस वाटले पुन्हा ब्याद आली. पण ब्राह्मणाने नथ शिवप्पापुढे करून म्हटले, ''शेट, आता नाही म्हणू नका. घरचा दागिना आणला आहे. चारशे मोहरा द्या लवकर. उशीर होत आहे मला.''

नथ निरखून पाहताच शिवप्पा चमकले. स्वतःच्या घरची नथ ओळखण्यास त्यांना वेळ लागला नाही. आपण या ब्राह्मणास एक पैसा देऊन हाकलले आणि घरी पत्नीने नथ देऊन टाकली! शिवप्पाचा क्रोध अनावर झाला. रागारागाने त्यांनी ती नथ सीलबंद करून तिजोरीत ठेवली व कुलूप लावून तसेच तडक रागावून घरी आले. पत्नी सर्व समजून होती. थरथर कापत बिचारी उभी राहून काय वर्षाव होणार, तो सहन करण्याच्या तयारीत होती. आल्याबरोबर पतीने प्रश्न केला, ''नाकात नथ दिसत नाही? कुठे आहे? कुणाला दिली? की घरात काढून ठेवली?'' पत्नी बिचारी काय बोलणार? भीतीने थरथरत खाली जमिनीकडे पाहत डोळ्यातून पाणी गाळीत उभी होती आणि इकडे धनलोभी पतीच्या रागाचा पारा चढत होता. ''वाचा गेली का तुझी? बोल, नथ काय केलीस? तुझ्या बापाची झाली म्हणून काय झाले?''

©KTBS Not to be republished

''नाथ असे बोलू नका. नथ आपलीच होती. घरात काढून ठेवली आहे.'' गोंधळलेली सरस्वती काही तरी बोलून गेली.

पत्नी खोटे बोलते हे स्पष्ट होते. शिवप्पा आणखी संतापले ''घरात आहे? तर आण ती आत्ताच्या आत्ता. नाही तर याद राख, माझ्याशी गाठ आहे. जिवंत ठेवणार नाही....''

''नाथ, आपल्या हातून मरण्यापेक्षा अधिक चांगले काय आहे? पण मी नथ पाहते आहे की जिथे ठेवली तिथे.'' असे म्हणून ती घरात गेली. आता काय करावे? प्रसंग मोठा कठीण आला खरे सांगावे तर आणखी पंचाईत. नथ द्यावी तरी कुठून ? अपराध केला त्याचे प्रायश्चित्त आपणच घ्यावे असे समजून तिने विषाचा पेला तयार केला आणि भगवंताला प्रार्थना केली. ''दयाघना, तूच ब्राह्मणाच्या रूपाने आलास असे मी मानले व काही दुसरा विचार न करता नथ काढून दिली प्राणाशी संकट उभे आहे. पाहा तूच खरे-खोटे. पतीस सन्मती यावी, गरिबांचा कणव त्यांना वाटावा. एवढे मात्र देवा कर. मला मरणाची भीती नाही. मी तयार आहे.'' एवढे म्हणून पेला तोंडाशी नेणार तो पेल्यात काही चमकले! तिने निरखून पाहिले. तिची नथ पेल्यात होती! तिचा हर्ष उन्मळून आला. डोळ्यात आनंदाचे, कृतज्ञतेचे अश्रु चमकले. ''प्रभू, किती दयावंत तू! तुला सर्व लेकरांची काळजी!'' म्हणून तिने नथ हातात घेतली व बाहेर येऊन नवऱ्याच्या हातावर ठेवीत बोलली. ''ही घ्या नथ. आपलीच आहे.''

नथ तीच. ती पाहताच शिवप्पा चमकले. त्यांच्या आश्चर्यास सीमा उरली नाही. नथ हातात घेऊन तसेच ते दुकानात आले. तिजोरी उघडून त्यांनी पाहिले. सीलबंद केलेल्या पिशवीत नथ नव्हती! इतक्या बंदोबस्तात ठेवलेली नथ घरी कशी गेली? श्रीनिवास शेटजींच्या बुद्धीस जोराचा धक्का बसला. धनसंपत्तीचा सारा दिमाख उतरून गेला. ऐश्वर्य एकसारखे विरघळू लागले! धावत घरी आले. पत्नीस सर्व हकिगत विचारली. 'एक ईश्वरी कृपा' एवढेच पत्नी बोलली. मग हा ब्राह्मण कोण? कुणास आपण सतावले? तो ब्राह्मण आपली परीक्षा पाहण्यास आलेला पंढरीचा विठ्ठल तर नव्हे? काय आपण केले? केवढा मोह! केवढी संपत्तीची नशा! केवढी अमानुषता!

शिवप्पाचे सारे जीवन पालटून गेले. त्यांनी स्नान करून पत्नीसह परमेश्वराची पूजा मनोभावे केली. आज प्रथमच त्यांच्या डोळ्यातून अश्रु पाझरत होते. अंतःकरण भरून आले होते. साऱ्या विश्वात परमेश्वरी कृपाच भरून राहिली असल्याचा अनुभव त्यांना येत होता. यथासांग पूजा झाल्यावर त्यांनी हातात तुळशीपत्र घेऊन सर्व संपत्तीवर, घरावर, इस्टेटीवर पाणी सोडले. सारे काही कृष्णार्पण केले. स्वतःसाठी काही ठेविले नाही. सकाळी ब्राह्मणांना बोलावून भरपूर दान दिले. गरिबांना, कंगालांना, गरजूंना बोलावून घरचे सर्व काही देऊन टाकले. स्वतःसाठी पत्नीसाठी घरात काही ठेवले नाही. कुंकवाची सोन्याची डबीसुद्धा त्यांनी निकालात काढली. ज्या धनसंपत्तीने माणूस बेभान होतो. तिचा स्पर्श नको, असे त्यांनी ठरविले. नवकोटनारायण एका दिवसात बैरागी बनले. धनसंपत्तीचा सारा नूर एका क्षणात उतरला. घरदार सोडून ते पत्नीसह पंढरपुरास आले. तेथील विठ्ठलावर त्यांचे मन जडले. त्याला पाहून त्यांच्या डोळ्यातून अश्रू झरू लागले. प्रेमभावात तल्लीन होऊन शिवप्पा कीर्तन करू लागले, नृत्य करू लागले. आधीचा संगीताचा अभ्यास हा असा उपयोगी पडला. कर्नाटकी संगीत कीर्तन पद्धतीचे प्रवर्तक म्हणून यांचा लौकिक वाढीस लागला.

©KTBS Not to be republished

विजयनगरचा राजा कृष्णदेव याचे गुरू यतिश्रेष्ठ स्वामी श्री व्यासराय मोठे अधिकारी पुरुष होते. यांच्याकडून शिवप्पांनी मंत्रोपदेश घेतला. वेद, पुराण, स्मृती आदींची ओळख करून देऊन श्री व्यासरायांनी आपल्या या शिष्याचे नाव 'पुरंदर विठ्ठल' ठेवले. पुढे पुरंदरदास म्हणूनच सर्वजण म्हणू लागले. पुरंदरदासांचा लौकिक सर्वत्र वाढला. रोज भिक्षेचे अन्न आणावे व त्यात संतुष्टता मानून अखंड विठ्ठलस्मरण करावे. हा त्यांचा एकमेव उद्योग बनला. विठ्ठलाचे संगीत कीर्तन पुरंदरदासांनीच करावे अशी ख्याती सर्वत्र पसरली. दारिद्र्याचेही एक व्रत असते, ते पुरंदरदास व त्यांची पत्नी यांनी पूर्णपणे पाळले. भिक्षेचे अन्नसुद्धा घरी उरू न देता जलचर प्राण्यांना ते टाकावे असा रिवाज त्यांच्या घरी होता.

गुरुकृपेने पुरंदरदासांची कवित्वशक्ती जागृत होऊन त्यांच्या मुखातून उत्तमोत्तम पदे बाहेर पडू लागली. लोकांना उपदेश, वैराग्य, भक्ती, तत्त्वज्ञान यांचा साठा पुरंदरदासांच्या पदांतून प्रगट झाला. कर्नाटक संगीताचे उद्धारक म्हणून पुरंदरदासांची कीर्ती वाढली. कन्नड भाषेचे वैभव पुरंदरदासांच्या पदांमुळे वाढीस लागले. दासांनी पुष्कळ पदरचना केल्याचा उल्लेख असला, तरी आज त्यांची फारच थोडी कविता उपलब्ध आहे. द्रौपदीवस्त्रहरण, सुदामचरित्र, परतत्त्वसार इत्यादी ग्रंथही त्यांच्या नावावर आहेत. दासांच्या पदांची प्रसिद्धी मात्र सर्वत्र आहे. पुरंदरदासांनी सर्व भारतभर तीर्थयात्रा केली. पंढरपूरचा विठ्ठल तर त्यांचे आवडते दैवत. आपल्या पदाच्या शेवटी ते पुरंदर विठ्ठल असाच उल्लेख नेहमी करीत.

श्रीविठ्ठल भेटला, परमेश्वराची जवळीक लाभली, याचे किती गोड अनुभव पुरंदरदासांनी वर्णन करावेत? एका पदात त्यांनी म्हटले आहे, 'हा पहा देव आला. माझा स्वामी आला. देवाधिदेव शिखामणी आला. शेषावर शयन करणारा, गरुडावर बसणारा, अर्जुनाला वश असणारा हा नारायण आला. नंदालाही गोचर न होणारा नित्य तृप्त असणारा, हसतमुख असा हा पुरंदर विठ्ठल भेटीसाठी आला आहे.

पुरंदरदासांनी परमेश्वर आळवणी किती प्रकारांनी करावी. ''पुरंदर विठ्ठला, माझी दुष्कर्मे नाहीशी करून माझे रक्षण कर.. देवा, अद्याप माझी दया तुला आली नाही, इतका मी दुष्ट व टाकाऊ आहे? तुझे ब्रीद तू विसरलास? माझी स्थिती तुला माहीत असून तू माझा हात सोडतोस? कोण मला तुझ्याशिवाय दुसरे आप्त आहेत? पितामाता सर्व काही तूच. भक्तवत्सला, या पुरंदरदासाला जवळ कर.''

आत्महितासाठी माणसाने कसे वागावे याविषयी पुरंदरदासानी फार श्रेष्ठ प्रकारचा उपदेश केला आहे. ते म्हणतात, ''जेने देहावर पाश टाकले आहेत. मना, आता तरी तू आशा सोड. धन, दारा म्हणजे पत्नी, भूमी यांचा मोह सोडून नीरजनाभ श्रीपुरंदर विठ्ठलासी सख्य जोड ना!'' शरीरसौंदर्यावर मोहित होणाऱ्यास उद्देशून दास म्हणतात, ''कशासाठी या तनूवर मोहित होतोस? क्षणात रोष येतो, क्षणात पोष होतोस, क्षणाक्षणाला या देहाचा रंग बदलतो. हा मुलगा, हा मित्र, हा शत्रू, हा बांधव असा व्यर्थ अभिमान निर्माण होतो. पण ज्या देहाचा अभिमान बाळगतोस, त्याचे एके दिवशी भस्म होणार आहे! वेळीच पुरंदर विठ्ठलचे स्मरण कर.''

समाजातील भोंगळ समजुतीवर दासांचा फार कटाक्ष होता. वेडगळ रीतिभाती त्यांना मान्य नव्हत्या. एका पदात त्यांनी विचारले आहे. ओवळेसोवळे म्हणून उगाच का फुशारकी मारतोस? दुसऱ्याचा स्पर्श झाला म्हणजे मूर्खा तू ओवळा होतोस? हे सोवळे तू आणलेस कोठून? सोवळाही तूच, ओवळाही तूच, जळो तुझे हे सोवळे! अस्थिचर्म, मलमूत्र यात वास करणारा तू सोवळा होय? जन्मल्याबरोबर सुतक, मेल्यावर

©KTBS Not to be republished

सुतक आणि मध्येच सोवळे कसे आले रे? मूर्खा, पापविनाशी गंगेत चर्म धुतले की कर्म नष्ट होते की काय? आतले मर्म समजावून घे आणि निर्मळ अंतःकरणाने श्री पुरंदरदास म्हणतात, ''पावलोपावली उडी मारली म्हणजे सोवळे का? विश्वचालकाच्या पदकमलाचे ध्यान हे खरे सोवळे. वस्त्र धुऊन, वाळवून नेसले म्हणजे ते सोवळे होत नाही. पोटातील काम, क्रोध, मद, मत्सर नष्ट करणे म्हणजे सोवळेपणा येणे. पापाला न भिता दुसऱ्याच्या मनास प्रखर शब्दांनी दुखविणे म्हणजे का सोवळे ? स्वत: यथेच्छ भोजन करायचे आणि अतिथीला उपाशी ठेवायचे हे सोवळे काय? गडया, पुरंदरविठ्ठलाचे स्मरण हे खरे सोवळे!''

पुरंदरदासांच्या या क्रांतिकारक विचारातूनच सामाजिक समतेकडे लोकांचे मन वळले. प्रसिद्ध संत कनकदास पुरंदरदासांच्या परंपरेतील यांनाही उपदेश श्रीव्यासजीचाच. पुरंदरदासांनी याप्रमाणे भक्तीचा अखंड प्रसार केला. लोकांना सन्मार्गास लावले. चाळीस वर्षेपर्यंत त्यांचा हा उद्योग वैरागीवृत्तीने चालू होता. प्रवास नेहमीच असे. तिरूपती, घटिकाचल, कालहस्ती, कंची, मायावरम, श्रीरंग, मदुरा, रामेश्वर, कन्याकुमारी, विजयनगर इत्यादी ठिकाणी त्यांचा संचार असे. तुंगभद्रा, कावेरी या महानद्यांवर त्यांची स्तुतिस्तोत्रे आहेत. विजयनगरच्या कृष्णदेवरायाने हंपीक्षेत्रास चक्रतीर्थाजवळ दासांच्या भजनासाठी एक विस्तीर्ण मंडप बांधून दिला. दासमंडप म्हणून याचा महिमा आहे. दासांनी आयुष्यभर भगवद्भक्तीचा प्रसार आपल्या संगीतमय मधुरवाणीने केला आणि सन 1564 पौषी अमावस्येस अनागोंदी येथे दास श्रीविठ्ठलचरणी विलीन झाले. कर्नाटकच्या या कीर्तनभक्तीची ज्योत पांडुरंगतेजात निमाली.

**शब्दार्थ :**

■ सराफी-सोन्याचांदीचा व्यापार करणारे ■ संतती - मुलेबाळे ■ सत्त्वशील- सर्व सद्गुणांचा द्योतक ■ साध्वी- पवित्र, सद्वर्तनी स्त्री ■ सन्मती- चांगली बुद्धी ■ बैरागी - संन्यासी, साधू ■ कंजूष- कृपण, चिक्कू ■ एकनिष्ठ - अढळ, श्रध्दावान ■ उत्कर्ष-भरभराट ■ उन्मळणे-मुळासकट उपटून टाकणे ■ आतिथ्य- योग्य पाहुणचार, आदरातिथ्य ■ दुवा देणे- आशीर्वाद देणे ■ वाचा-बोलणे ■ पारा चढणे - क्रोध अनावर होणे ■ बाका प्रसंग-कठीण प्रसंग

**टीपा :** संत पुरंदरदास यांना श्रीनिवास व शिवप्पा या दोन्ही नावानी ओळखले जाते.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) पुरंदरदासांच्या घराण्यात कोणता व्यवसाय होता?**

(अ) वखारीचा (ब) सराफीचा

(क) लोहाराचा (ड) शेतीचा

©KTBS Not to be republished

**(आ) कर्नाटकाचा तुकाराम म्हणून यांचा उल्लेख करतात.**

(अ) संत बसवेश्वर (ब) संत कनकदास

(क) संत पुरंदरदास (ड) संत चन्नबसवेश्वर

**(इ) श्रीनिवासाचा स्वभाव संसारात असताना कसा होता?**

(अ) संकुचित (ब) उदार

(क) विनोदी (ड) चतुर

**ई) सरस्वतीने आपल्या नाकातील नथ कोणाला दिली?**

(अ) ब्राह्मणाला (ब) सराफाला

(क) विठ्ठलाला (ड) पतीला

**उ) शिवप्पाने रागारागाने नथ येथे सीलबंद करून ठेवली.**

(अ) तिजोरीत (ब) पेटीत

(क) बँकेत (ड) पोष्टात

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) पुरंदरदासांचा जन्म केव्हा व कोठे झाला?

(आ) शिवप्पाने आपल्या सर्व संपत्तीचे काय केले?

(इ) शिवप्पाचे नाव पुरंदर विठ्ठल असे कोणी ठेवले?

(ई) पुरंदरदासानी कोणाची भक्ती केली?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गरीब ब्राह्मण साध्वी सरस्वतीकडे जाऊन कोणती विनंती करतो?

(आ) संत पुरंदरदासांच्या साहित्यलेखनाची माहिती लिहा.

(इ) शिवप्पाचे जीवन कोणत्या प्रसंगाने पालटून गेले?

(ई) कोणत्या अपराधाचे प्रायश्चित्त सरस्वती घेणार होती?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''नाथ, आपल्या हातून मरण्यापेक्षा अधिक चांगले काय आहे?''

(आ) ''प्रभू, किती दयावंत तू! तुला सर्व लेकरांची काळजी!''

©KTBS Not to be republished

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) शिवप्पाच्या पत्नीस 'थोर स्त्री' असे का म्हटले आहे?

(आ) शिवप्पाने आपल्या संपत्तीचे वाटप का केले?

(इ) पुरंदरदासांचे सोवळ्या -ओवळ्याबद्दलचे विचार स्पष्ट करा.

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) पुरंदरदासांच्या भक्तिमार्गातील कार्याबद्दल माहिती लिहा.

(आ) पुरंदरदासांनी विठ्ठलाची स्तुती कशी केली आहे?

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

दुवा देणे, पारा चढणे, वाचा जाणे, बाका प्रसंग, आतिथ्य करणे

**(आ) खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

कन्यादान, पतीपत्नी, दयावान, यथासांग, मंत्रोपदेश

**(इ) संधी सोडवा.**

मंत्रोपदेश, सन्मती, उत्तमोत्तम, प्रायश्चित्त

**(ई) समानार्थी शब्द लिहा.**

अतिथी, विरक्त, लौकिक, सुशील, क्रोध, लोभी

**उपक्रम :**

- संतांची पदे मिळवून वाचा.
- डॉ. प्र. न. जोशी यांचे 'आपले संत' हे पुस्तक वाचा.
- संतांची चित्रे एकत्रित करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| विपरीत | शिथिलीकरण | सांसारिक |
| फुप्फुस | प्राथमिक | निःस्वार्थी |

©KTBS Not to be republished

# ८. बाबाखान दरवेशी

**व्यंकटेश माडगूळकर**

**परिचय :**

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे (1927-2000) मराठीतील थोर साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी 1942 च्या स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. 1950 पासून मराठी चित्रपटसृष्टीत पटकथा लेखन करण्यास सुरुवात केली. त्यांनी 'मी तुळस तुझ्या अंगणी', 'वंशाचा दिवा', 'सांगत्ये ऐका' इत्यादी चित्रपटांचे पटकथा लेखन केले. 'सत्तांतर', 'कोवळे दिवस', 'बनगरवाडी' या त्यांचा कादंबऱ्या 'नागझिरा', 'रानम ेवा' हे ललित लेखन, 'ओझं', 'काळी आई', 'गावाकडील गोष्टी', हे कथा संग्रह असे विपुल लेखन त्यांनी केले आहे. 1983 मध्ये अंबेजोगाई येथे भरलेल्या साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण निसर्ग आणि मानवी जीवन यांचे अतिशय जिवंत रसरशीत प्रत्ययकारी दर्शन घडते.

बाबाखान दरवेशी हा पाठ 'माणदेशी माणसं' या व्यक्तिचित्रणात्मक पुस्तकातून घेतलेला आहे. यातून बाबाखान दरवेशीचे स्वभावदर्शन अतिशय स्वाभाविकपणे घडविले आहे.

**(मूल्य : भूतदया)**

बाबाखान दरवेश्याच्या राहत्या छपरापुढं तशा काळोख्या रात्री पाच-पंचवीस माणसं गोळा झाली. कारण मध्यान्हरात्र टळून गेल्यावर एकाएकी कालवा ऐकू आला. दरवेश्याच्या बायकोनं गहिवर मांडला होता आणि त्याला तिची चिल्लीपिल्ली साथ करीत होती. त्या गोंधळानं आसपासचे शेजारीपाजारी आणि राखणीचे रामोशी धावून आले. दरवेश्याच्या छपरापुढं गर्दी झाली. जो तो दुसऱ्याला पुसू लागला -''अरं काय झालं? कोन दगावलं का काय?''

''का आग लागली छपराला आतनं?''

पण कोण काय सांगणार? काळोख किट्ट. कुणापाशी दिवा नाही काही नाही. दरवेश्यानं आतून कवाड जाम लावून घेतलेलं आणि रडण्याचा कल्लोळ चाललेला. मग आत काय झालं आहे हे कोण कसं सांगणार? माणसांची अशी गवगव चालली होती. त्यातूनच कोणीसं ओरडलं-''ए उमा नाईक, म्होरं हो आन् लाथ दे कवाडावर, काय गोंधूळ हाय बघू दे.''

हातातली काठी सावरीत उमाजी नाईक पुढं झालां आणि कवाड ठोठावून म्हणाला, ''काय गडबड हाय आत? कवाड खोला बघू!'' पण आतून एक नाही, दोन नाही. रडण्याचा गोंधळ चालूच.

''तसं खोला म्हणून खोलणार नाही कुणी उमाजी, उचलून बाजूला ठेव कवाड'' कोणी सूचना केली.

पण एवढ्यात कवाड खोललं गेलं आणि बाबाखानाची दहा-बारा वर्षाची कळती पोरगी, वर्षभराच्या भावाला कडेवर घेऊन बाहेर आली. ती हुंदके देत होती. ते पोरगं किंचाळत होतं.



©KTBS Not to be republished



© KTBS Not to be republished

तिच्या दंडाला धरून उमाजी म्हणाला- ''का झालं. ग पोरी, का वराडतियास?''

पण पोरगी काही न सांगता जास्तच हुंदके देऊ लागली. आसपासचे लोक पुढं सरसावले आणि वैदूच्या कुड्यागत त्यांनी तिला येरगटली.

''अग वराडतियास का? सांग की काय झालं ते?''

'दोन हुंदं द्या पाठीत म्हणजे बोलंल!''

''अरं नका रं लेकराला. सांग बाई का झालं?''

प्रश्नांचा भडिमार झाला आणि मग स्फुंदत तिनं सांगितलं - ''बाबानं आईला मारलं लई''.

''का झालं?'' नीट ऐकू न आल्यामुळं एकजण ठसकला.

त्याला परस्परच उत्तर मिळालं-''हात् त्येच्या! अरं दरवेश्यानं आपल्या बायकुला मारलं!''

काही तरी भयंकर बघण्या - ऐकण्यासाठी फसफसलेली मनं उतू जात असलेल्या दुधावर पाण्याचा सपकारा बसावा तशी खाली बसली.

प्रश्नच मिटला. नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं, तक्रार न्यायची कुणाकडं? नवरा-बायकोच्या भांडणात कोण काय बोलणार? तरी पण कशाची तरी शिकार करण्याची सुप्तवृत्ती उफाळलेली. मग दरवेश्याला फैलावर का घेऊ नये? एकजण घोगऱ्या आवाजात ओरडला - ''बाबाखान, बाहेर ये आतनं. काय तक्रार हाय तुझी? अशी रात्री - अपरात्री काय म्हणून बडवलीस बायकोला?''

पण बाबाखान आत, अंधारात गपचिप बसून होता. रडण्याचा आवाजही बंद झाला. आतून काही उत्तर येत नाही हे पाहून स्वतःला वाजवीपेक्षा जास्त शहाणी समजत असलेली एक प्रौढ कुळंबीण मोठ्या सात्त्विक संतापानं बोलली - ''आतनं ओढून काढून चेचा की मुड्याला. बाईल भोळसट घावलिया आन् ह्यो खवीस जवा तवा लाथा घालतुया तिला. बाइलीभोवतीच आलाय् मुड्याचा खवीसपणा!''

''आणि मग दहा घरची दहा तोंडं बोलू लागली - ''दाणे मागून जगतुया इथं, पोटाला मिळतंय् म्हणून माजलाया.''

'द्या की पेकाटात लाथ घालून हाकलून गावाबाहेर''

''द्वाड, उटलं सुटलं काय तरी खुसपाट काढून त्या बायकुला ढोरावानी घालतोय काट्या. बरी घावलिया गरीब. माज्यावानी एखादी असती तर टकुऱ्यात धोंडा घालून जीवच घेतला असता असल्या दादल्याचा!''

''अरे ए बायल्या, बाहेर ये, दातखीळ का बसलीय् तुजी!''

सगळेजण नाही नाही ते बोलले. पण बाबाखाननं आतून हूं का चू केलं नाही. कशाला करील?

©KTBS Not to be republished

गावातल्या भाकरीवर जगत होता तो. दातखीळ बसल्यासारखा तो अंधारात गपचिप बसून होता. सारे शिव्याशाप ऐकून घेत होता. अखेर कोणी समंजस बोलला,

'द्या सोडून! नवरा बायकोची कलागत. मरंनात का तिकडं!'

त्यावर 'तसं कसं? सकाळी चावडीवर बोलावून घ्या असं बोलत बोलतंच एक एक जण घराकडं वळला. मीही वळून चालता झालो!

हा बाबाखान दरवेशी मोठा हिरवट टाळक्याचा माणूस होता. पण सामान्यतः इतरांशी त्याची वागणूक तशी काही वावगी नव्हती. पाच वर्षाच्या पोराला सुद्धा तो सरकार, हुजूर असं संबोधी. मोठ्या आदबीनं वागे, इथं येऊन त्याला आठ पंधरा दिवस झाले होते. ऐन सुगीचा मोका गाठून तो उतरला होता. बेट्याचा खटलाही मोठा. बायको, सहा-सात पोरं, घोडं, म्हैस, कुत्रं आणि अस्वल एवढ्यांचा पोशिंदा होता तो. पाटलाच्या हातापाया पडून त्यानं त्याचं एक मोकळं, छप्पर मागून घेतलं होतं, आणि त्यात आपलं बिऱ्हाड टाकलं होत. अस्वल घेऊन तो वाड्या-वस्त्या धुंडी आणि मनगटातली लोखंडाची कडी वाजवून म्हणे-''खडे रहो बेटा, बंदूक घेऊन लढाईला चालला गंगाराम, ओ हो रे गंगाराम, शाबास गंगाराम!'' असं ओरडून ओरडून त्या गयाळ प्राण्याचा खेळ करी. पायली पायली जोंधळे उकळी. सुगीचे दिवस. कुणब्याच्या घरी खांडापर्यंत धान्याच्या ठेली लागलेल्या. त्यामुळं उदं म्हणता त्याचं पात्र भरे. शिवाय देवऋषीपणाचा छुपा धंदाही तो करी. अडाणी बायाबापड्यांना हव्या त्या थापा देऊन लुबाडी.

बाबाखानच्या वागण्याचा झोकही तसाच. अंगापिंडानं तो चांगला टणक होता. आणि गाजरासारखा लाल. त्याच्या तोंडावर देवीचे वण होते आणि एक डोळा बारीक करून बोलण्याची त्याला सवय होती. भडक हिरव्या रंगाचा कोसला पटका खुबीनं एका कलावर बांधलेला. अंगात रंगीत कापडाची मुंडेछाट पैरण, तिला चांदीची बटणं. खाली भारी किमतीचं धोतर आणि पायात गोंड्याचं पायताण, मोठं झोकात वागणं असं त्यांचं. आणि बोलणं खडीसाखरेच्या खड्यागत गोड. कुठंही वाटेत गाठ पडली की आदबीनं वाकून तो म्हणे-''सलाम हुजूर, कुणीकडे निघाले पाय?''

त्याच्या त्या आदबीनं ऐकणाराही खूष होई आणि म्हणे -

''राम राम बाबाखान, कसं काय?''

''हां सरकार, तुमच्या पायाच्या आधारानं ठीक चाललंय.''

''आणि नुसतं अस्वलच दिसतंय् तुझ्यापाशी. वाघ नाही का?''

''वाघ खर्ची पडला मागल्या साली. नवीन जनावर मिळत नाही आणि त्याची उसाभरही दांडगी. या महागाईच्या दिवसात आपलंच पोट भरण्याची पंचाईत, मग त्याला कुठं सांभाळू? अस्वलाची गोष्ट वेगळी. त्याला काय मांस लागत नाही, काही नाही. शेरभराच्या कण्या भरडून शिजवल्या म्हणजे त्याच्यावर भागतं काम.''

©KTBS Not to be republished

या मिठ्ठास बोलण्याबरोबर आणखीही एक कसब बाबाखानपाशी होतं. तो उत्तम 'भेदिक' म्हणणारा होता. खेड्यातील लोकांना 'भेदिक' गाण्याचा शोक दांडगा. बाबाखानपाशी तानाजीच्या पोवाडयापासून तो परब्रह्म, माया, प्रकृतीपर्यंतच्या सर्वगाण्यांचा साठा होता. ऐकणाऱ्या मंडळींची लायकी हेरून तो कधी तानाजीचा पोवाडा तर कधी रामायणातील मारूती जन्मावरचं गाणं लावी. सुरत्या चांगला असला म्हणजे गाणं झकास रंगे. मारूतीच्या देवळापुढील पटांगणात बाबाखानचं गाणं ऐकत शौकीन मंडळी रात्रीच्या रात्री उजाडवीत. त्याच्या या कसबामुळं आसपासच्या पाच-पंचवीस खेडयांत तो सर्वांना म्हाजूर होता.

पुढं पुढं बाबाखाननं रात्री अपरात्री बायकोस झोडायचं आणि तिनं भला मोठा गळा काढायचा हे प्रकरण नित्याचच झालं. कुणी बाबाखानला त्या संबंधी विचारलं तर तो हसून बोलायचा-''काय सरकार, मला तरी काय वेड लागलंय् होय उगीचच मारायला! भोळसट आहे. काय तरी करून बसती. टकुऱ्याला जास्त त्रास झाला म्हणजे हाणतो झालं दोन तडाखे.''

आणि नाही तरी बाबाखानची बायको वेडसरच होती. वेडसर म्हणण्यापेक्षा भोळीभाबडी म्हणा. वेडंबागडं रूप; झिंज्या सदा विस्फारलेल्या. अंगावर कसं तरी गुंडाळलेलं सुडकं, बाबाखानची बायको म्हणजे खरोखरच एक ध्यान होतं. पोरांचं लेंढार मागं घेऊन ती कुठंतरी भटकत असे गावात. बाबाखानला पोरंही उदंड. तीन पोरी आणि चार पोरं. त्यातली निम्मी अधिक आई सारखी वेडीविद्री होती. पण थोरली एक पोरगी आणि धाकटं एक पोर दिसायला चांगलं होतं. म्हशीमागून रानोमाळ चिंध्या उडवीत हिंडताना त्यांना पाहिलं की मला नेहमी वाटायचं, न्हाऊ माखू घातलं आणि एखादं धुवट चिरगूट अंगावर घातलं तर ही पोरं एखाद्या कोकणस्थ ब्राह्मणाच्या मुलांच्या तोंडात मारतील रूपानं!

पोरांचं ते लेंढार पाहून कोणी बाबाखानला विचारलं की - ''बाबाखान, चिगोर बराच दिसतोय गड्या!''

तर बाबाखान एक डोळा बारीक करून आणि आपलं नेहमीचं हसू तोंडावर आणून म्हणायचा- ''असू द्या मायबाप, अल्लाघरचा पानमळा हाय. आपल्या हातात काय त्याचं !''

पण बिथरला म्हणजे बाबाखान या अल्लाघरच्या पानमळ्याला गुरासारखा बदडायचा. त्याचं काळीज काय दगडाचं होतं की काय कोण जाणे! त्यामुळं तो गावातल्या लोकांशी जरी नीट वागे तरी त्याचा देवऋषीपणा, मंत्रतंत्र, उग्रमुद्रा आणि तापट स्वभाव यामुळं बाबाखान म्हणजे हिरवट टाळक्याचा माणूस अशी गावकऱ्यांची समजूत होऊन चुकली होती.

आमच्या वाड्याला लागूनच बाबाखानचं बिऱ्हाड होतं. छपरात त्याचा गाडग्यामडक्यांचा संसार आणि दाराला लागूनच एका बाजूला अस्वल डांबलेलं. नाकातली वेसण पुढच्या बाजूच्या खुंट्याला आणि मागला एक पाय मागल्या खुंट्याला जखडलेला. त्या अपुऱ्या जागेत ते गचाळ नि गलिच्छ जनावर सदान्कदा तोंडानं चमत्कारिक आवाज करीत झुलत असायचं. त्याच्या अवतीभवती नेहमीच बाळगोपाळांची गर्दी. मजेखातर एखाद्यानं खडा फेकून मारला की, वसकन् ते अंगावर येई. तशा गुलामगिरीतही त्याच्या अंगातली गुर्मी कमी झाली नव्हती.

©KTBS Not to be republished

एके दिवशी भर दुपारचं अंगणातल्या लिंबाखाली सतरंजी टाकून मी पुस्तक वाचीत पडलो होतो, आणि एकाएकी बाबाखानच्या घराकडून बोंब ऐकू आली. आणि त्याची थोरली पोरगी मोठ्यानं कोकलू लागली.

''मेलं मेलं, पोरगं अस्वलानं मारलं!'' मी धावत बाहेर गेलो.

बघतो तर बाबाखानचं वर्षा-दीड वर्षाचं पोर अस्वलानं पुढच्या दोन पंजात धरलेलं आणि ते त्याला घुसळत आहे.

लांब उभी राहून पोरगी ओरडत होती आणि ते पोरगं किंचाळत होतं. पोरीचा तो ओरडा ऐकून दळायला गेलेली बाबाखानची बायको आरडत ओरडत आली आणि सपाट्यानं पुढं होऊन तिनं पोरगं अस्वलाच्या पंजातून ओढून घेतलं!

माणसं जमा झाली आणि कोकलू लागली.

''बरं तर बरं - पोर मेलं असतं आज!''

''आन् या गाढवाला कळू नये का, अस्वल जाण्यायेण्याच्या वाटेवर बांधलय ते!''

''अगऽऽबया, पोराला ओरबाडून काढलंय् नुसतं. आन् बाई तू ग कुटं गेली हुतीस पोरगं एकलं टाकून?''

दरवेश्याच्या बायकोनं पोरगं छातीशी घट्ट धरलं होतं. तिचं कपाळ डबडबलं होतं. रडवेल्यापणे ती बोलली-

''अव, थोरली पोरगी हुती घरात; तिला ध्यान ठेवायला सांगून मी गेले दळायला चौगुल्याच्या जात्यावर. मला काय ठावं ही पोरगी असं इसंबतिया ते!''

ही भाषा चालली होती एवढ्यात बाबाखान सणाट्यानं तिथं येऊन दाखल झाला. तो कुठं राम ेशवाड्यापाशी गप्पा हाणत बसला होता. कुणीसं सांगितलं की, पोरगं अस्वलानं धरलं तेव्हा धावत आला.

मला वाटलं की, आता त्या अस्वलाची आणि बाईची आली कंबक्ती. हा हिरवट माणूस धोंडा उचलून डोक्यात घालायला मागंपुढं पाहणार नाही.

''किं गे, क्या हुया?'' असं दरडावून म्हणत तो बायकोपाशी गेला. त्यानं तिच्या हातून पोरगं घेतलं आणि त्याच्या पाठीवरल्या ओरखड्यावरून हात फिरवून तो बायकोवर पुन्हा खेकसला-

''तू कुठं गेली हुतीस बोंबलत? मेलं असतं पोरगं आज. जनावरच ते, त्याला काय. घोळसून मारलं असतं पोर!''

त्याची ही सरबत्ती चालू होती एवढ्यात जमलेल्या मंडळीतून कुणीसं त्याला डाफरलं-''लेका, पण तुला किती गडया अन्नू? उंबऱ्याजवळ कुणी बांधतं का असलं जनावर? पोरंबाळं जायची यायची!''

बाबाखान रागानं लाल झाला होता. त्याचे डोळे तांबडेलाल झाले होते. पोरगं बायकोच्याकडं टाकून तो आत गेला आणि मनगटासारखं एक टिक्कार घेऊन बाहेर आला, त्या अस्वलाकडं वळला.

©KTBS Not to be republished

मी मनात म्हणालो - मरतंय आता अस्वल! पण बाबाखाननं अस्वलाला मारलं नाही. त्यानं हातात काठी घेतली ती केवळ बुजगावणं म्हणून. केवळ त्यानं ते जनावर त्या जागेवरून सोडून जरा अंतरावर बांधलं. एक हलकीशी काठी सुद्धा बाबाखाननं मारली नाही!

या प्रकारानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी राखुंडीनं दात घाशीत मी दरवाजात उभा होतो. समोर दोन कोंबडे अटीतटीने एकमेकांशी झुंजत होते. तो सामना पाहात होतो. एवढ्यात बाबाखान तिकडून आला.

''सलाम सरकार, काय लढत बघताय मुर्ग्यांची?''

''राम राम! होय बाबाखान. बघ की काय इरेला पडलेत दोघेही. तुझ्यावाणी तापट दिसतात बेटे!''

बाबाखान ओशाळून हसला.

''बाबाखान, मोठा चमत्कारिक माणूस दिसतोय गड्या तू?''

''कसूर माफ असावी सरकार, काय चुकी घडली?''

''अरे, गृहस्था, एवढ्याशा कारणावरून बायकोला ढोरासारखा तुडवतोस आणि काल ते जनावर पोटच्या पोराला जीवं मारीत होतं तर त्याला चार बोटांनी शिवला सुद्धा नाहीस?''

माझ्यासारख्या माणसाकडून असले प्रश्न विचारले गेले म्हणून खरोखरीच बाबाखान अति खजील झाला होता! तरी तो पक्का खरा. हसून आणि एक डोळा बारीक करून म्हणतो काय-

''हुजूर, बायको काय एक मेली तरी दुसरी मिळेल. पण काल जर का रागाच्या तावात हाणलं असतं आणि वर्मी टोला लागून जनावर पटकन् मेलं असतं तर कुणाला विचारायचं होतं? शिकलंसवरलेलं जनावर मिळणं कठीण. आणि ते हाय् म्हणून जगतोय्!''

**शब्दार्थ :**

■ येरगटणे - गुरफटणे ■ आदाब - वंदन, मुजरा ■ कालवा - गर्दी ■ गहिवर मांडणे - कंठ दाटून येणे ■ सद्‌गदित होणे - दु:ख व्यक्त करणे ■ रामोशी - एक जात ■ दरवेशी - अस्वलाचा खेळ दाखवणारा ■ दगावणे - मरण पावणे ■ कवाड - दार ■ कल्लोळ - आरडा ओरडा ■ हुंदके देणे - रडण्याचा उमाळा ■ वैदू - वनस्पती औषधे देणारा ■ हुंदं - हिसडा मारणे ■ कलागत - भांडण ■ हिरवट - चिडखोर, तिरसट ■ ओशाळणे - लज्जित होणे ■ इरेला पडणे - इर्षेला पडणे पकाळीज - अंत:करण ■ गुर्मी - मगरूरी ■ खर्ची पडणे - संपणे ■ मन उतू जाणे - मन भरून येणे ■ धोंडा घालणे - घात करणे

©KTBS Not to be republished

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) बाबाखानने कोणता प्राणी पाळला होता?**

(अ) माकड (ब) अस्वल

(क) कुत्रा (ड) वाघ

**(आ) त्याच्या अस्वलाचे खाद्य कोणते होते?**

(अ) गवत (ब) मांस

(क) शेरभर भरडलेल्या कण्या (ड) झाडांची फळे

**(इ) बाबाखान हा कोण होता?**

(अ) कलाकार (ब) भांडखोर

(क) दरवेशी (ड) वेडा

**(ई) बाबाखानने अस्वल कोठे बांधले होते?**

(अ) येण्या जाण्याच्या रस्त्यात (ब) झाडाखाली

(क) घरापासून दूर (ड) देवळापाशी

**(उ) बाबाखानने अस्वलाला का मारले नाही?**

(अ) ते त्याचे उदरनिर्वाहाचे साधन होते (ब) ते त्याने पाळले होते.

(क) ते त्याचे काम करत असे (ड) ते त्याला प्रिय होते.

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) दरवेश्याच्या घरापुढं माणसे का जमा झाली होती?

(आ) दरवेश्याचे नाव या पाठात काय आहे?

(इ) बाबाखानने अस्वल का पाळले होते?

(ई) बाबाखानला 'हिरवट टाळक्याचा' असे का म्हटले आहे?

(उ) बाबाखानला राहायला घर कोणी दिले होते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दरवेशी, हा कोण होता ? तो पोटासाठी काय करत असे?

(आ) बाबाखानच्या अंगी कोणकोणते कसब होते?

(इ) बाबाखान लेखकाच्या गावी का आला होता?



©KTBS Not to be republished

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''आन् या गाढवाला कळू नये का? अस्वल जाण्यायेण्याच्या वाटेवर बांधलंय ते!''

(आ) ''शिकलंसवरलेलं जनावर मिळणं कठीणं. आणि ते हाय् म्हणून जगतोय्!''

(इ) ''नवऱ्यानं मारलं आणि पावसानं झोडपलं तर तक्रार न्यायची कुणाकडं.?''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) बाबाखान दरवेश्याच्या स्वभावाचे वर्णन करा.

(आ) अस्वलाच्या खेळाचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) बाबाखानने अस्वलाचा सांभाळ कशा प्रकारे केला होता?

(आ) बाबाखानच्या पत्नीचे वर्णन कसे केले आहे?

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

इरेला पडणे, गहिवर मांडणे, दगडाचे काळीज, गुर्मी असणे, गळा काढणे, खर्ची पडणे, मन उतू जाणे, धोंडा घालणे

**(आ) समानार्थी शब्द सांगा.**

कवाड, ओशाळणे, कसब, दगावणे, पुसणे, संबोधणे, आदब

**(इ) विग्रह करून समास ओळखा.**

उग्रमुद्रा, काळोखीरात्र, रानोमाळ, मायबाप, पोरंबाळं

**उपक्रम :**

- व्यंकटेश माडगूळकर यांचे 'माणदेशी माणसं' हे पुस्तक वाचा.
- नंदीबैलाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.
- गारूडी, माकडवाला, अस्वलाचे खेळ यांची चित्रे संग्रहीत करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| निर्माता | प्रगतिशील | जागतिकीकरण |
| क्षेपणास्त्र | दीक्षा | गृहस्थ |

©KTBS Not to be republished

# ९. वाचू आनंदे

**डॉ. स्नेहलता देशमुख**

**परिचय :**

डॉ. स्नेहलता देशमुख (जन्म 1938) शिक्षण एम.बी.बी.एस. व एम.एस. व्यक्तिगत आणि समाज स्वास्थ्याच्याही दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या असलेल्या वैद्यक आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात त्यांची अफाट मुशाफिरी आहे. लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या अधिष्ठाता पदाचा (डीन) कार्यभार त्यांनी प्रदीर्घकाळ सांभाळला. मुंबई विद्यापीठाच्या त्या पाच वर्षे कुलगुरु होत्या. देशभरातील विद्यापीठांचा दर्जा तपासणारी नॅक, मनःशक्ती केंद्र आदी सामाजिक संस्थांशी त्या सक्रिय संबंधित आहेत. साहित्यक्षेत्रातही त्यांची कामगिरी उल्लेखनीय आहे. 'अरे संस्कार संस्कार', 'गर्भसंस्कार तंत्र मंत्र', 'तंत्रयुगातील उमलती मने', 'लोकशाही जाणीव व जोखीम', 'अन्न संस्कार', 'टेक केअर', 'आई' इत्यादी संस्कारक्षम साहित्य प्रसिद्ध आहे.

'वाचू आनंदे' हा पाठ 'तंत्रयुगातील उमलती मने' या पुस्तकातून घेतला आहे. या पाठात लेखिकेने वाचनाचे महत्त्व सांगितले आहे.

**(मूल्य – वाचन आणि संस्काराचे महत्त्व)**

संस्कार म्हणजे गुणांचा गुणाकार आणि दुर्गुणांचा भागाकार, संस्कार म्हणजे सजगता, संवेदनशीलता, सहयोग, सुसंस्कृतता, सहमत, सहभाग, सहिष्णुता, सद्‌विचार आणि सद्‌विवेकबुध्दीने वागणे. आज आपण संक्रमण काळात आहोत. उत्तुंग आकाशाला गवसणी घालणाऱ्या इमारती आहेत, पण मन कुठंतरी हरवलंय, चंगळवाद वाढलाय, मानसिकता बदलतेय, पैसा हेच सर्वस्व वाटू लागलंय, आपल्या राहणीत झपाट्याने बदल होतोय. शिक्षणात बदल, आहारात बदल, वागणुकीत बदल, आचरणात बदल, एवढंच नाही तर विचारातही बदल मोठ्या झपाट्याने होतोय. जुन्या-रूढी परंपरा झुगारून आपण प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर पडताळून बघतो आहोत. आपले भूतपूर्व प्रेसिडेंट सर्वपल्ली राधाकृष्णन म्हणत, 'ज्ञानं विज्ञान सहित' विज्ञान आणि ज्ञान हे दोन्ही घटक अतिशय महत्त्वाचे. ज्ञानाला विज्ञानाचे डोळे असले म्हणजे प्रगती निश्चित म्हणून संस्कार हे विज्ञाननिष्ठ असावेत. जसे आपले सोळा संस्कार वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहायला हवेत. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. तेही संस्कारित असावे तर ते पचते, रुचते व उपयुक्त ठरते. असे अन्न शरीराचे पोषण करते तसेच वाचन मनाची शुद्धता राखते. मन प्रसन्न ठेवणे, प्रसन्न चित्तवृत्ती ठेवणे हे महत्त्वाचे. कारण आपले मन हे सगळ्या शरीराचे चालक आहे. ते प्रसन्न असले तर शरीर सुदृढ राहील. या मनाचे पोषण म्हणजे उत्तम वाचन, लेखन, मनन आणि चिंतन. वाचक असेल तरच लेखकाला लिहावेसे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शब्दात उद्‌धृत करायचे तर 'वाचाल तर वाचाल' हे अगदी तंतोतंत आचरणात आणायला हवे. वाचनाने प्रगल्भता येते. रोज काहीतरी वाचीत जावे असे माझे आजोबा मला वारंवार सांगत. आमच्याकडे ज्ञानेश्वरी, गीता, दासबोध, चरक संहिता, वाग्भट, सुभाषित कोश, गंगालहरी, शाकुंतल, रघुवंश हे दुर्मिळ पण उपयुक्त ग्रंथ होतेच. त्याचबरोबर वि. स. खांडेकर, प्र. के. अत्रे, महात्मा गांधी, लोकमान्य

©KTBS Not to be republished

टिळक, वि.दा. सावरकर यांचेही अत्युत्तम लिखाण संग्रहित होते. आजोबा स्वतः संस्कृत पंडित. वाचनाची आवड अर्थातच घरातच. हे वाचन संस्कार आमच्यावर घडले. माझ्या मते पुस्तक वाचन म्हणजे इतिहासाचा मागोवा आणि भविष्याचा  कानोसा. इजिप्तमध्ये पॅपिरस ग्रंथ, आपल्याकडले चरक सुश्रुत, मार्कंडेय पुराण, अष्टादश महापुराणांपैकी एक तसेच अनेक भाषांमधील प्राचीन ग्रंथ, ताम्रपट, शिलालेख, पानांवर लिहिलेले लेख यातून आपल्याला आपल्या भूतकाळाची माहिती मिळते.




आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात संगणक हा अविभाज्य घटक आहे. त्यातही कितीतरी बदल होत गेले. सबंध खोली व्यापणाऱ्या संगणकापासून ते आता हाताच्या तळव्यात मावणाऱ्या संगणकापर्यंत प्रगती झाली. त्यामध्ये बदल झाले. हार्ड डिस्क, फ्लॉपी, कॉम्पॅक्ट डिस्क असेही बदल झाले ; परंतु आपण दूरविचार केला तर हे कितपत शाश्वत आहे असे मनात येते. उत्खननामध्ये शिलालेख, ताम्रपट मिळाले हे संस्कृतीचे द्योतक होते. यावरून त्या काळाची माहिती मिळविणे शक्य झाले. परंतु तसं या कॉम्पॅक्ट डिस्कचे करता येईल का याची खात्री नाही. आज एका संगणकाचे दुसऱ्याशी जमेल असे नाही. काहींचे संबंध दुराव्याचे असतात तर काहींचे सूरच जुळत नाहीत. या अडचणी वाचनात येत नाहीत. एकदा का भाषा वाचता येऊ लागली की वाचायला अडथळा कोणताच नाही.

150 वर्षापूर्वी विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी त्यांच्या निबंधमालेत लिहिलेला 'वाचन' हा लेख आज मी वाचते तेव्हा त्यांच्याविषयीचा आदर दुणावतो. कारण वाचन ही 64 कलांपैकी एककला आहे असे ते नमूद करतात ते पटते. कवी ब्राऊनिंगही म्हणतो ते सुद्धा जिवाला भिडते. तो म्हणतो, 'कविता करतो तेव्हा

©KTBS Not to be republished

ती माझी असते पण एकदा का ती कागदावर उतरली की ती लोकांची होते.' किती खरंय हे! लेखक किंवा कवी लिहितो तेव्हा ते वाचकांनी वाचावे म्हणून. चोखंदळ वाचकांवर तो प्रेम करतो आणि लिहीत जातो. वाचायला डोळे लागतात तर ते ग्रहण करायला बुद्धी लागते. या दोहोंचा मेळ बसायला हवा, तरच वाचनाने मन समृद्ध व शांत होईल. वाचनाचा एकदा का छंद लागला की त्या वाचकाला कसलेच भान राहात नाही. मग तो वाचनाने बहुश्रुत झालेला ज्याला इंग्रजीत वेल रेड म्हणतात तो सर्वांना हवाहवासा वाटतो. वाचण्याचे किती फायदे म्हणून सांगू! ज्ञानाचा साठा मिळतो, जो दिल्याने वृद्धिंगत होतो. नवनवीन विचार सुचतात, चित्तवृत्ती उल्हसित होतात, मनाला भरारी मारण्याचे बळ येते; आणि मुलांना हा वाचन संस्कृतीचा ठेवा देता येतो; जो त्याने जतन करून वर्धिष्णु करायचा असतो. म्हणजे त्याचा माणूस घडविण्यासाठी उपयोग होतो. आम्ही डॉक्टर लोक नेहमी साथीचे रोग पसरू नयेत म्हणून खबरदारीचे उपाय सुचवीत असतो. पण वाचनसंस्कृतीची 'साथ' मात्र आम्हाला हवीहवीशी वाटते. कारण वाचन करणारा एक माणूस चारजणांना वाचनाची गोडी लावू शकतो. माझ्या एका वाचनालयाच्या मैत्रिणीने सुसंस्कारित वाचन चळवळ सुरू केली. तिला आवडलेल्या एका पुस्तकाचा शेवट ती मुलांना सांगत असे. पुस्तक घेऊन वाचावेसे वाटावे असे तिचे संवाद कौशल्य होते. साहजिकच मुलांना पुस्तक वाचायची आवड निर्माण न झाली तरच नवल. लहानपणीच हे वाचनसंस्कार झाले एवढेच नव्हे तर बाळ गर्भावस्थेत असताना वाचनसंस्कार झाले तर पुढील आयुष्यात त्या बाळाचं व्यक्तिमत्त्व घडवण्यात वाचनाचा सिंहाचा वाटा असतो. वाचनाने विद्यार्थी स्वत्वाचा व सत्त्वाचा विचार करायला शिकतो. काय वाचावे, कधी वाचावे, किती वाचावे, कुठं वाचावे, कशासाठी वाचावे? तर माणुसकी जपण्यासाठी वाचावे, कुठेही वाचावे, वेळ मिळेल तेव्हा नव्हे तर वेळ काढून वाचावे. वाचनाला मर्यादाच नाही. आकंठ वाचावे, ते स्मरावे, चिंतावे आणि वाचन संस्कार दुसऱ्याला दान करावा. बहिणाबाईंनी छान चार ओळी लिहिल्यात,

''अरे छापीसनी आलं, मानसाले समजलं

छापीसनी जे राह्यलं, देयालेच उमजलं.''

मुलांवर आज इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा पगडा आहे. दृक्श्राव्य माध्यम हे जास्त लोकप्रिय आहे; परंतु तरीसुध्दा वृत्तपत्रांचे महत्त्व कमी होत नाही. एखादी बातमी टेलिव्हिजनवर दाखविली तर ती क्षणिक आपल्या मनावर परिणामकारक ठरते. परंतु तीच बातमी विस्ताराने दुसऱ्या दिवशी संपादकाच्या मतासकट वाचताना जास्त परिणामकारक ठरते. वृत्तपत्रातले अनेक उपयुक्त स्तंभ लहानथोरांच्या ज्ञानात भर घालतात. चांगली वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके, पुस्तके, काव्य हे सगळेच वाचनीय, मननीय, चिंतनीय ठरते. पुस्तकाचा स्पर्श, त्याचे साजरे गोजरे रंग, रूप, रस, गंध सगळेच काही साठवता येते. ज्या मुलांना पुस्तके, मासिके सतत वाचायची सवय असते. ती मुलं प्रगल्भ होतात असे पाहण्यात आले. पुस्तकांशी मानसिक, भावनिक जवळीक साधणारी मुले विचारी आढळली. वाचनालयात जाणारी मुले साधारणतः शांत स्वभावाची निपजली. गर्भावस्थेत बाळाच्या आईने वाचन केले, मनन केले, चिंतन केले व गर्भाशी संवाद साधला तर गर्भावर निश्चित चांगला परिणाम होतो. त्याचा भावनिक बुद्ध्यांक उत्तम असतो असा निष्कर्ष आमच्या प्रयोगाद्वारे सिद्ध झालाय.

©KTBS Not to be republished

एका प्रथितयश उद्योजकाने आपल्या चार मुलांना त्यांना पुढे काय व्हायचे असे विचारले. पहिला मुलगा म्हणाला, डॉक्टर व्हायचंय, दुसऱ्याला इंजिनिअर व्हायचे होते तर तिसऱ्याला आय.ए.एस. करायचे होते. चौथा पुत्र म्हणाला मला समजून घ्यायचे आहे. साहजिकच वडील चकित होऊन म्हणाले, काय समजून घ्यायचेय ? तेव्हा पुत्राने उत्तर दिले, मला माणसं समजून घ्यायचीत तसं शिक्षण हवंय. हा मुलगा सुसंस्कारित होता; कारण त्याने अनेक ग्रंथ वाचले होते. आज खरंच, माणुसकी जपायला वाचन संस्कारच उपयुक्त ठरतील. त्याचप्रमाणे बालक-पालक संवादही घडायला हवा. आईवडिलांनी वाचलेले मुलांना सांगावे व मुलांनी वाचलेले, अनुभवलेले आईवडिलांना सांगावे. घरात मनमोकळी हसत खेळत चर्चा व्हावी.

वाचन कमी होतंय, संवाद कमी होतायत असं न म्हणता सुसंस्कारित वाचन घडावं. जसं सुसंगती सदा घडो सुजनवाक्य कानी पडो तसंच सुसंस्कारित वाचन घडो अशी प्रार्थना करावीशी वाटते.

**शब्दार्थ :**

■ उद्‌धृत करणे - उतरवून घेणे ■ प्रगल्भता - परिपक्वता ■ अष्टादश महापुराणे - अठरा पुराणे ■ द्योतक - प्रतीक प चोखंदळ - चिकित्सक ■ वर्धिष्णु - वाढणारा

**टीपा :**

■ चरक संहिता - चरक संहिता नावाचा आयुर्वेद शास्त्रावरील उत्कृष्ट ग्रंथ.

■ वाग्भट - प्राचीन काळातील आयुर्वेद शास्त्रातील पारंगत वैद्य.

■ गंगालहरी - जगन्नाथ पंडित यानी गंगालहरी हे काव्य लिहिले. यात गंगानदीचे महत्त्व वर्णन केले आहे.

■ शाकुंतल - संस्कृत साहित्यातील महाकवी कालिदासाने 'अभिज्ञान शाकुंतलम'' नावाचे उत्कृष्ट नाटक लिहिले.

■ रघुवंश - महाकवी कालिदासाने लिहिलेले हे महाकाव्य आहे. रघुवंश म्हणजे प्रभू रामचंद्राच्या वंशातील राजे लोकांच्या पराक्रमाचे व सदाचाराचे वर्णन केलेले काव्य.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) आपण प्रत्येक गोष्ट याच्या कसोटीवर पडताळून बघत आहोत.**

(अ) धर्माच्या (ब) विज्ञानाच्या

(क) लोकमताच्या (ड) देवाच्या

©KTBS Not to be republished

**आ) 'वाचाल तर वाचाल' असे यानी म्हटले आहे.**

(अ) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

(क) वि.दा. सावरकर (ड) लोकमान्य टिळक

**(इ) माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात हा अविभाज्य घटक आहे.**

(अ) मोबाईल (ब) दूरदर्शन

(क) संगणक (ड) रेडिओ

**(ई) आज मुलांच्या मनांवर या माध्यमाचा पगडा आहे.**

(अ) इलेक्ट्रॉनिक (ब) तंत्रज्ञान

(क) यंत्रज्ञान (ड) मंत्रज्ञान

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) संस्कार म्हणजे काय?

(आ) आजकाल माणसाचे सर्वस्व कोणते?

(इ) पूर्णब्रह्म असे कशाला म्हटले आहे?

(ई) लेखिकेवर वाचन संस्कार कोठे घडले?

(उ) मनाचे पोषण कशामुळे होते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मुलांचा भावनिक बुद्ध्यांक उत्तम असतो हे कोणत्या प्रयोगाने सिद्ध केले आहे?

(आ) आपल्याला भूतकाळाची माहिती कशावरून मिळते?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''ज्ञान विज्ञानं सहित''

(आ) ''कविता करतो तेव्हा ती माझी असते पण एकदा का ती कागदावर उतरली की ती लोकांची होते.''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) आजच्या परिस्थितीचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे?

(आ) लेखिकेच्या मैत्रिणीने वाचनाची साथ कशी पसरविली?

Not to be republished ©KTBS

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) उद्योजकाने आपल्या मुलांना काय विचारले? मुलांनी त्यांना कोण कोणती उत्तरे दिली?

(आ) लेखिकेने वाचनाचे महत्त्व कसे स्पष्ट केले आहे?

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

आकाशाला गवसणी घालणे, झुगारून देणे, पगडा असणे, चकित होणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

चित्त, डोळे, बळ, गोडी, स्मरण, गंध, आयुष्य

**उपक्रम :**

- डॉ. स्नेहलता देशमुख यांचे 'अरे संस्कार संस्कार' हे पुस्तक मिळवून वाचा.
- विद्यार्थ्यांनी शाळेत प्रार्थनेच्या वेळी संस्कारक्षम कथांचे व बोधकथांचे वाचन करावे.
- 'वाचाल तर वाचाल' या विषयावर 10 ओळी लेखन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| उफराटा | क्रिया | धूपारती |
| गाऊन | दुर्भिक्ष | नियतकालिके |

©KTBS Not to be republished

# १०. उडती तबकडी आणि अफलातून टोळी

**डॉ. जयंत नारळीकर**

**परिचय :**

जयंत विष्णू नारळीकर (1938) हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ आहेत. ते विज्ञानकथाकार व कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र व विश्वरचना या तीन विषयावर विपुल स्फुट लेखन व ग्रंथलेखन त्यांनी केले आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाने पुणे या ठिकाणी इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनामी ॲंड ॲस्ट्रोफिजिक्स (आयुका) या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे संस्थापक व संचालक म्हणूनही नारळीकरानी उत्कृष्ट कार्य केले. त्यांनी या संस्थेला आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा दर्जा प्राप्त करून दिला. त्यांनी 'अंतराळातील भस्मासूर' 'खगोलशास्त्राचे विश्व' 'प्रेषित' 'यक्षाची देणगी' 'आकाशाशी जडले नाते' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. 'पद्मभूषण' पुरस्काराने ते सन्मानित आहेत.

'टाइम मशीनची किमया' या कथासंग्रहातून. ही कथा संक्षिप्त स्वरूपात घेतलेली आहे. धाडसी पिंट्या व त्याच्या सहकाऱ्यांनी मिळून उडत्या तबकडीसंबंधी घेततेला शोध हा रोमांचक अनुभव प्रस्तुत विज्ञानकथेत दिसून येतो.

**(मूल्य : चौकसबुध्दी, वैज्ञानिक दृष्टीकोन)**

गारगोटीपासून दोन मैलांवर एक मोडकळीस आलेली गढी होती, तिथे कोणी राहात नसे आणि भुताखेतांच्या गोष्टींमुळे तिकडे गावकरी जात नसत. गढीचे मालक मुंबईचे - ते तर कधीच तिकडे फिरकत नसत. अशा या गढीचे रहस्य शोधून काढायची कल्पना पिंट्याच्या डोक्यात शिजत होती, पण घडले वेगळेच!

गारगोटीला पोचल्यावर लली-पिंट्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. एरवी शांत असणाऱ्या त्या गावात पुष्कळच गडबड चालू होती! मोटारगाड्या, पत्रकार, पोलिस... प्रकार तरी काय होता? पिंट्याने टोळीची तातडीची सभा बोलावली. त्यांच्या घरामागल्या झाडीत ही सभा नेहमीप्रमाणे भरली. पिंट्याने विचारले,


''काय सुंदर, नवी बातमी काय आहे? गारगोटीत कसला गोंधळ माजलाय?''

''तुम्ही पुण्याच्या पेपरात वाचले नाही?'' आश्चर्याने सुंदर म्हणाला, ''परवा रात्री गारगोटीत उडती तबकडी उतरली होती....''

''उडती तबकडी? हा काय प्रकार आहे?'' लली उद्गारली तिला डोळ्यानेच दाबून पिंट्याने सुंदरला पुढे सांगण्यास खुणावले.

©KTBS Not to be republished

''आपला तो दामू गाडीवाला नव्हे का? त्याने पाहिली. तो अंधार पडत असताना गाडीतून येत होता. तर त्याला डोक्यावर आकाशात प्रकाश दिसला. त्याने पाहिले तर एक गोल गोल, चमकदार काहीतरी वर उडत होते आणि ते गढीकडे गेले. दामू तर भेदरलाच, पण त्याचे बैलदेखील उधळले. त्यांना आवरून शांत करीपर्यंत ती चकती अदृश्य झाली होती.''



''इतकेच?'' पिंट्याने विचारले.

''छे! छे! खरी मजा तर पुढेच आहे, आपला तो तालुक्यातला सुभानराव हवालदार आहे ना? तो ह्या भागात होता. त्याला म्हणे कोणीतरी सांगितले की, गढीत स्मगलर आहेत म्हणून. तो गढीपासून पाव मैलावर असतानाच त्याला पण आकाशातून गोल चकचकीत काहीतरी येताना दिसले. पाहता पाहता ते खाली उतरले आणि त्यातून दोन हिरवा पोशाख केलेली किंवा हिरवीच माणसे नाहीतर तशी दिसणारी कोणीतरी उतरून गढीत गेली.''

''आपल्याला तर हे ऐकूनच हुडहुडी भरली बुवा...''- बाजीराव.

''गप्प रे!'' - पिंट्या. ''सुंदर, पुढे काय झाले?''

''सुभानराव दबकत दबकत त्या यानाकडे गेला. त्याला खिडक्या-दारे नव्हती. पण मग ते जीव बाहेर कसे आले? सुभानराव गुप्त दार आहे का चाचपडून पाहू लागला. तर त्याला जबरदस्त धक्का बसला आणि तो

© KTBS Not to be republished

बेशुद्धच पडला... तो शुद्धीवर आला तेव्हा मध्यरात्र झाली होती. तो गढीच्या पटांगणात पडला होता आणि ते यान नाहीसे झाले होते.''

''मला तर ही सगळी परीकथाच वाटते. दामू आणि सुभानराव काहीतरी झोकून आले असतील.'' लली म्हणाली.

''नाही ग लले, गढीजवळ यानाच्या पायांचे ठसे स्पष्ट उमटलेले दिसतात ते काय दामू किंवा सुभानरावाच्या स्वप्नातले आहेत? शिवाय इतके पत्रकार आले तपासायला ते कसे? आणि दिल्लीतले व मुंबईतले काही पोलिस आणि तंत्रज्ञ आलेत फोटो-बिटो घ्यायला.'' चंपी म्हणाली.

''मग आपण देखील तपासणी करूया. अफलातून टोळीने काहीतरी करण्याजोगे इथे असले पाहिजे.'' पिंट्याने निर्णय घेतला.

''पिंट्या, तू म्हणतोस ते शक्य नाही. गढीच्या भोवताली पहारा आहे पोलिसांचा. ते यान उतरले त्याच्या भोवती तारेचे कुंपण केले आहे आणि तेथे पुष्कळ चौकीदार आहेत. आपण नाही बोवा जाणार तिकडे.''- बाजीराव.

''तुझे डोके चालव जरा. यातूनही मार्ग निघेल.'' पिंट्याच्या ऑर्डरवर बाजीरावाने डोके खाजवायला सुरुवात केली.

OOO

पिंट्या विचार करत रस्त्यातून जात असताना त्याच्या खांद्यावर थाप पडली. त्याने चमकून पाहिले.

''मन्यामामा, तू इकडे कसा?'' गुप्त पोलिसात उच्च जागेवर आपला मामा आहे हे पिंट्याला माहीत होते.

''उडती तबकडी गेली कुठे ते रहस्य उकलायला आलो मी. काय तुझी टोळी त्या कामात गुंतली असेल नाही का?'' मन्यामामाने हसत विचारले.

''होय, आम्ही पण त्यात लक्ष घालतोय!'' गंभीरपणे पिंट्या म्हणाला. ''मामा आपण परस्परांना मदत करू. तू आम्हाला माहिती पुरव. आम्ही तुला माहिती पुरवू.'' पिंट्याला काही खास बातमी मिळाल्यास पाहिजे होती.

''अस्सं! ठीक आहे. तुला काय माहिती पाहिजे सांग.'' मन्यामामा.

''यान उतरले तिथले फोटो.'' पिंट्या लगेच उद्गारला. मामाने खिशातून एक पुडके बाहेर काढले.

OOO

अफलातून टोळीची सभा भरली होती. पिंट्याने आपला रिपोर्ट दिला होता. त्यावर मेंबर लोक चर्चा करत होते. पिंट्या म्हणाला, ''फोटो पाहून मला तर सर्व प्रकाराबद्दल शंकाच येत आहे. यानाचे पाय बघा.

©KTBS Not to be republished

हे असल्या विचित्र खुणा करणारे पाय कसे असतील ? इतक्या वजनाचे यान घेणारे पाय असे टोकदार असणार नाहीत की जे यानाच्या वजनामुळे मातीत घुसावेत.''

''बरोबर आहे. त्या पायांना सपाट पॅड किंवा विमानासारखी चाके तरी पाहिजेत. आणि शिवाय सुभानरावाच्या जबानीत त्याने यान उतरताना तळाशी जाळ झालेला पाहिला. पण फोटोत यानाखालची वनस्पती जळलेली दिसत नाही. आणि दामू म्हणाला की त्याने यान पाहिले तेव्हा नुकताच सूर्यास्त झाला होता. आणि सुभानराव म्हणतो की, तो गढीपाशी गेला तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. सूर्य तर साडेसहालाच मावळतो. मग दीड तास ते यान काय करत होते ?'' बाजीरावाचे डोके उत्तम काम करत होते.

''आणि ते बाकीच्या गावकऱ्यांना-आम्हाला कोणाला का नाही दिसले ?'' सुंदरचा प्रश्न.

''आज रात्री आपण गढीजवळ जाऊन ह्या प्रश्नाचा छडा लावायचाच.'' पिंट्याने सर्वांना रात्रीच्या निजानिजीनंतर घरून हळूच बाहेर येऊन रात्री अकराला गावाच्या वेशीजवळ यायला सांगितले.

''बापरे! आज तर अमावास्या आहे!'' बाजीराव हादरले.

''तेच तर आपल्या पथ्यावर पडणार!'' पिंट्याने त्याला समजावले.

OOO

पोलिसांचा पहारा चुकवून ही टोळी गढीच्या मागच्या भागाशी गोळा झाली तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. पिंट्याकडचा टॉर्च मधून मधून प्रकाश देत होता. एरव्ही अंधारच अंधार. बाजीरावाचा हात सुंदरने धरला होता नाहीतर तो येथपर्यंत आलाच नसता. मागले दार बंद होते पण एका मोडक्या खिडकीतून ते सगळे गढीत शिरले. कोळ्याची जाळी, पक्ष्यांची घरटी, झोपलेली मांजरे यातून वाट काढत त्यांनी गढीच्या खोल्या-खोल्यांतून फिरायला सुरुवात केली. मधेच एखादे घुबड उडाले की, सुंदर बाजीरावाचा हात घट्ट दाबी. नाहीतर त्याने किंकाळीच फोडली असती.

''थांबा!'' पिंट्याने हळूच आज्ञा केली.

समोर एक लहान खोलीतून दाराच्या फटीतून हिरवट प्रकाश येत होता.

''बापरे ! भूऽऽऽत'' बाजीरावाचे तोंड सुंदरने दाबले. त्यांना थांबायची खूण करून पिंट्या एकटा पुढे गेला. त्याने दाराच्या फटीतून पाहिले.

खोलीत एक हिरवा कंदील होता, पण माणसे कोणी नव्हती. पिंट्याने परत येऊन सांगितले, ''मी आणि सुंदर त्या खोलीत लपून बसतो. लली आणि चंपी, तुम्ही मन्यामामाला बोलवून आणा ताबडतोब.''

''आणि मी ?'' बाजीरावाला एकटेपणाची भीती वाटत होती.



©KTBS Not to be republished

''बाजीराव, तू बाहेरून खोलीवर पाळत ठेव आणि योग्य वाटेल ते कर.'' किंचित नाखुषीने बाजीराव तेथून निघाला. त्याच्याकडे पिंट्याचा टॉर्च होता.

खोलीत रॉकेलचे डबे होते. त्यामागे पिंट्या आणि सुंदर लपून बसले.

आणि थोड्याच वेळात तीन माणसे त्या खोलीत आली. दोन माणसे सुंदरने ओळखली-दामू आणि सुभानराव. तिसरा सुटाबुटातला माणूस त्यांना दोघांनाही अपरिचित होता. तो दामूला म्हणाला,

''हे घे तुझे ठरलेले हजार रुपये आणि हे बघ, तू आपले डोके जास्त चालवू नकोस. तुला शिकवलंय तेवढेच पोलिसांना आणि बाकीच्यांना सांग. नाहीतर आपण सर्वच गोत्यात येऊ.'' मग तो हवालदाराकडे वळला. ''आणि सुभान्या, तुलाही तीच सूचना. तुझ्या पोलिसातील सहकाऱ्यांना तुझा संशय येता कामा नये.''

''पण साहेब, किती दिवस हे सगळे इकडे असणार? मला फार प्रश्न विचारून भंडावून सोडलंय सर्वांनी.'' सुभानराव.

''काही दिवस दम धर. मग हे लोक जाऊन टूरिस्ट लोक येतील, हे स्थळ पहायला. मग इथे आपली मजाच मजा. मी तुला इथला मॅनेजर करीन...''

हवालदारांनी छाती फुगवून मिशांवरून हात फिरवला. तो मॅनेजर होण्याची स्वप्ने बघत असतानाच सूटवाला पुढे म्हणाला.

''आणि तो भाला कुठे ठेवलास?''

''भाला? कुठला भाला? हवालदार भानावर आले.

''अरे मूर्खा! यानाच्या पायाच्या खुणा जमिनीत कोरायला मी दिला नव्हता का तुला? तो ह्या पत्रकारांना आणि बाहेरच्या तज्ज्ञांना सापडून उपयोग नाही.'' सूटवाला.

''होय साहेब, तो माझ्या घरामागच्या वडाखाली पुरून ठेवलाय.''

इतक्यात सुंदरला फटाककन् शिंक आली.

OOO

लली आणि चंपी मन्यामामाच्या जीपमधून उतरल्या तेव्हा बाजीराव पळतच तेथे आला. आधी त्याच्या तोंडातून शब्दच येईना.

''पिंट्या आणि सुंदर कुठे आहेत?'' ललीने घाबरून विचारले.

''तत-त त्यांना नेले.'' बाजीराव कसाबसा ओरडला.

''कोणी नेले, कसे नेले?'' मन्यामामाने त्याला खांद्याला धरून गदागदा हालवून विचारले.

''तिघे जण होते बुरखे घातलेले एका पांढऱ्या ॲम्बॅसिडरमधून गेले.'' बाजीराव.

©KTBS Not to be republished

''कार नंबर?'' मन्यामामाने तिघांना जीपमध्ये कोंबीत विचारले.

''अंधारात दिसला नाही. त्यांना संशय येईल म्हणून फार वेळ टॉर्च लावला नाही''- बाजीराव.

''इथे पांढऱ्या ॲम्बॅसिडर्स खूप आहेत.'' निराश स्वरात मन्यामामा म्हणाला. ''सापडायला वेळ लागेल.''

''वा! पण मी डोके वापरले ना? त्या कारवर मी आमच्या टोळीची खूण - रॉकेटचे चित्र-मागल्या बंपरवर काढलेय!''- बाजीराव अभिमानाने उद्गारला.

''शाबास!'' मन्यामामाने त्याच्या पाठीवर थाप मारून आपल्या जीपवरील ट्रान्समीटरमधून संदेश पाठवायला सुरुवात केली.

OOO

गोव्याच्या मार्गावर धावणारी पांढरी गाडी पोलिस चेक पॉइंटवर थांबली तेव्हा तिच्यातील चालकाला आणि प्रवाशांना पकडण्यात आले. कारण गाडीच्या बंपरवर होती रॉकेटची खूण! आणि 'बूट' मध्ये मुसक्या बांधलेले पिंट्या आणि सुंदर सापडले.

काही तासांनी मन्यामामा उगवला. पिंट्या आणि सुंदर सुखरूप आहेत याची खात्री करून त्याने त्या तिघा कैद्यांना प्रश्न विचारायला सुरुवात केली. तीन तास झाल्यावर तो बाहेर आला तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर खुशी दिसत होती. पिंट्या आणि सुंदर टपूनच बसले होते त्याची वाट पाहात.

''हाँ मन्यामामा! आपल्या कराराप्रमाणे आम्हाला कळले पाहिजे त्या तिघांनी काय सांगितले ते. आमच्या टोळीनेच तिघांना पकडून दिले नाही का?'' पिंट्याने मामाला लांबूनच खडसावले -''मग मी कुठे नाही म्हणतोय! ऐक तर, उडती तबकडी वगैरे प्रकार 'सब झूट' होता. तो सर्व डाव रचला होता गढीच्या मालकांनी - रामसिंघानी यांनी. तेच हे सुटातले गृहस्थ. त्यांना वाटले की, जर आपल्या गढीजवळ उडती तबकडी उतरली होती हे जगजाहीर झाले तर ह्या जागेला खूप प्रसिद्धी मिळेल. महत्त्वाची जागा म्हणून पाहायला लांबून लोक येतील. मग त्यांच्या सरबराईकरता सरकार ह्या भागात छान रस्ते बांधेल, वीजपुरवठा वाढवेल. तसेच दुकानांचा, हॉटेलांचा खप वाढेल. जमिनीच्या किमती वाढतील. आणि इथल्या जमिनी, दुकाने वगैरे रामसिंघानींची असल्याने ते मालामाल होणार हे नक्कीच....''

''आणि तसे घडायलाही लागले होते. तुम्ही पाहिलेच, दोन दिवसांत गारगोटीत किती नवीन लोक आले. जिल्हा परिषदेने गढीपर्यंत नवीन रस्ता करायचे ठरवले देखील. आणि गारगोटीजवळून एस.टी.ची वाहतूक वाढवायचेही चालले होते. पण तुमच्या अफलातून टोळीने मध्येच खो घातला. पण काय रे पिंट्या, तुला तरी हे साहस करायची बुद्धी कशी झाली?''

©KTBS Not to be republished

‘‘थोडे डोके माझे, जास्त बाजीरावाचे. आधीच उडत्या तबकड्यांच्या बऱ्याचशा गोष्टी तपासणीअखेर खोट्या निघाल्याचे मी वाचले असल्याने ह्या बाबतीतही मला शंका होती. विमानाचे टोकदार पाय, खालचे गवत यानातून ज्वाला निघत असूनही न जळलेले, दामू आणि सुभानराव यांच्या जबानीतील वेळा जुळत नव्हत्या, हे सगळे पाहून आम्ही ठरवले की, ह्यात काही गोम आहे. काही सापडते का ते पाहायला गढीत गेलो आणि नेमके मोक्याच्या वेळी तेथे होतो. तुम्ही सुभानरावाच्या घरामागच्या वडाखाली खणून तर पाहा.’’

इतक्यात मन्यामामाला ट्रंक कॉल आला. बराच वेळ बोलून मामा परत आला आणि पिंट्याला म्हणाला, ‘‘आताच सरकारने तुमच्या टोळीला बक्षीस देण्याचा इरादा दाखवला आहे. सांगा, तुम्हाला काय हवे ते. मी त्याप्रमाणे मुंबईला फोन करून सांगेन.’’

‘‘सुंदर, चंपी आणि बाजीराव यांना काय पाहिजे ते ते सांगतील ’’ पिंट्या म्हणाला.

‘‘आणि तुला आणि ललीला?’’

पिंट्या विचारात पडला. स्वत:साठी त्याला बरेच काही पाहिजे होते. रेडिओ, ट्रान्समीटर आणि रिसीव्हर, गुप्त पोलिस वापरतात तसल्या हत्यारांचा सेट, वॉकी टॉकी आणखी काही काही पण ह्या गोष्टी हिम्मत असेल तर आपल्या टोळीला पुढे मिळवता येतीलच. आता त्याच्या डोळ्यांपुढे त्याच्या आईची मूर्ती उभी राहिली आणि तो म्हणाला,

‘‘आम्हाला, आई-बाबांबरोबर विमानातून काश्मीरला जाऊन यायचंय.’’

**शब्दार्थ :**

■ गढी - लहान किल्ला ■ भेदरणे - भीतीने घाबरणे ■ बेशुद्ध - शुद्धबुद्धरहित जड ■ गोत्यात - संकटात ■ अपरिचित - अनोळखी ■ जबानी - तोंडी हकिकत ■ ऑर्डर - हुकूम ■ रिपोर्ट-अहवाल, बातमी ■ छडा लावणे - तपास, शोध घेणे ■ पथ्यावर पडणे - फायदेशीर होणे ■ आज्ञा करणे - हुकूम करणे ■ पाळत ठेवणे - पहारा ठेवणे ■ भंडावून सोडणे - अतिशय त्रास देणे ■ डाव रचणे - युक्ती आखणे, बेत ■ खो घालणे - सुरळीत चाललेल्या कामात विघ्न आणणे ■ हुडहुडी भरणे - कापरे भरणे.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) ‘उडती तबकडी आणि अफलातून टोळी’ ही कथा कोणत्या कथासंग्रहातून घेतलेली आहे.**

(अ) टाईम मशीनची किमया (ब) प्रेषित

(क) यक्षाची देणगी (ड) अंतराळातील भस्मासूर

©KTBS Not to be republished

**(आ) गढीचे मालक कोणत्या शहरात राहत होते?**

(अ) पुणे (ब) कोल्हापूर

(क) मुंबई (ड) गारगोटी

**(इ) पिंट्याच्या खांद्यावर कोणी थाप मारली?**

(अ) सुंदर (ब) बाजीराव

(क) मन्यामामा (ड) लली

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) गारगोटीपासून किती मैलावर गढी आहे?

(आ) मन्यामामा गारगोटीला का आला होता?

(इ) पिंट्याने आपल्या सहकाऱ्यांना वेशीजवळ किती वाजता बोलविले?

(ई) हवालदाराने भाला कोठे पुरून ठेवला होता?

(उ) बाजीरावाने ॲम्बॅसिडर्सवर कशाचे चित्र काढले होते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दामू गाडीवानाने उडत्या तबकडीविषयी काय सांगितले?

(आ) पिंट्या आणि मन्यामामा यांच्यात कोणता ठराव झाला होता?

(इ) रामसिंघानीने सुभानराव व दामूला कोणत्या सूचना दिल्या होत्या?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''तेच तर आपल्या पथ्यावर पडणार आहे.''

(आ) ''पिंट्या आणि सुंदर कुठे आहेत?''

(इ) ''आम्हाला आई-बाबांबरोबर विमानातून काश्मीरला जाऊन यायचंय.''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) सुभानरावाने उडत्या तबकडीविषयी काय सांगितले?

(आ) रामसिंघानीने गढीच्या संदर्भात कोणता डाव रचला होता?

(इ) गढीचे वर्णन करा.

©KTBS Not to be republished

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) ''पिंट्या व त्याच्या सहकाऱ्यांनी यानासंबंधी कोणकोणते निष्कर्ष काढले?

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

डोके खाजविणे, छडा लावणे, आज्ञा करणे, पाळत ठेवणे, डाव रचणे, खो घालणे, पथ्यावर पडणे.

**(आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

शांत, रात्र, अंधार, अपरिचित, बरोबर

**उपक्रम :**

- या पाठातील इंग्रजी शब्दांसाठी मराठी शब्द शोधा व लिहा.
- डॉ. विश्वास मेहेंदळे यांचे 'आपले वैज्ञानिक' हे पुस्तक वाचा.
- भारतातील शास्त्रज्ञांची नावे व त्यांनी लावलेले शोध यासंबंधी माहिती संकलित करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| परीक्षण | निःश्वास | ठेवून |
| परीक्षा | विशिष्ट | नावीन्य |

©KTBS Not to be republished

# ११. सा रम्या नगरी मॉस्को....

**अश्विनी धोंगडे**

**परिचय :**

अश्विनी धोंगडे यांनी (1947) पुणे येथील एस.एन.डी.टी. महाविद्यालयात इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका व प्राचार्या म्हणून अध्यापनाचे कार्य केले आहे. त्यांचे 'अपौरुषेय', 'अन्वय', 'स्त्रीसूक्त' हे कवितासंग्रह व 'स्पर्श', 'होरपळ', 'जखमी' या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांनी स्त्रीवादी साहित्याची समीक्षा लिहिली आहे.

'देशांतर' या त्यांच्या प्रवासवर्णनपर पुस्तकातून हा पाठ संक्षिप्त रूपात घेतला आहे. या पाठातून मॉस्को शहराचे ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व वैज्ञानिक दर्शन घडते.


**(मूल्य – स्वच्छता, शिस्त व सौंदर्य)**

प्रत्येक शहराला स्वतःचा एक खास चेहरा असतो आणि त्या चेहऱ्यावरची ठळक वैशिष्ट्ये त्या शहराच्या नावाबरोबर आपल्या मनात घर करून राहतात. दिवस पालटतात, स्मृती फिकट होतात, पण आपल्या मनातलं शहर आपल्यापुरतं तसंच असतं, ताजं टवटवीत!

आम्ही मॉस्कोत उतरलो ते ऐन वसंतबहारमध्ये. क्षणोक्षणी आपलं रूप पालटणाऱ्या हवा-ई-सुंदरीनं प्रत्येकाच्या कौतुकाचा विषय बनण्याचे हे दिवस. विमानतळावरून शहराकडे येणाऱ्या तीस-पस्तीस मैलांच्या प्रवासात अक्षरशः 'हिरवे हिरवे गार गालिचे' पसरलेले आणि त्यावर नक्षी रेखल्यासारखी हजारो इवलाली पिवळीधमक फुलं, आपल्याकडच्या शेवंतीसारखी, आणि त्यांच्या गोल माळा बनवून केसांवरून त्या माळणारी एक गोरीपान फुलपरी मोटारीच्या वेगात पटकन् दिसली आणि नाहीशीही झाली. त्यानंतर मॉस्कोच्या वास्तव्यात भेटली अनेक रंगांची, अनेक आकारांची, वासांची-बिनवासांची शेकडो अनामिक फुलं, इवल्या पांढुरक्या हजारो फुलांनी हजार अंगांनी उमलून आलेली सफरचंदांची झाडं, उंचच उंच देवदार, हिरवेगार बर्च, मैलोन् मैल, ऐन मध्यवस्तीत शहरात ठाण मांडून बसलेल्या सुंदर सुंदर बागा, त्यातली स्वच्छ पाण्याची जलाशयं, कुठे विहरणारी तुरुतुरु बदकं, स्केटिंग आणि स्किईंगच्या वेगवान चालीनं पायाला चाकं लावून भिरभिरणारी गोरीपान मुलं, मुली आणि या सर्व निसर्गरम्य चित्राची मोजमापं आपल्या परीनं दिवसाच्या उजेडात भर घालून वाढविणारा थंड सूर्य होय. परतीच्या प्रवासात प्यॉन्गॅन्ग ते मॉस्को या बारा तासांच्या दिवसा उजेडाच्या प्रवासात मॉस्कोमध्ये पुन्हा बारा तासांचा म्हणजे एकूण चोवीस तास उजेडाचा एक दिवस आम्ही अनुभवला होता. तोच हा सूर्य हिवाळ्यात या शहराच्या वाट्याला फक्त पाच, सहा तास येतो, आणि त्या वेळी बर्फाच्या थंडगार चरणस्पर्शानं हिरव्या झाडांच्या खराट्यांवर केवळ पांढरीधोप बर्फफुलं फुलवलेली असतात यावर माझा या वसंतोत्सवात तरी विश्वास बसला नाही, इतकं या शहराचं हे हिरवं रूप माझ्या पुण्याच्या खास प्रदूषित डोळ्यांना सुखावलं होतं.

©KTBS Not to be republished

शंभर किलोमीटरच्या वर्तुळाकार परिसरात वसलेल्या या नगरीमध्ये जवळजवळ नव्वद लाख लोक राहतात, यावर प्रथमदर्शनी विश्वास बसणार नाही, कारण हे 'दुटप्पी' शहर आहे. या शहराला दोन चेहरे आहेत. एक वरचा आणि एक आतला. दर्शनी मॉस्कोपेक्षा गर्दीनं दुथडी भरून वाहणाऱ्या भुयारी मॉस्कोचं दर्शन आपल्या गर्दीच्या जीवनाला अधिक जवळचं आहे, पण हे दोन्ही चेहरे तितकेच सुंदर आहेत.



आठ विविध मार्गांवर तीन पातळ्यांमध्ये पसरलेलं मेट्रोचं प्रचंड जग-ज्याची सुतराम कल्पनाही वरच्या मॉस्कोमध्ये येत नाही. दर साठ-सत्तर सेकंदानं तुमच्यापुढे खड्या होणाऱ्या आगगाड्या, ना धूर, ना आवाज, ना शिट्या, ना भोंगे. स्वयंचलित काचेच्या दरवाजांचाच काय होईल तो आवाज. गाडीत गर्दी पुष्कळ पण लेडीज कंपार्टमेंट, फर्स्ट क्लास असला जातीवाद नाही. गर्दीलाही शिस्त, सौजन्य असतं याची जाणीव लोकांच्या रक्तातच असावी. उतरते जिने असोत वा प्लॅटफॉर्म वा आगगाडीचा डबा, लोकांच्या बोलण्याचा आवाज नाही, हास्यविनोद, हा हा हू हू, गप्पागोष्टी असला प्रकारच नाही, त्यामुळे कित्येकदा आमचंच मोठ्यामोठ्यानं चालणारं बोलणं ऐकून आम्हाला लाज वाटायची. प्लॅटफॉर्म आणि रेल्वे एका पातळीत असल्यानं म्हाताऱ्या-कोतांऱ्यांची सोय तर व्हायचीच, पण सामानाच्या अथवा बाळांच्या छोट्या बाबागाड्या सरळ रेषेत आत ढकलून गृहिणीही बिनधास्त गर्दीत शिरायच्या, मेट्रोचं प्रत्येक स्टेशन ही एक 'देखने की चीज है!'', फक्त पाहणाऱ्याकडे दृष्टी हवी. एखादं स्टेशन रंगीबेरंगी काचेच्या सुंदर तुकड्यांच्या म्युरल्सनी सुशोभित, तर एखाद्या ठिकाणी शेकडो पारदर्शक झुंबरं, एखाद्या स्टेशनवर भिंतीत कोरलेले ऐतिहासिक

©KTBS Not to be republished

व्यक्तींचे चेहरे, तर कुठे छतावर पूर्ण प्रसंग कोरलेली रंगीत चित्रे. एवढ्याशा दोन डोळ्यांनी हे नयनसुख किती साठवू आणि किती नको, असं वाटताना दुबळी माझी झोळी असं जाणवल्याशिवाय राहत नसे.

बसमधून उतरल्यावर हातातलं तिकीट चुरगाळून फेकून देण्याची सवय लागलेल्या हाताना मॉस्कोमध्ये खाली वाकून पुन्हा चुरगाळलेलं तिकीट नीट उचलून कचरापेटीत टाकण्याची टोचणी दोनतीनदा लावावी लागली. रस्त्यावर थुंकणं, कचरा टाकणं, जाहिराती डकवणं असले प्रकार कुठेही नसल्यानं खरं तर सुरुवातीला मला रस्ते फारच ओकेबोके आणि निर्विकार वाटले, पण शहराचं सौंदर्य टिकविण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे याची जाणीवही झाली. इथला प्रत्येक माणूस म्हणूनच स्वतःच्या घराच्या स्वच्छतेइतकाच रस्त्याच्या स्वच्छतेला जपतो, हे इथल्या रम्यतेचं खरं रहस्य आहे. आपल्याकडचे तीन-चार रस्ते एकत्र जोडून होईल तेवढी इथल्या रस्त्यांची रुंदी, रस्त्यांच्या दुभाजकावरची फुलझाडं आणि पादचाऱ्यांसाठी असणारे खास पथ, रस्त्यावर सुळसुळणाऱ्या मोटारी, बसेस आणि ट्रॉलीज पण तेही कर्कश हॉर्न आणि धुरांचे प्रचंड लोट बाहेर न सोडता, वेगानं जातानाही पादचारी रस्ता ओलांडतांना थांबून त्यांना आधी जाऊ देण्याची पद्धत, त्यामुळे या शहराला एक समंजस संयत असं प्रौढत्व आलं आहे. केवळ पाच कोपेकच्या तिकिटावर कुठेही प्रवास करण्याची लोकल्स व बसेसमध्ये मुभा आहे, पण कंडक्टर अथवा तिकीट क्लार्क नाही, म्हणून ही कामं मूकपणे करणाऱ्या यंत्रांना फसविण्याची वृत्तीही कोठे दिसली नाही.

रस्त्यांचं सौंदर्य आणि महत्ता वाढविणारं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथले पुतळे. ऐतिहासिक महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे सर्वत्र उभारले जातात, पण साहित्यिकांचे पुतळे अभिमानानं मिरवणारं हे शहर आपली वाङ्मयीन गुणवत्ता मानानं मिरवत आहे. अर्थात पुतळे उभारण्याइतकी आकाशस्पर्शी प्रतिभा असणारे महान साहित्यिक या भूमीत जन्मले आहेत हेही तितकंच खरं आहे. लेनिन, स्टॅलिन, मार्क्स यांच्या बरोबरीनं टॉलस्टॉय, पुष्कीन, गॉर्की एवढंच नव्हे तर युरी गागारिन, व्हॅलेंटिना तेरेश्कोवा या अंतराळवीरांचेही पुतळे राजकारण, साहित्य आणि विज्ञान या त्रयी क्षेत्रांचा संगम साधणारे आहेत. पण त्याही पलीकडे जाऊन अंतराळविज्ञानात आघाडी मारणाऱ्या रशियाच्या अस्मितेचं प्रतीक शोभावं असं अंतराळात झेपावणाऱ्या स्फुटनिकाचं 107 मीटर उंचीचं मीर ॲव्हेन्यू वरचं देखणं शिल्पं आणि त्यासमोरच अंतराळ विज्ञानाचा जनक कॉन्स्टन्टीन रिओलकोव्हस्की याचं स्मारक नक्कीच स्फूर्तिप्रद आहे.

बॅले आणि ऑपेरा ही खासियत असणाऱ्या रशियन कलेच्या सादरीकरणासाठी मॉस्कोमध्ये नव्वदच्या आसपास नाट्यगृहे आहेत. 100 सिनेमागृहे आहेत, जवळजवळ 4200 लहान-मोठी ग्रंथालये आहेत. मॉस्कोच्या वैभवात भर टाकणाऱ्या दुसऱ्या महत्त्वाच्या वास्तू म्हणजे इथली प्रचंड दालनांनी सजलेली वस्तुसंग्रहालये! जवळ जवळ साठ संग्रहालयांतून साहित्य, कला, क्रांती, शिल्पे, चित्रे यांच्या स्मृती जतन केलेल्या आहेत. पुष्कीन म्युझियम पाहताना युरोप आणि रशिया यांच्या चित्र शिल्पांची जुगलबंदी पाहणं हा मोठा आनंददायी अनुभव होता. बॉटीसेली, व्हेरॉनिस, व्हॅन्गॉग, पिकासो, रॉडीन, रेम्ब्रॉ इत्यादी ख्यातनाम चित्रकारांच्या उत्कृष्ट कलाकृतींचं काटेकोर जतन इथं केलं आहे.

©KTBS Not to be republished

एखादं शहर म्हणजे त्यातल्या निर्जीव वास्तू आणि हिरवा परिसर नव्हे. त्या शहराला जिवंतपणा देणारी रक्तामांसाची माणसं म्हणजे त्या शहराचा खराखुरा चेहरा. माणसांचे स्वभाव जगाच्या पाठीवर कोठेही गेलं तरी सारखेच हे खरं असलं तरी मला एकंदर रशियन लोक शांत, प्रामाणिक, कष्टाळू आणि सोशिक वाटले.

दहा दिवस या शहरांचे रंगरूप अनुभवत शेवटच्या दिवशी विमानतळावर आलो तेव्हा म्हणूनच एखाद्या प्रेमळ मित्राचा निरोप घ्यावा तसा या शहराचा मी मूक निरोप घेतला. विमानाच्या काचेतून किती तरी वेळ खाली पहात!

**शब्दार्थ व टीपा :**

■ सा- ती सर्वनाम ■ अनामिक - नांव नसलेली ■ घर करणे - वास्तव्य करणे ■ रूप पालटणे - रूप बदलणे ■ उमलणे - फुलणे ■ जाहिराती डकवणे - जाहिराती चिकटविणे ■ निर्विकार - आकार नसलेले ■ ओकेबोके- शांत वर्दळ नसलेले ■ महत्ता - महत्त्व ■ एस.एन.डी.टी.- श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी ■ लेनिन - रशियन राज्यक्रांतीचा प्रणेता ■ स्टॅलिन - रशियाच्या अभ्युदयाचा शिल्पकार ■ कार्ल मार्क्स - साम्यवादी नेता, 'दास कॅपिटल' ग्रंथाचा निर्माता ■ युरी गागारिन - जगातला पहिला अवकाशयात्री ■ स्फुटनिक - रशियाने अवकाशात सोडलेले जगातले पहिले अवकाश यान.

**स्वाध्याय :**

प्र.1 (ला) **खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) रशिया देशाची राजधानी ही आहे.**
(अ) लंडन (ब) मॉस्को
(क) पणजी (ड) बर्लिन

**(आ) लेखिका मॉस्कोत या ऋतूत उतरल्या**
(अ) वसंत (ब) शरद
(क) वर्षा (ड) ग्रीष्म

**(इ) मॉस्को या नगरीमध्ये इतके लोक राहतात.**
(अ) एक कोटी (ब) दोन लाख
(क) साठ लाख (ड) नव्वद लाख

**(ई) जगामधील पहिला आवकाशयात्री हा होता.**
(अ) लेनिन (ब) स्टॅलिन
(क) युरी गागारिन (ड) गॉर्की

©KTBS Not to be republished

**(उ) रशियानं अवकाशात सोडलेलं पहिल अवकाशयान हे आहे.**

(अ) स्फुटनिक (ब) आर्यभट्ट

(क) अपोलो (ड) इनसॅक्ट

**(ऊ) मॉस्को शहरात हे प्रसिद्ध वस्तुसंग्रहालय आहे.**

(अ) पिकासो (ब) रॉडीन

(क) पुष्कीन (ड) बॉटीसेली

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) लेखिका कोणत्या विषयाच्या प्राध्यापिका आहेत?

(आ) हा पाठ कोणत्या मूळ पुस्तकातून घेतलेला आहे?

(इ) मॉस्कोला कोणते दोन चेहरे आहेत?

(ई) रस्त्यांचे सौंदर्य व महत्ता कशाने वाढली आहे?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) चोवीस तास उजेडाचा एक दिवस लेखिकेनं कसा अनुभवला?

(आ) एखाद्या शहराचा खराखुरा चेहरा कशात दिसतो?

(इ) लेखिकेला कोणता मोठा आनंददायी अनुभव आला?

(ई) लेखिकेला कोणत्या दोन गोष्टी स्फूर्तिप्रद वाटल्या?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''ही कामं मूकपणे करणाऱ्या यंत्राना फसविण्याची वृत्तीही कोठे दिसली नाही.''

(आ) ''मी मूक निरोप घेतला''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) तीस-पस्तीस मैलाच्या प्रवासात लेखिकेला काय काय दिसले?

(आ) सुरुवातीला लेखिकेला रस्ते फारच ओकेबोके व निर्विकार का वाटले?

(इ) मॉस्कोच्या वैभवात भर टाकणाऱ्या महत्त्वाच्या वास्तू कोणत्या?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा**

(अ) मॉस्कोतील रेल्वे प्रवासाचे वर्णन करा.

(आ) मॉस्कोतील रस्त्यांचे थोडक्यात वर्णन करा.

©KTBS Not to be republished

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

मनात घर करणे, ठाण मांडून बसणे, भर घालणे, जतन करणे.

**(आ) विग्रह करून समास ओळखा.**

क्षणोक्षणी, स्वयंचलित, गप्पागोष्टी, बिनधास्त, ग्रंथालय, मुलंमुली

**उपक्रम :**

- रा.भि जोशी यांचे 'वाटचाल' हे पुस्तक व डॉ. मीना प्रभु यांचे 'चिनी माती' हे पुस्तक मिळवून वाचा.
- प्रेक्षणीय स्थळांची नांवे व चित्रे संग्रहित करा.
- तुम्ही केलेल्या सहलीचे वर्णन तुमच्या शब्दात करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अंगीकृत | निरीक्षण | लांछन |
| कर्तृत्व | वेषभूषा | मथितार्थ |

©KTBS Not to be republished

# १२. यंत्र

**योगीराज वाघमारे**

## परिचय :

योगीराज देवराज वाघमारे (जन्म 1943) दलित जीवनाचे अनेक अंगानी चित्रण करणारे समर्थ कथाकार आहेत, ग्रामीण जीवनात दलितांच्या भावनांची होणारी कोंडी, त्यांचा सवर्णांशी होणारा अटळ संघर्ष याचे वास्तव व आत्मपरीक्षणात्मक दर्शन त्यांच्या कथेमधून घडते. दलितांच्या वेदना, दुःख, समस्या, प्रश्न आणि भूक याचा वास्तव अनुभव त्यांच्या कथेतून व्यक्त होतो. 'उद्रेक' 'बेगड' हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

'गुडदाणी' या कथासंग्रहातून ही कथा संक्षिप्त रूपात घेतली आहे. ग्रामीण शेतीत यंत्राने पाऊल टाकल्याने ज्याचे पोट रोजगारावर अवलंबून आहे. अशा माणसांच्या मनातील संघर्ष व त्याच्यापुढे निर्माण झालेले प्रश्न या कथेतून व्यक्त होतात.


**(मूल्य – श्रमप्रतिष्ठा)**

वामन आबा सावकाराच्या मळ्याकडे निघाला होता. आता त्याच्या डोक्यात आबा सावकाराचा मळा आणि खळ्यात पडलेली प्रचंड रास एवढीच होती. त्याला चावडीपुढचे कोणी आठवत नव्हते.

पांद सरून वर आल्यावर आंबराई लागली. लांब लांब फांद्या पसरून उभे राहिलेले वृक्ष ओलांडून तो आला. केळीची बाग ओलांडली की सावकाराचा मळा येतो. घाईघाईनं तो चालत होता. खांद्यावरची मोगरी लकाव लकाव हलत होती. मघाशीचं पान केव्हाच संपलं होतं. तंबाखूचा चोथा त्यानं पुढचं बोट घालून जिबाडातून काढून टाकला. जिभेवर कुठं चुकून माकून राहिलेला तंबाखूचा कण थुंकून तो टाकीत होता. थुंकता थुंकताच त्याचं मन विचार करीत होतं, 'आबा सावकाराच्या मळ्यात कामाला गेलं, की सहज दोन-तीन आठवडे काम पुरंतय.. जवारीची खुडणी, गव्हाची कापणी, हरभऱ्याचं बडवणं. लगेच करडा धोपटणं.. नुसतं ह्या चार पिकांची खुडणी, कापणी, मळणी करायचं झालं तर महिनाभर लागतोय. सावकाराचे चार गडी किती म्हणून करणार ?.. पुढं चैतपुनव येते. जत्रा भरतीय .. जत्रेच्या आधी खळी-दळी झाली पाहिजेत. नायतर कवा बवा आवकळ गाभणं येतयं. पडून जातंय. रानात रास पडलेली असतीय आन् वरून पाऊस पडतोय. तोंडाशी आलेला घास वाया जातोय .. तवा हे दहा पंधरा दिवस म्हंजी मरायलासुद्धा येळ नसतोय.. शिवारात एकाच येळी खळी-दळी. मग शेतकऱ्यांजवळ माणूसबळ कुठंय ? ... कामाला माणूस मिळत नाय... घरात बिमार असलं तरी त्याच्याजवळ बसायला शिल्लक माणूस नसतोय. अशा वेळी 'आबा मला काम सांगा!' असं कुणी म्हटलं तर, आबाच काय पण कुणीबी शेतकरी म्हणतोय- 'आरं, येडा का शाणा म्हणावं तुला दिसत नाय व्हय काय काम करायचं ते!' मग आपणच काही न बोलता कामाला लागायचं.

©KTBS Not to be republished

बडवण, उफवणं करायचं, पोती टाकायची, वाड्यात आणून थापीला थाप लावायची. मग आपुणच पदर पसरायचा अन् म्हणायचं...



'मालक... जवारी घाला...'

मग आबा काय अन् शेतकरी काय, बर पिकलेलं असतंय ... ऐन वेळी कामाला मदत केल्यामुळं आपला शीण ठेवीत नाहीत. सहज चार-दोन पायल्या जवारी देतात ... असं चार दोन खळ्यांवर काम केलं की, पोतं अर्ध पोतं धान्य साठतेय ... गहू साठतात. हरभरे येतात. त्या बिदागीवर मस्त पावसाळा घालवायचा. मागे काम केलं म्हणून कुणीबी बळीराजा पुढं उसन-पासन द्यायला कमी करीत नाहीत.

सुगीत कामाची तलाल उठते. वामनासारख्यांची तारांबळ उडते. कुणीही बोलवायला तरी येतं,

'अरं वामन, आमच्या खळ्यावर चल मर्दा...'

'आं... मालक मला नाय जमायचं ... किसन पाटलाचं बडवणं चालू हाय...'

'असं करू नकू बाबा .. आजच्या दिस चल..'

देवाशप्पत वं .. जमायचं नाय .. अवं, त्यांनी आधीच पायलीभर जवारी पदरात घातलीय ..'

'मग आमचीबी दोन पायली घे...'

©KTBS Not to be republished

अस गांगारलेल कूळ घरी चालून येतंय .. अन् ज्याचा बैल बारदाना गोठा हाय ते बैलांची दावण करून मळून घेतय.. पर तिथंबी माणसं लागत्येतच आन् अशा वक्ताला जरा जास्ती मागितलं तर कुळाला कायबी वाटत नाय .. ते फक्त म्हणतंय .. 'वामन, असं खिंडीत गाठू नकू रं..! ..बरं ..बरं. तुलाबी पोट हाय .. बडवून आतडी पार गळ्याशी येतेत. चिपटंभर जास्त दिलं म्हणून बिघडत नाय..' पर आपुण आळस नाय केला पाह्यजी. आळस केला आन् म्हणलं मी नाय करणार .. हाय त्येच खाईन म्हणलं की संपलं .. माणसानं कसं अंग मोडून काम करावं. ल्यावं ... प्यावं .. मस्त.. त्या साली असंच झालं. रात दिस बघितला नाय मी. तुक्या, धनगराचा राणू, मांगाचा जना, बुरडाचा भिक्या असं सगळ्यांनी मिळून ताफा केला. पोत्याला पायली असा भाव ठरवून खळी करून दिली. कामाचा सपाटा लावला. दिवसातून दोन-दोन, तीन-तीन खळी केली. सगळं शिवार बडवून टाकलं. एक एकाला दोन-दोन पोती धान्य वाटून आलं. खूप मिळकत झाली. जत्रा थाटात केली. बायकूला लुगडं घेतल. मला धोतर घेतलं. पायात वहाणा घेतल्या. आन् बारकीला दोन माश्याची अंगठी केली. वामनच्या डोळ्यापुढं मागची मागची एक एक दृश्ये सरकत होती. आणि आबा सावकाराचा मळा जवळ येत होता.

मोकळ्या ज्वारीच्या रानातून सावकाराची जनावरं चरत होती आणि धनगराची शेरडं, करडं जनावरांच्या नजरेतून सुटलेला वाळला पालापाचोळा टिपीत होती. कावळे, चिमण्या साळुंक्या पडलेलं धान्य टिपून बाभळीच्या आणि आंब्याच्या झाडावर गडप होत होत्या.

आबा सावकाराच्या विहिरीजवळ एक वाडा बांधलेला होता. त्याच्या समोरच मोठ खळं तयार केलेलं होत. त्याच्या अवती भवती साठ-सत्तर बाया उभं राहून ज्वारीची कणसं खुडून खळ्यात टाकीत होत्या. खळ्यात प्रचंड ढीग तयार झाला होता. खुडलेल्या पेंड्या उंचावून बायका भिरकावून देत होत्या. देवळात गर्दी नको म्हणून दर्शन होताच वारकऱ्यांना जसे मागे खेचले जाते तसे रिकाम्या पेंड्या गाडीत रचून गंजीकडे रवाना केल्या जात होत्या. पलीकडे भली मोठी गंज आकाराला येत होती. वामननं ते खळं आणि ढीग डोळे भरून पाहिला. बारा एक वाजण्याच्या आत कणस खुडण्याचं काम होईल, अन् मग बडविणारे गडी त्या ढिगावर तुटून पडतील. कणसांचा भुगा भुगा होईल. मोत्यासारखे दाणे रासभर दिसू लागतील. त्याच्या अंगात वारं संचारलं. त्याची छाती फुगू लागली. हसत हसत तो जवळ जाऊ लागला.

आबा सावकार वाड्याच्या कठड्यावर बसले होते. अंगात मलमलचा शर्ट घातला होता. त्यातून जानव्याची रेघ दिसत होती. दात-कोरणं दाताच्या फटीतून अधून मधून घालून उगाच ते दात उचकीत होते. त्यांच्या हाताबुडाशी अनंता माळी बसला होता. पानाची चंची सोडली होती. सुपारी कातरून आबांना देत होता. मध्येच त्यानं पानही लावलं. आबा मात्र बायांकडं बघत होते. 'आवला, चला .. आटपा ..' म्हणत होते. त्यांच्या तोंडून शब्द निघायच्या आतच करीम गुमास्ता बायकांवर डाफरत होता. तो खळ्याच्या अवती भवती फिरत होता. बायांना काहीबाही सांगत होता. तर पलीकडे दोन गडी एका माणसाच्या हाताबुडी काम करीत होते. गड्यांनी सगळे बैल रानात पालापाचोळा खायसाठी सोडले होते. गोठ्यात एकही बैल नव्हता. गोठा रिकामा बघून वामनला उगीच अवघडल्यासारखं झालं. पण काहीच न दाखविता तो पुढे सरकला.

©KTBS Not to be republished

आबा सावकाराकडं त्याचं लक्ष गेलं. ते पानाचा तोबरा चघळीत होते. त्यांचं लक्ष वामनकडं नव्हतं. ते गड्यांकडे आणि त्या काहीबाही करणाऱ्या माणसांकडं बघत होते. तिथं काही तरी सामान आणलेलं होतं आणि कशाची तरी जुळवाजुळव चालली होती. पण वामनचं लक्ष कुठं होतं तिकडं! तो लांबूनच त्यांना नमस्कार करायला म्हणून किंचित वाकला आणि हात झुकवून कपाळाला लावला. आबांनी वर बघितलंही नाही. अनंता माळ्यानं बघून न बघितल्यासारखं केलं. त्याचे वामनला काहीही वाटलं नाही... 'पण ... आपुण आल्याचं त्यानला कळालं म्हंजी पुरं झालं .... पुन्हा म्हणायला नकु ...' 'आयला, वामन्या लय माजलाय... सकाळी येतो म्हणाला तर कधी आलाय?...' बरं झालं पिपरिणीखालून लवकर निघालो. नाय तर तसंच त्या टोळभैरवांशी बोलत बसलो असतो. आन् इकडं उशीर झाला असता... आन मालक कितीबी टाकून बोलला असता...'

मग वामन स्वत:वरच खूष झाला. वाटलं, खाली टेकावं, पान खावं. पण मालक पुन्हा म्हणतील, 'बडवणाचं करायचं म्हंजी दुसऱ्या कामाची बोली नसतीय व्हय?... आयला, जो तो राजाच बनाय लागलाय...!'

आता असं म्हणल्यावर काय बोलणं व्हतंय व्हय? त्या परिस...? ह्या पेंड्या गाडीत भरून टाकाव्यात.

लगेच वामनने काही पेंड्या उचलल्या. काही वेळ असाच गेला. तरीही त्याला कोणी बोलेना. मालकही बघून काहीच म्हणेना. सहज त्याच्या मनात शंका आली... 'पण काय म्हणून त्यांनी मला विचारावं? एवढ्या मोठ्या सावकारानं आपल्याला आपण होऊन बोलावं म्हणजे..? आक्रीतच हाय ...! आयला, येडंच मन हाय आपलं! वामन मनाशीच हसला. त्यानं धुंदीत आणखी पेंड्या उचलल्या. तोपर्यंत मोडणी संपली. एक एक बाई हलू लागली. तसे सावकार ओरडले,

''झालं का मिस्तरी?'

'हाव मालक!' मळकटलेल्या हाताचा माणूस पान्हा, हातोडी घेऊन सावकाराकडे येत म्हणाला. वामन सावरला. 'काय झालं बरं?' तो पुढं सरकला. सावकार त्याच्याकडे न बघताच म्हणाले, ''इथे ... डिग्या .. अं .. चला आटपारं .. करा सुरू इंजेन, आजच्या आज झालं पाह्यजे..''

'म्हंजे?' वामन दचकला.

एवढ्यात इंजनाची झुकझुक-सिक ... सिक ... सुरू झाली. पट्टा लपालपा पळू लागला. यंत्र वाजू लागलं. वामन घाबरला. चेहऱ्यावर घाम जमू लागला. खांद्यावरची मोगरी लटपटू लागली. तरीही स्वत:ला सावरीत आबा सावकाराकडे सरकला.

'मालक .. खळं करायचं?'

त्याच बोलणं यंत्राच्या आवाजात गरगरत गेलं. गड्यांनी भराभर कणसाची पोती भरायला सुरुवात केली आणि एक एक त्या मळणी यंत्रात टाकायला सुरुवात केली.

पुन्हा वामन ओरडला,

'मालक!'

©KTBS Not to be republished

आबा सावकार निर्विकार होता.

'काय ?'

'ह्ये खळं!' वामन घोगऱ्या आवाजात बोलला.

''सुरु झालं नव्हं .. आरं, कालच लातूरहून मळणीयंत्र आणलंय ... आता बघ कसं खळं व्हतंय ते .. तोंडाला नुसतं पोतं लावायचं .. बास बडवण नाय की वाऱ्यावर उफणं नाय ... काय ?''

वामनला पूर्ण कल्पना यायला वेळ लागला नाही. तो गर्भगळीत झाला. सावकारानं असा कसा झोपेत धोंडा घातला. मोठ्या आशेने आलो होतो. दहा-पंधरा दिवस काम मिळंल, पोटाला रोजगार मिळंल. पावसाळा सुखाचा जाईल ... पण ... हे मळणी यंत्र ...! काय वचा वचा करीत सुटलंय ... माझं हात तोंडीत चाललंय.... पोटावरून फिराय लागलंय ... मालक ... अवं असं का ? ... आमी कुणाच्या तोंडाकडं बघायचं ..? काय खायचं ? ... कसं जगायचं ?

वामनच्या डोळ्यापुढं सगळा अंधार पसरला. त्याच्या घशाला कोरड पडली. हातातली मोगरी लटलटू लागली. तो मटकन खाली बसला. यंत्र त्याच्याकडे न बघताच कच कच वच वच आवाज करीत होतं. जोंधळ्याची पोती भरायला गड्यांची धावपळ होत होती. मालक सारखा ओरडत होता. डाफरत होता. वामन जेव्हा शुद्धीवर आला, तेव्हा आबा सावकार मळणी यंत्राच्या शेजारी थापी लावलेल्या पोत्यावर बसला होता. कणसं संपत आली होती. पुन्हा एकदा मालकाला ... 'मला काम द्या' म्हणून विनवणी करावी म्हणून तो जोरानं ओरडला, 'मालक!'

यंत्राच्या गोंगाटात त्याची हाक ऐकू गेली नाही. तो हताश झाला. पोटात खोलखोल गेल्यासारखं झालं. हिरमुसल्यासारखं झालं. त्यानं अवसान एकवटून सूर्याकडं बघितलं. अजून बराच अवकाश होता. थोडासा धीर आला. आबा सावकाराचं काम नाही मिळालं तरी निदान शिवारातलं दुसऱ्या शेतकऱ्याचं बघू चटकन तो उठला. मोगरी खांद्यावर टाकली आणि जितक्या लवकर आबा सावकाराचा मळा सोडता येईल तेवढ्या घाईनं तो निघाला. कुणाच्याही खळ्यावर त्याची जायची तयारी होती. पांदीच्या पलीकडं बाजीराव जाधवाचा मळा होता. आपोआप त्याचे पाय तिकडे वळले. मोठमोठ्या ढेंगा टाकीत तो निघाला होता. कधी पांद सरतेय असं झाल होतं .. तोच समोरून एक बैलगाडी येत असलेली दिसली. तिला वाट देण्यासाठी तो बाजूला सरकून उभा राहिला. कुणाची गाडी म्हणून बघायलासुद्धा त्यानं मान वर केली नाही. त्याच्या डोळ्यापुढं बाजीराव जाधवाचा मळा आणि ज्वारीचं खळं होतं. तिथ कधी जाईन असं झालं होतं. एवढ्यात गाडी जवळ येऊन ठेपलीही. वामनला पाहून गाडीवान म्हणाला, 'कुणीकडं वामना' त्या अनपेक्षित प्रश्नानं तो शुद्धीवर आला. उत्तर देण्यासाठी ओठ हलविले.

....'बाजीराव जाधवा ऽ... !'

एवढेच शब्द निघाले... आणि तो मुकाच झाला.. तो गाडीवान बाजीराव जाधवाचाच होता. गाडीत कणसाची पोती होती. काळजात सुरी खुपसावी तसं त्याला झालं. तरीही विव्हळल्यागत तो म्हणाला, 'इकडं कुठं निघाली गाडी ?'

©KTBS Not to be republished

'आबा सावकारानं मळणीयंत्र आणलंय म्हण .. तवा त्याच्यावरच रास करायची ठरविलीय औंदा... !'' गाडीवान बोलला. वामनला गरगरल्यासारखं झालं. सगळं शिवार आपल्याभोवती फिरतंय असं वाटू लागलं. आणि त्याला काय होतंय हे बघायच्या आतच गाडी पांदीतनं पळत सुटली.

**शब्दार्थ व वाक्प्रचार :**

■ पांद - लहान वाट ■ मोगरी -लाकडी हातोडा ■ रास - ढीग ■ बिमार -आजारी ■ बिदागी - मानधन ■ बळीराजा - कुणबी, शेतकरी ■ गुमास्ता - मुखत्यार, मुनीम ■ टोळभैरव -रिकामटेकडाप निर्विकार -विकारशून्य, उदासीन ■ कोरड पडणे - शोष पडणे ■ डाफरणे - चवताळणे, रागावणे ■ अवसान एकवटणे - हिंमत, धैर्य ■ गर्भगळीत होणे - अतिशय घाबरणे ■ हताश होणे - निराश होणे ■ तुटून पडणे-हल्ला करणे, नेटाने कामास लागणे ■ डोळे भरून पाहणे - मनाचे समाधान होईपर्यंत पाहणे.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) यंत्र ही कथा कोणत्या कथासंग्रहातून घेतलेली आहे?**

(अ) उद्रेक (ब) बेगड
(क) गुडदाणी (ड) पराभव

**(आ) वामन कोणाच्या मळ्याकडे निघाला होता?**

(अ) रामा सावकार (ब) आबा सावकार
(क) पाटील मळा (ड) काका सावकार

**(इ) करीम गुमास्ता कोणावर डाफरत होता?**

(अ) धनगरांवर (ब) बायकांवर
(क) कामगारांवर (ड) मजुरांवर

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) आबा सावकाराच्या मळ्यात कोण कोणत्या पिकांची मळणी होते?
(आ) शेतकरी वामनाला केव्हा उसन-पासनं देतात?
(इ) मोकळ्या रानात कोणाची जनावरे चरत होती?
(ई) मळणीयंत्र कोणत्या गावाहून आणले होते?
(उ) वामनला बाजीरावाच्या खळ्यावर का काम मिळाले नाही?

©KTBS Not to be republished

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गावातील मळण्या जत्रेच्या अगोदरच का करतात?

(आ) आबा सावकाराचे वर्णन लिहा.

(इ) वामनाने गेल्या वर्षीच्या मळणीच्या उत्पन्नातून काय काय खरेदी केले?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''आवला, चला... आटपा ''

(आ) ''कुणीकडं वामना?''

(इ) ''झालं का मिस्तरी?''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) मळणीयंत्र सुरू होताच वामनापुढे कोणते प्रश्न उभे राहिले?

(आ) वामन मालकाकडे केव्हा पदर पसरत असे ?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) आबा सावकाराच्या खळ्याभोवतीचे वर्णन करा.

(आ) वामनासंबंधी माहिती लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

गर्भगळीत होणे, हताश होणे, तुटून पडणे, डोळे भरून पाहणे.

**(आ) विग्रह करून समास ओळखा.**

पालापाचोळा, मळणीयंत्र, दहापंधरा, अनपेक्षित

**उपक्रम :**

- 'यंत्र शाप की वरदान' या विषयावर निबंध लिहा.
- आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीचे वाचन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अंगीकार | क्रीडा | एखादा |
| रुग्णालय | नवीन | घेऊन |

©KTBS Not to be republished

# १. अभंग त्रिदल

**संत गोरा कुंभार**

**परिचय :**

संत गोरा कुंभार (1267-1317) संत शिरोमणि संत गोरा कुंभार यांचा जन्म 'तेर' या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माधवबुवा व आईचे नाव रखुमाई असे होते. ते धार्मिक, सदाचरणी व विठ्ठलभक्त होते. त्यांचा प्रपंच भक्तीमय होता. संत गोरोबांचा परमार्थमार्गावरील अधिकार मोठा असल्यामुळे व वयाने मोठे असल्यामुळे सारेजण त्यांना 'गोरोबाकाका' असे म्हणत होते. ते सतत विठ्ठलाच्या नामस्मरणात गुंग असत. त्यांनी कर्मातच ईश्वर पाहिला व जीवनभर निष्काम कर्मयोगाचे आचरण केले होते.

हा अभंग 'संत गोरा कुंभार : वाङ्मय दर्शन' या प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या पुस्तकातून घेतला आहे. भक्ती ही अव्यक्त रूप धारण करते, तेव्हा ती अद्वैताचे लक्षण बनते. परमेश्वराच्या भक्तीची व नामस्मरणाची परमेश्वराशी एकरूपता साधून अननुभूत आनंद होतो. तो शब्दातून व्यक्त करता येत नाही. हे या अभंगातून सांगितले आहे.

**(मूल्यः भक्ती)**

मुकिया साखर चाखावया दिधली ।
बोलता हे बोली बोलवेना ।। 1 ।।

तो काय शब्द खुंटला संवाद ।
आपुला आनंद आधाराया ।। 2 ।।

आनंदी आनंद गिळूनी राहणे।
अखंडीत होणे न होतिया ।। 3 ।।

म्हणे गोरा कुंभार जीवनमुक्त होणे ।
जग हे करणे शहाणे बापा ।। 4 ।।

©KTBS Not to be republished

# संत मुक्ताबाई

**परिचय :**

संत मुक्ताबाई विठ्ठलपंत कुलकर्णी (1279-1297) जन्म आळंदी येथे. तेराव्या शतकातील तेजस्वी व स्पष्टवक्ती संत कवयित्री. ज्ञानदेवांपेक्षा वयाने लहान असलेली, संतमंडळात मोठे स्थान व पारमार्थिक अधिकार असलेली ही मुक्ताबाई. निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव यांची धाकटी बहीण होय. तिला 'मुक्ताई' असेही म्हणत. ज्ञानदेवादी भावंडांच्या सहवासातून आत्मज्ञान, भगवद्भक्ती, प्रेम, समता या विषयावरील चर्चा ऐकून मुक्ताबाईनी अद्वैत तत्त्वज्ञान आत्मसात केले. सगुणनिर्गुणाच्या कल्पनेच्याही पलिकडे जाण्याचे सामर्थ्य तिच्या ठिकाणी होते. पंढरीमाहात्म्य, नाममाहात्म्य व संतसमागम या विषयांवर मुक्ताबाईची अभंगवाणी व 'ताटीचे अभंग' ही रचना प्रसिद्ध आहे.

हा ताटीचा अभंग लेखिका पिरोज आनंदकर यांच्या 'संत कवयित्री' या पुस्तकातून घेतला आहे. एकदा ज्ञानदेव निराश होऊन ताटी (दार) लावून बसले असता त्यांना उद्देशून मुक्ताबाईने काही अभंग म्हटले. हे अभंग ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत.

या अभंगात मुक्ताबाईच्या मनातील आर्त भाव व भावनोत्कटता दिसून येते.

**(मूल्य : वैराग्यशीलता)**

संत तेचि जाण जगी ।
दया क्षमा ज्यांचे अंगी ।।
लोभ अहंता नये मना ।
जगीं विरक्त तेचि जाणा ।।
इहपरलोकीं सुखी ।
शुध्द ज्ञान ज्यांचे मुखीं ।।
मिथ्या कल्पना मागे सारा ।
ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

©KTBS
Not to be republished

# संत नामदेव

**परिचय :**

संत नामदेव (1270-1350) मराठीतील पहिले भावकवी, आख्यानकवी, थोर विठ्ठलभक्त. संत नामदेवांच्या वडिलांचे नाव दामाशेटी व आईचे नाव गोणाई असे होते. संत जनाबाई नामदेवाच्याच घरात वाढली, नामदेवांचे घराणे विठ्ठलभक्तांचे. त्यांचे गुरु विसोबा खेचर. संत नामदेव भागवत धर्माचे पहिले संघटक व प्रचारक होते. त्यांचा 'कीर्तन संप्रदायाचे आद्य आचार्य' असाही गौरव केला जातो. संपूर्ण भारतभर प्रवास करून त्यांनी भगवद्भक्तीचा प्रचार केला. त्यांचे काही अभंग शिखांचा धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' या ग्रंथामध्ये समाविष्ट केले आहेत.

हा अभंग 'परशुरामपंत तात्या गोडबोले' यांनी संपादित केलेल्या 'नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे' या पुस्तकातून घेतला आहे. रोजच्या प्रापंचिक जीवनात व व्यवहारात माणसाने कसे वागावे याबद्दलचा विचार प्रस्तुत अभंगात मांडला आहे.

**(मूल्य : सदाचार)**

पाहें पर-दारा जननी समान ।।
द्रव्यही पाषाण-सम मानीं ।। 1 ।।
पराव्याकारणें प्राण वेंची आतां ।।
जाणें पर व्यथा अंतरींची ।। 2 ।।
विहित संतोष धरीं बा मानसीं ।।
कीं पर-लोकासी जाणें आहे ।। 3 ।।
सर्व काळ प्रीति संतांचीया संगें ।।
गावें अनूरागें हरी-नाम ।। 4 ।।
सर्वां भूतीं सम ठेवूनीया बुध्दी ।।
सांडावी ऊपाधी प्रपंचाची ।। 5 ।।
सर्व परमात्मा सर्व काळी देशीं ।।
भाव अहर्निशी दृढ धरी ।। 6 ।।
संत-समुदाय मिळतील जेथे ।।
लोटांगणें तेथे जावें आधी ।। 7 ।।
चिंता नको नाम्या तरसी तूं जाण ।।
सांगीतली खूण मनें माझ्या ।। 8 ।।

©KTBS Not to be republished

**शब्दार्थ :**

■ मुकिया - मुका, ज्याला बोलता येत नाही असा ■ चाखावया दिधली - खायला दिली ■ बोली - वाणी, शब्द ■ पर - दुसरा ■ दारा - पत्नी, बायको ■ द्रव्य - धन, पैसा ■ पराव्याकारणे- दुसऱ्याच्या कल्याणासाठी ■ संतोष - समाधान ■ विहित - आहे त्यात ■ संतांचिया संगे - संतांच्या सहवासात ■ अनुरागे - प्रेमाने ■ समबुद्धी - समतेची बुद्धी ■ अहंता - अहंकार, मीपणा ■ ऊपाधी -विशेषण, पदवी ■ मिथ्याकल्पना - खोट्या कल्पना ■ ताटी - दरवाजा, दार ■ जननी - आई ■ पाषाण - दगड

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) संत गोरा कुंभार यांचा जन्म या गावी झाला.**

(अ) लातूर (ब) कळंबा
(क) तेर (ड) उस्मानाबाद

**(आ) सर्व संत गोरोबांना असे म्हणत.**

(अ) गोरा काका (ब) गोरोबा काका
(क) संत गोरबा (ड) गोरा माऊली

**(इ) संत गोरा कुंभारांनी आयुष्यभर या योगाचे आचरण केले.**

(अ) ज्ञानयोग (ब) राजयोग
(क) निष्काम कर्मयोग (ड) संन्यास

**(ई) तेराव्या शतकातील तेजस्वी व स्पष्टवक्ती संत कवयित्री कोण?**

(अ) जनाबाई (ब) वेणाबाई
(क) बहिणाबाई (ड) संत मुक्ताबाई

**(उ) 'ताटीचे अभंग' यांनी लिहिले.**

(अ) ज्ञानदेव (ब) संत सोपानदेव
(क) संत मुक्ताबाई (ड) संत जनाबाई

**(ऊ) नामदेवांचे गुरु हे होते**

(अ) निवृत्तीनाथ (ब) संत गोरोबा
(क) विसोबा खेचर (ड) संत मुक्ताबाई

©KTBS Not to be republished

(ए) **ताटी याचा अर्थ ...............**

(अ) दार (ब) खिडकी

(क) ताट (ड) भिंत

(ऐ) **'जननी'चा समानार्थी शब्द ...............**

(अ) भार्या (ब) भगिनी

(क) माऊली (ड) पिता

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) संत गोरा कुंभारांनी साखरेचे उदाहरण का दिले आहे?

(आ) 'ताटीचे अभंग' याचा अर्थ सांगा.

(इ) संत मुक्ताबाईनी संतांचे कोणते लक्षण सांगितले आहे?

(ई) संत मुक्ताबाईच्या मते विरक्त कोणाला म्हणावे?

(उ) संत मुक्ताबाईने ज्ञानेश्वरांना कोणती विनंती केली आहे?

(ऊ) संत नामदेव कोणाला लोटांगण घालावे असे म्हणतात?

(ए) परमेश्वराचे नाव कसे घ्यावे?

(ऐ) मनात कोणता भाव दृढ धरावा?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भक्तीचा आनंद शब्दातून व्यक्त करता येत नाही तेव्हा भक्ताची स्थिती कशी असते?

(आ) संत मुक्ताबाईंनी संताच्या सद्‌गुणांचे वर्णन कसे केले आहे. ते लिहा.

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) जग हे करणे शहाणे बापा ।।

(आ) मिथ्या कल्पना मागे सारा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।

(इ) सर्वकाळ प्रीति संतांचीया संगे । गावें अनुरागें हरी-नाम ।।

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) संत मुक्ताबाईनी ताटीचे अभंग कोणत्या प्रसंगी लिहिले आहेत?

(आ) संत गोरा कुंभारांनी मुक्या माणसाचे उदाहरण का दिले आहे?

©KTBS Not to be republished

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) 'मुकिया साखर चाखावया दिधली।' या संत गोरा कुंभाराच्या अभंगाचा भावार्थ लिहा.

(आ) संत नामदेवांच्या मते माणसाने प्रापंचिक जीवनात कसे वागावे?

**भाषाभ्यास**

**(अ) समानार्थी शब्द लिहा.**

अहंता, इहलोक, जननी, दया, दरवाजा, द्रव्य, दारा, प्रीति, समुदाय, बोली

**(आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

मुका, दया, शांती, मिथ्या, संतोष, अनुराग, सुखी, शहाणा,

**उपक्रम :**

- 'सकलसंतगाथा' या पुस्तकातील संत नामदेवांचे, संत तुकारामांचे अभंग वाचा.
- पिरोज आनंदकर यांचे 'संत कवयित्री' हे पुस्तक वाचा.
- संतांची छायाचित्रे गोळा करा.
- श्री प्र. न. जोशी यांचे 'आपले संत' हे पुस्तक वाचा.
- 'माझा आवडता संत' या विषयावर पंधरा ओळी निबंध लिहा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| तात्त्विक | त्र्यंबक | अश्वत्थामा |
| दुराभिमान | दूर्वा | निरीक्षक |

©KTBS Not to be republished

# २. सत्वर पाव गे मला

**संत एकनाथ**

**परिचय :**

परिचय: संत एकनाथ (1538-1599) हे पैठणचे रहिवासी. जनार्दन स्वामी हे त्यांचे गुरु असून त्यांच्यावर भागवत संप्रदायाचा प्रभाव होता. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय नाथांच्या जीवनात आढळतो, ज्ञानेश्वरीच्या प्रतिंचे शोधन, संपादन व ज्ञानेश्वरांच्या समाधीचा पुनरुद्धार त्यानी केला. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर या त्याच्या प्रमुख ग्रंथरचना होत. या शिवाय त्यांनी अध्यात्मिक स्फुट अभंग रचना केल्या तसेच पदे, गौळणी, भारूडे अशी विपुल व विविध प्रकारची रचना त्यानी केली. त्यांची भारूडे सर्वाधिक लोकप्रिय असून मनोरंजनातून त्यांनी अध्यात्मिक व सामाजिक प्रबोधन केले.

प्रस्तुत भारूड नाथांचे प्रसिद्ध भारुड असून त्यात त्यांनी सासुरवाशिणीचे रूपक वापरले आहे. संसाराच्या जाचाला कंटाळून सासुरवाशीण भवानी आईला, प्रसन्न होउन संसारातून मुक्ती दे असे मागणे मागत आहे. येथे सुनरूपी जीव हा आनंदी, निर्गुण अशा मायेला विनंती करून जीवाचा उद्धार कर असे सांगत आहे. सुनेने केलेली सासरच्या जाचायी तक्रार आणि तिचे अध्यात्माशी जोडलेले नाते यातून रंजकता, पारमार्थिक मार्गदर्शन या दोन्ही गोष्टी नाथांनी या भारूडातून साधल्या आहेत.

**मूल्य – भक्ती, श्रद्धा**

सत्वर पाव गे मला ।
भावानी आई रोडगा वाहीन तुला ।।
सासरा माझा गांवी गेला ।
तिकडेच खपवी त्याला ।।
सासू माझी जाच करती ।
लवकर निर्दाळी तिला ।।
जाऊ माझी फडफड बोलती ।
बोडकी कर गे तिला ।।
नणदेचे पोर किरकीर करितें ।
खरूज होउदे त्याला ।।
दादला मारून आहुती देईन ।
मोकळी कर गे मला ।।
एका जनार्दनी सगळेचि जाउं दे ।
एकटीच राहू दे मला ।।

©KTBS Not to be republished

**कढीण शब्दार्थ :**

सत्वर - ताबडतोब, बोडकी - विधवा, रोडगा - देवोला वहावयाचा विशिष्ट रोट,

**भारूडात वापरलेली रूपके :**

1) सासुरवाशिण - जीव - (सुन - जीव) 2) सासरा - अहंकार 3) सासू -देहबुद्धी 4) जाऊ - वासना 5) नणंदेच पोर - मोह 6) नणंद - आशा.

**स्वाध्याय :**

**प्र. 1 ला खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडून लिहा.**

**अ) रोडगा म्हणजे.........**

अ) भेट वस्तू  ब) देवीला वहावयाचा विशिष्ट रोट

क) रोडाविणे  ड) बक्षिस देणे

**आ) या भारुडात जागोजागी हा अलंकार आहे.**

अ) यमक  ब) श्लेष

क) अनुप्रास  ड) रूपक

**इ) सासुरवाशिण, कोण किरकीर करते असे म्हणते?**

अ) नणंद  ब) नणदेचे पोर

क) दादला  ड) जाऊ

**प्र. 2 रा खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

अ) संसाराच्या जाचाला कोण कंटाळले आहे?

आ) एकनाथानी आपल्या भारुडात सासूसाठी कोणते रूपक वापरले आहे?

इ) सासूरवाशिणीला फडफड कोण बोलते?

**प्र. 3 रा खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) या भारुडातील सासूरवाशिणीला कोण जाच करत आहे?

आ) जीवरूपी सुन भवानी आईला काय वाहू इच्छिते?

©KTBS Not to be republished

**प्र. 4 या संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

अ) सासू माझी जाच करती । लवकर निर्दाळी तिला ।।
आ) दादला मारून आहुती देईन । मोकळी करगे मला ।।

**प्र. 5 वा खालील प्रश्नाचे पाच ते सहा ओळीत उत्तर लिहा.**

संत एकनाथांच्या या भारुडातून प्रकटणारे रूपक उलगडून दाखवा.

**प्र. 6 वा खालील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा**

या भारूडाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा

**उपक्रम:**

- विंचू चावला हे संत एकनाथांचे भारूड मिळवून सारांश लिहा.
- तुमच्या शाळेतल्या गायन स्पर्धेत या भारूडाचे गायन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| खपवी | निर्दाळी | किरकीर |
| आहुती | मोकळी | खरूज |

©KTBS Not to be republished

# ३. सुश्लोक वामनाचा

**वामन पंडित**

**परिचय :**

वामन नरहर शेषे (1608-1695) पंडिती संप्रदायाचे प्रातिनिधीक कवी, त्यांचे संस्कृत व फारसी भाषेवर प्रभुत्व होते. त्यांचे वेदान्तविषयक, पौराणिक, आख्यानपरकाव्य, भाषांतरित श्लोकात्मक काव्य, असे वैविध्यपूर्ण लेखन प्रसिद्ध आहे. त्यांची 'यथार्थदीपिका' ही गीतेवरील टीका प्रसिद्ध आहे. 'निगमसार', 'श्रुतिसार', 'गीतार्णवसुधा' हे अध्यात्मपर ग्रंथ, 'भरतभाव', 'बालक्रीडा', 'पंचसुधा' अशी सरस आख्यानकाव्ये व भर्तृहरीच्या 'नीतिशतकाचे' सरस भाषांतर केलेले त्यांचे श्लोक प्रसिद्ध आहेत. भाषाप्रभुत्व, रचनाकौशल्य, विविध वृत्तात्मक श्लोकरचना करून सुश्लोक वामनाचा ही गौरवोक्ती त्यांनी सार्थ केली आहे. यमक अलंकाराचा त्यांनी विपुल वापर केला आहे म्हणून वामन पंडिताना 'यमक्या वामन' असे संबोधले जाते.

प्रस्तुत श्लोक भर्तृहरिच्या नीतिशतकातील आहेत. हे श्लोक 'परशुरामपंत तात्या गोडबोले' यांनी संपादित केलेल्या 'नवनीत अथवा मराठी कवितांचे वेचे' यापुस्तकातून घेतले आहेत. मूर्खांची लक्षणे, नम्रता, सुसंगती इ. विचार या श्लोकांमधून मांडले आहेत.

**(मूल्य : नम्रता, सुसंगती)**
**(वृत्त–शिखरिणी)**

**(1) या श्लोकात मूर्खाचे लक्षण सांगितले आहे.**

बळाने काढूं ये मणि मकर-दाढेंत दडला ।।
महा-सिंधु-लाटा-तरण करूं येई भुज-बळा ।।
महा-सर्पातेंही सुम-सम धरूं ये निज-शिरीं ।।
परंतु क्षुद्राचे हृदय धरवेना क्षणभरी ।। 1 ।।

**(2) या श्लोकात दुसऱ्यावर उपकार करणारी व्यक्ती संपत्ती खूप असतानाही नम्रपणे वागते. हा त्यांचा स्वभावच असतो हे सांगितले आहे.**

वृक्ष फार लवती फल-भारें ।।
लोंबती जल-द घेउनि नीरें ।।
थोर गर्व न धरी वि-भवाचा ।।
हा स्व-भाव उपकार-पराचा ।। 2 ।।



©KTBS Not to be republished

**(3) या श्लोकात अधम, मध्यम व उत्तम स्वभावाच्या माणसांच्या संगतीत माणसावर कसे परिणाम होतात हे सांगितले आहे.**

(वृत्त-शार्दूलविक्रीडित)
तोयाचें परि नांवही न उरतें सं-तप्त-लोहांतरीं ।।
तें भासे नलिनी-दलावरि पहा सन्मौक्तिकाचे परी ।।
तें स्वातीस्तव अब्धि-शुक्ति-पुटकीं मोतीं घडे नेटकें ।
जाणा उत्तम-मध्यमाधम दशा संसर्ग-योगे टिके ।। 3 ।।

**(4) या श्लोकात पैशासंबंधी विचार मांडला आहे. एक द्रव्य दान करणे, दुसरे पैशाचा उपभोग घेणे. या दोन्ही गोष्टी केल्या नाहीत तर पैशाचा नाश होतो. असा विचार मांडला आहे.**

(वृत्त-वसंततिलका)
द्रव्यास हे गमन-मार्ग यथावकाश ।।
कीं दान, भोग अथवा तिसरा वि-नाश ।।
जो घे न भोग जरि, पात्र-करीं न दे ही ।।
त्याच्या धनास मग केवळ नाश पाहीं ।। 4 ।।

**(5) या श्लोकात सांगितलेल्या बारा गोष्टी हातातून नाहीशा झाल्यास जीवन वाया जाण्यास वेळ लागत नाही. म्हणून या गोष्टी वाया घालवू नका. असा विचार या श्लोकात व्यक्त केलेला आहे.**

(वृत्त-शार्दूलविक्रीडित)
दुर्मंत्रें नृप, संगतीस्तव यती, कीं पुत्रही लालनें ।।
वेदानध्ययने द्वि-जाति, कुल दुष्पुत्रें, खलाराधनें ।।
नासे शील, न पाहतां कृषि, मदें मा, लाज मद्यें फुका ।।
शाठ्यें मित्रपण, प्र-वास-गमनें स्नेह, प्र-मादें रुका ।। 5 ।।

**शब्दार्थ :**

■ बळाने - सामर्थ्यानिशी, ताकद लावून ■ मकर - मगर ■ दाढेत-दातात ■ सिंधु - समुद्र रत्नाकर ■ महासिंधु - महासागर ■ महासर्प - मोठा साप ■ भुजबळ - बाहुसामर्थ्याने ■ सुम- फूल, सुमन ■ सम - सारखे ■ निज - स्वतःच्या ■ शिरीं - मस्तकावर ■ क्षुद्र - मूर्ख माणूस ■ हृदय धरवेना - मनधरणी करणे, मनाची समजूत घालणे ■ वृक्ष - झाड ■ लवती - खाली वाकतात ■ फलभारे - फळांच्या

Not to be republished ©KTBS

ओझ्याने ■ भार -ओझे ■ फल - फळ ■ लोंबति - खाली लोंबतात, जमिनीच्या दिशेने खाली येतात ■ जलद - मेघ, ढग ■ नीर - पाणी, जल ■ विभव - संपत्ती ■ उपकारपरांचा - दुसऱ्यांवर उपकार करणाऱ्यांचा ■ तोय - पाणी ■ संतप्त - अतिशय तापलेला ■ लोह - लोखंड ■ लोहांतरीं - लोखंडावर ■ न उरते - शिल्लक राहत नाही ■ तें - तोच पाण्याचा थेंब ■ नलिनी - कमळ ■ दल - पाकळी ■ परी-प्रमाणे ■ सन्मौक्तिक - चांगल्या, सुंदर मोत्याप्रमाणे ■ स्वातीस्तव - स्वाती नक्षत्रामध्ये ■ अब्धि - समुद्र ■ शुक्ती पुट - शिंपला ■ शुक्तीपुटकीं - शिंपल्यात ■ यथावकाश-समयानुसार ■ गमनमार्ग - (पैसा) जाण्याचा मार्ग ■ दान-दान करणे ■ द्रव्य - पैसा, धन ■ भोग-उपभोग घेणे ■ करी - हाताने ■ पात्र - सत्पात्री ■ दे - दान देणे, ■ दुर्मंत्रे - दुष्ट, स्वार्थी, लाचखाऊ मंत्र्यामुळे ■ नृप - राजा ■ यती - साधु, संन्यासी ■ लालने - अति लाड केल्याने ■ वेदानध्ययने - वेदांचा अभ्यास न केल्याने, आत्मसात केलेले ज्ञान इतरांना न दिल्याने ■ द्विजाति- ब्राह्मण जात ■ दुष्पुत्रे - दुराचारी पुत्रामुळे ■ खल - दुष्ट ■ आराधने - सहवासाने ■ न पाहता - लक्ष न दिल्यामुळे ■ कृषि -शेती ■ मद्यें - मद्यपानाने ■ शाठ्यें - लबाडीने वागल्यास ■ मा -लक्ष्मी ■ मद - अति गर्व ■ रुका - पैसा ■ प्रमादे-चुकीच्या मार्गाने पैशाचा विनियोग केल्यास

**टीपा :**

■ पंचसुधा - नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, चित्सुधा, प्रियसुधा यांना पंचसुधा म्हणतात ही श्रीकृष्णभक्तीपर पाच काव्ये आहेत.

## भावार्थ

1. मगरीच्या दाढेत अडकलेला मणी आपण सामर्थ्यानिशी काढू शकतो, बाहुसामर्थ्याने महासागराच्या लाटातून आपण पैलतीराला जाऊ शकतो, मोठ्या सापाला आपण फुलाप्रमाणे मस्तकावर एक वेळ धारण करू शकू. परंतु आपण क्षणभरही मूर्ख माणसाच्या मनाची समजूत घालू शकत नाही. (म्हणजेच मूर्ख माणसाच्या मनाची समजूत घालणे कठीण आहे.)

2. झाडे फळांच्या ओझ्याने खाली वाकतात. काळे ढग पाणी घेऊन (जमिनीच्या दिशेने) खाली वाकतात. थोर मनाचे लोक आपल्याजवळील संपत्तीचा गर्व करीत नाहीत. दुसऱ्यावर उपकार करणाऱ्या माणसांचा वैभवकाळ जवळ असताना नम्रपणे वागणे हा स्वभावच असतो.

3. तापलेल्या लोखंडावर पाण्याचा थेंब पडला असता तो शिल्लकही रहात नाही. (त्याचा लवलेशही राहत नाही) तोच पाण्याचा थेंब कमळाच्या पाकळीवर पडला असता सुंदर मोत्याप्रमाणे चम कतो. तोच पाण्याचा थेंब जर स्वाती नक्षत्रामध्ये समुद्रातील शिंपल्यात पडला तर त्याचा सुंदर मोती बनतो. यावरून संगतीने अनुक्रमे अधम, मध्यम व उत्तम अवस्था प्राप्त होतात.

©KTBS Not to be republished

4. काळानुसार द्रव्याचे खर्च होण्याचे पुढीलप्रमाणे मार्ग आहेत. दान करणे, उपभोग घेणे व द्रव्याचा नाश होणे. जो पैशाचा उपभोग घेत नाही, सत्पात्री दान करीत नाही त्याच्या पैशाला नाश होणे ही अवस्था प्राप्त होते.

5. या श्लोकात सांगितलेल्या बारा गोष्टी माणसाच्या हातातून नाहीशा झाल्यास जीवन वाया जाते म्हणून या गोष्टी वाया घालू नका. दुष्ट, स्वार्थी, लाचखाऊ मंत्र्यांच्यामुळे राजाचे जीवन नष्ट होते. प्रापंचिक माणसाच्या संगतीने संन्यासी माणसाचे जीवन नष्ट होते. मुलाचे खूप लाड केल्यामुळे तो बिघडतो. वेदांचा अभ्यास न केल्याने व आत्मसात केलेले ज्ञान इतरांना न दिल्यामुळे ब्राह्मण जात नष्ट होते. दुराचारी पुत्रामुळे कुळाचा नाश होतो. दुष्टांच्या संगतीने शील बिघडते. शेतीकडे दुर्लक्ष केल्यामुळे (शेतीची नीट देखभाल न केल्यामुळे) शेती नष्ट होते. उन्मत्तपणाच्या वागण्याने लक्ष्मी निघून जाते. मद्यपानामुळे अब्रू (प्रतिष्ठा) नष्ट होते. लबाडीने वागल्यास मैत्री नष्ट होते. सतत प्रवासाला गेल्याने स्नेह नष्ट होतो. चुकीच्या मार्गाने पैसा खर्च केल्याने पैसा नष्ट होतो.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) वामन पंडित या परंपरेतील अग्रगण्य कवी होत.**
(अ) संत परंपरा (ब) पंडिती परंपरा
(क) शाहिरी (ड) अर्वाचीन काव्य

**(आ) 'यमक्या वामन' असे यांना म्हणतात.**
(अ) मोरोपंत (ब) मुक्तेश्वर
(क) वामन पंडित (ड) नरहरी

**(इ) 'सुश्लोक वामनाचा' या कवितेतील श्लोक या पुस्तकातून घेतले आहेत.**
(अ) नीतिशतक (ब) वैराग्य शतक
(क) शृंगार शतक (ड) केकावली

**(ई) दुसऱ्यावर उपकार करणाऱ्यांचा स्वभाव हा आहे.**
(अ) दान करणे (ब) नम्र होणे
(क) कष्ट करणे (ड) दया करणे

**(उ) जल देणारा तो ..............**
(अ) जलदाई (ब) जलद
(क) जलदाता (ड) नभ

©KTBS Not to be republished

(ऊ) **अतिलाड केल्याने .....**

(अ) मुलगा आनंदीत होतो (ब) सुसंस्कार होतो

(क) मुलगा बिघडतो (ड) मुलगा हट्टी होतो.

(ए) **राजा व राज्य यामुळे लयाला जाते.**

(अ) दुष्ट, स्वार्थी, लाचखाऊ मंत्र्यांमुळे (ब) ऐषारामामुळे

(क) पैसा उधळल्याने (ड) आळसामुळे

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) वामन पंडितांनी आपल्या काव्यात कोणत्या अलंकाराचा विपुल प्रमाणात वापर केला आहे?

(आ) झाडे कशाच्या ओझ्याने खाली वाकतात?

(इ) थोर माणसे कशाचा गर्व करीत नाहीत?

(ई) पाण्याचा थेंब केव्हा मोत्याप्रमाणे चमकतो?

(उ) लोखंडाच्या उदाहरणातून कवीने कोणता विचार मांडला आहे?

(ऊ) धनाच्या तीन अवस्था कोणत्या?

(ए) ब्राह्मणजात कशामुळे नष्ट होत आहे असे वामनपंडितांना वाटते?

(ऐ) शेती कोणत्या कारणाने नापीक बनते?

(ओ) लक्ष्मी कोणत्या कारणाने नष्ट होते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मूर्खाचे लक्षण सांगा?

(आ) 'परोपकारी व्यक्तीचा स्वभाव संपत्तीकाळातही नम्र असतो' यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.

(इ) सज्जनांच्या संगतीने उत्तम अवस्था प्राप्त होते हे पटवून देण्यास कोणते उदाहरण दिले आहे?

(ई) संगतीने माणसाला अधम, मध्यम अवस्था प्राप्त होते हे सांगण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.

©KTBS Not to be republished

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) परंतु क्षुद्राचे हृदय धरवेना क्षणभरी ।।

(आ) हा स्वभाव उपकार-पराचा ।।

(इ) ते स्वातीस्तव अब्धिशुक्ती-पुटकीं मोती घडे नेटकें ।

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) द्रव्याच्या तीन अवस्थांचे वर्णन करा.

(आ) मूर्खाची समजूत घालणे कठीण आहे यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत.

**प्र.6 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) परोपकारी व्यक्तींचा स्वभाव कसा असतो? हे सांगण्यासाठी कोणती उदाहरणे दिली आहेत?

(आ) जीवनातील कोणत्या गोष्टी हातातून निघून गेल्यास जीवन वाया जाते असे लेखकाला वाटते?

**भाषाभ्यास :**

**(अ) समानार्थी शब्द लिहा.**

मकर, सिंधु, सुम, वृक्ष, मेघ, पाणी, कमल, पैसा, कर, नृप.

**(आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

उपकार, नम्र, गमन, तप्त, दुष्ट, अध्ययन, बलवान, पात्र.

**(इ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

महासर्प, महासिंधु, जलद, फलभार, गमनमार्ग, दुष्पुत्र, दुर्मंत्रे.

**(ई) अलंकार ओळखा.**

वृक्ष फार लवती फलभारे ।।<br>
लोंबती जल-द घेऊनी नीरें ।<br>
थोर गर्व न धरी वि-भवाचा ।।<br>
हा स्वभाव उपकार पराचा ।

©KTBS Not to be republished

## (ई) लघुगुरु खुणा करा व वृत्त ओळखा.

1. तोयाचें परि नावही न उरतें सं-तप्त-लोहांतरी ।।
2. द्रव्यास हे गमनमार्ग यथावकाश
3. दुर्मंत्रे नृप, संगतीस्तव यती, कीं पुत्रही लालने ।

## (उ) संधी सोडवा

दुर्मंत्रे, दुष्पुत्र, खलाराधने

## उपक्रम :

- समर्थ रामदास स्वामींचे 'मनाचे श्लोक' पाठ करा.
- 'माझा आवडता कवी' यावर पंधरा ओळी निबंध लिहा.
- वामन पंडितांचे 'बालक्रीडा' हे पुस्तक वाचा.

## शुद्धलेखन :

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| निःस्पृह | निःश्वास | परीक्षक |
| परीक्षा | नेऊन | सूचना |

©KTBS Not to be republished

# ४. फटका

**अनंत फंदी**

**परिचय :**

अनंत घोलप (1744-1819) हे अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेरचे राहणारे उत्तर पेशवाईतील लोकप्रिय शाहीर. पिढीजात सराफी व्यवसाय सोडून ते तमाशामध्ये रममाण झाले. पुढे अहिल्याबाई होळकरांच्या उपदेशामुळे तमाशाचा त्याग करून ते कीर्तनाकडे वळले. आणि प्रसिध्द कीर्तनकार म्हणूनही त्यानी लौकिक मिळविला. त्यांच्या सात पोवाडे व काही थोड्या लावण्या उपलब्ध आहेत. त्यांचे फटके आजही रसिकांना आवडतात. 'माधवग्रंथ' किंवा 'माधवनिधनकाव्य' ही त्यांची रचना प्रसिद्ध आहे.

'फटका' या रचना प्रकारात नीतीच्या उपदेशाचे फटके सांगून जनसामान्यांना सरळमार्गी आयुष्य व्यतीत करण्याचा उपदेश केलेला आहे. हा फटका म. ना. अदवंत यांच्या 'पैंजण' या पुस्तकातून घेतला आहे.

**(मूल्य सदाचार)**

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको ।
संसारामधिं ऐस आपला उगाच भटकत फिरूं नको ।।
चल सालसपण धरूनि निखालस बोला खोट्या बोलुं नको ।
अंगि नम्रता सदा असावी राग कुणावर धरूं नको ।
नास्तिकपणांत शिरूनि जनाचा बोल आपणा घेउं नको ।।
भली भलाई कर काही पण अ-धर्म-मार्गा शिरूं नको ।
माय बापांवर रूसूं नको । दूर एकला बसूं नको ।।
व्यवहारामध्ये फसूं नको । कधी रिकामा असूं नको ।।
परी उलाढाली भलभलत्या पोटासाठी करूं नको ।। 1 ।।

वर्म काढुनी शरमायाला उणें कुणाला बोलू नको ।
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करूनि हेवा झटुं नको ।।
मी मोठा शहाणा धनाढ्यहि गर्व-भार हा वाहुं नको ।
एकाहून एक चढी जगामधिं थोरपणाला मिरवुं नको ।।
हिमायतीच्या बळे गरिबगुरिबांला गुरुकावुं नको ।
दो दिवसांची जाईल सत्ता अपेश माथां घेउं नको ।

©KTBS Not to be republished

बहुत कर्जबाजारी होउनि बोज आपला दवडुं नको ।।
स्नेह्यासाठी पदरमोड कर परंतु जामिन होउं नको ।।
विडा पैजेचा उचलुं नको । उणी तराजू तोलूं नको ।
गहाण कुणाचे डुंबवुं नको । असल्यावरी भीक मागुं नको ।।
नसल्यावर सांगणे कशाला गांव तुझा भिड धरूं नको ।। 2 ।।

उगीच निंदा स्तुती कुणाची स्वहितासाठी करू नको ।
बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्रि नको ।।
कष्टाची बरी भाजी भाकरी तूपसाकरेची चोरि नको ।
आल्या अतिथा मुठभर द्याया मागें पुढती पाहुं नको ।।
दिली स्थिति देवाने तीतच मानी सुख कधिं विटुं नको ।
असल्या गाठी धन संचय कर सत्कार्यी व्यय हटूं नको ।।
आतां तुजही गोष्ट सांगतो सत्कार्मा ओसरुं नको ।
सत्कीर्ती-नौबदिचा डंका गाजे मग शंकाच नको ।
सु-विचार कातरूं नको । सत्संगत अंतरूं नको ।
द्वैताला अनुसरूं नको । हरि-भजना विस्मरुं नको ।
गावयास अनंत फंदीचे फटके मागें सरुं नको ।। 3 ।।

**शब्दार्थ :**

■ बिकट - कठीण ■ उलाढाली - उचापती, भानगडी, उपद्व्याप ■ बोज - मान, रुबाब ■ हिमायत - पाठबळ, आश्रय, आधार ■ निखालस खोटा बोल - संपूर्णपणे निर्विवाद असत्य भाषा ■ वर्म - उणीव असलेली गोष्ट ■ व्यय-खर्च ■ कातरु नको - संकोच करू नको ■ खुशामत - स्तुती ■ विटणे - कंटाळणे ■ नौबद - नगारा

**टीपा :**

■ फटका - लोकांना नीतीच्या उपदेशाचे फटके देणारी काव्य रचना. हा शाहिरी वाङ्मयाचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. त्यात लौकिक जीवन यशस्वी व्हावे म्हणून अत्यंत परखडपणे विचार मांडलेले असतात. उपदेशाच्या भूमिकेतून फटक्याचे लेखन झालेले असते. आवेशपूर्ण, जोरकस भाषेत 'फटक्या'ची रचना केलेली असते.

©KTBS Not to be republished

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) यांच्या उपदेशामुळे अनंत फंदी कीर्तनाकडे वळले.**

(अ) संत नामदेव (ब) बहिणाबाई

(क) मुक्ताबाई (ड) अहिल्याबाई

**(आ) कशाची भाजी भाकरी बरी असे अनंत फंदी म्हणतात.**

(अ) जोंधळ्याची (ब) तांदळाचीफ

(क) कष्टाची (ड) मक्याची

**(इ) कशाची चोरी करायची नाही असे अनंत फंदी म्हणतात.**

(अ) सोन्याची (ब) पैशाची

(क) तूपसाखरेची (ड) लाडूची

**(ई) कोणावर रुसू नको असे अनंत फंदी म्हणतात.**

(अ) मित्रावर (ब) पत्नीवर

(क) मायबापावर (ड) मुलांवर

**(उ) कोणाची मैत्री नको असे अनंत फंदी म्हणतात.**

(अ) शहाण्याची (ब) चोराची

(क) भिकाऱ्याची (ड) मूर्खाची

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) कवी कोणता मार्ग सोडू नको असे म्हणतात?

(आ) जगाचे बोलणे कशासाठी घ्यावे लागते?

(इ) कोणाला जामीन होऊ नको असे सांगतात?

(ई) कोणत्या कामासाठी पैसे खर्च करायला कवी सांगतात?

(उ) नौबदीचा डंका कधी वाजेल?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अंगी कोणते गुण असावेत व कोणते गुण नसावेत?

(आ) कवी कशाचा गर्व धरू नको असे सांगतात?

(इ) सत्ता, अपयश याबद्दल कवीने काय म्हटले आहे?

©KTBS Not to be republished

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) सुविचार कातरु नको । सत्संगत अंतरू नको ।।
(आ) बहुत कर्जबाजारी होऊनी । बोज आपला दवडू नको ।।

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) निंदा व स्तुती या बद्दल कवीने काय म्हटले आहे?
(आ) या फटक्यात कवीने कोणते सद्‌गुण सांगितले आहेत?

**प्र.6 (वा) खालील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) फटका या कवितेत कवीने काय काय करू नये असे सांगितले आहे?

**व्याकरण :**

**(अ) कवितेतील अनुप्रास अलंकाराचे एक उदाहरण लिहा.**

**(आ) विरुद्धार्थी शब्द लिहा.**
नास्तिक, राग, उणे, धर्म, निंदा, मूर्ख, सुख.

**(इ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**
सत्कर्म, स्वहित, तूपसाखर, सुविचार, हरिभजन

**उपक्रम :**

- कवी वि.वा. शिरवाडकरयांची 'भारतमातेची विनवणी' हा फटका वाचा.
- 'मानवी जीवनातील सदाचाराचे महत्त्व' या विषयावर दहा ओळी लिहा.
- या फटक्याचे वर्गात सामुदायिक गायन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अल्पसंख्याक | आनुषंगिक | ऊहापोह |
| कानठळी | निर्भर्त्सना | मिश्कील |

©KTBS Not to be republished

# ५. अखंड

**महात्मा जोतीराव फुले**

**परिचय :**

जोतीराव गोविंदराव फुले हे (1827-1890) एकोणिसाव्या शतकातील थोर कर्ते समाजसुधारक, समतेवर आधारलेल्या समाजाची संकल्पना मांडणारे विचारवंत होत. पारंपरिक जुन्या चालीरिती, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था आणि गुलामगिरी यांच्या विरुद्ध त्यांनी क्रांतीकारक लढा दिला. शिक्षणाचा प्रवाह समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी अपार कष्ट घेतले. सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाज सुधारणेच्या हेतूने महात्मा फुले यांनी विपुल लेखन केले आहे. 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड', 'इशारा', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'तृतीय रत्न' इत्यादी त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

संतांनी ज्या प्रमाणे 'अभंग' ही काव्यरचना केली त्याप्रमाणेच महात्मा जोतीराव फुले यांनी स्वतःच्या काव्यरचनेला 'अखंड' हे नाव दिले आहे.

मानवी आचार - विचारामध्ये सत्य, ज्ञान, सद्विवेकबुद्धी व मानवता असणे हाच मानवाचा धर्म आहे. असे प्रतिपादन खालील 'अखंडा'तून व्यक्त झाले आहे.

**(मूल्य : मानवता, परोपकार)**

सत्याचा जिव्हाळा मनाची स्वच्छता ।।
चित्तास स्वस्थता ।। जेथें आहे ।। 1 ।।
जेथे जागा धीर सदाहृदयांत ।।
सत्यवर्तनांत ।। खर्ची घाला ।। 2 ।।
पिडा दुःखे सोशी संकटे निवारी ।।
गांजल्यास तारी ।। जगामाजी ।। 3 ।।
धीर धरूनीया सर्वां सूख देती ।।
यशवंत होती ।। जोती म्हणे ।। 4 ।।

सत्याविण नाही धर्म तो रोकडा ।।
जनांशी वांकडा ।। मतभेद ।। 1 ।।
सत्य सोडूं जातां वादामध्ये पडे ।।
बुद्धीस वांकडे ।। जन्मभर ।। 2 ।।
सत्य तोच धर्म करावा कायम ।।
मानवा आराम ।। सर्व ठायी ।। 3 ।।

©KTBS Not to be republished

मानवांचा धर्म सत्य हीच नीती ।।
बाकीची कुनीती ।। जोती म्हणे ।। 4 ।।

सत्यानें वर्तावें ज्यास लोभ झाला ।।
मानवी शोभला ।। तोच सुखी ।। 1 ।।
सर्व सुखी व्हावे मुळ आशा ज्याची ।।
हाव सद्‌गुणाची ।। तोच ज्ञानी ।। 2 ।।
आपसुखदु:ख पराचें जाणतो ।।
त्यांच्याशी वर्ततो ।। तोच धन्य ।। 3 ।।
अशा मानवास सद्‌गुणी म्हणावा ।।
भावंडी गणावा ।। जोती म्हणे ।। 4 ।।

(महात्मा फुले : समग्र वाङ्मय)
अखंड क्रमांक धीर-1
निती-3 मानवी स्त्रीपुरुष - 23

**शब्दार्थ :**

■ पिडा - दु:ख ■ रोकडा - खरा ■ कुनिती - दुष्टनीती ■ लोभ - हाव ■ सत्य-खरे, प्रामाणिक

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) महात्मा जोतीबा फुले यांनी कोणत्या समाजाची स्थापना केली.**
(अ) प्रार्थना समाज (ब) ब्राह्मो समाज
(क) सत्यशोधक समाज (ड) आर्य समाज

**(आ) महात्मा जोतीबा फुले यांचा जन्म किती साली झाला?**
(अ) 1927 (ब) 1827
(क) 1826 (ड) 1829

**(इ) महात्मा फुले यांनी काव्य रचनेला कोणते नाव दिले आहे?**
(अ) अभंग (ब) ओवी
(क) अखंड (ड) श्लोक

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) मानवी चित्तास स्वस्थता केव्हा लाभते?

©KTBS Not to be republished

(आ) यशवंत होण्यासाठी कोणत्या गुणाची गरज आहे?
(इ) मानवाचा कोणता धर्म आहे?
(ई) ज्ञानी माणूस कोणाला म्हटले आहे?

**प्र.3 (रा) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) धीर धरूनीयां सर्वां सुख देती।।
यशवंत होती ।। जोती म्हणे ।।
(आ) मानवाचा धर्म सत्य हीच नीती
बाकीची कुनीती ।। जोती म्हणे ।।
(इ) आपसुखदुःख पराचें जाणतो ।।
त्यांच्याशी वततो ।। तोच धन्य ।।

**प्र.4 (था) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) मानवाला यशवंत होण्यासाठी कोण कोणत्या सद्‌गुणांची आवश्यकता आहे?
(आ) महात्मा फुले यांनी कोणत्या मानवाला सद्‌गुणी म्हटले आहे?

**प्र.5 (वा) खालील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) महात्मा फुले यांनी सत्याचे स्वरूप कसे स्पष्ट केले आहे?

**भाषाभ्यास :**

**(अ) विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा.**
सत्य, दुःख, ज्ञानी, स्वच्छता, आशा, धर्म, सद्‌गुण

**उपक्रम :**

- 'जीवनात सद्‌गुणाचे महत्त्व' या विषयावर दहा ओळीत माहिती लिहा.
- महात्मा फुले यांच्या 'अखंडा'तील सद्‌गुण विचारांचा संग्रह करा.
- धनंजय कीर लिखित 'महात्मा जोतीराव फुले' हे चरित्र वाचा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| अनावृत्त | षष्ट्यब्दीपूर्ती | मंत्रिपद |
| अन्नूनुकसानी | पोलीस | दीपावली |

©KTBS Not to be republished

# ६. प्रेमस्वरूप आई !

**माधव जूलियन**

**परिचय :**

माधव त्रिंबक पटवर्धन (1894-1939) हे 'रविकिरण मंडळ' या प्रसिद्ध कविमंडळाचे सभासद होते. 1936 साली जळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. 'छंदोरचना' या ग्रंथाबद्दल मुंबई विद्यापीठाची डी.लिट. ही पदवी त्यांना मिळाली. इंग्रजी व फारसी भाषेचे ते प्राध्यापक होते. 'विरहतरंग', 'नकुलालंकार', 'सुधारक' ही खंडकाव्ये 'स्वप्नरंजन', 'तुटलेले दुवे', 'मधुलहरी' इत्यादी कवितासंग्रह. गझल, सुनीत, रुबाया या काव्य प्रकारांचे लेखन, अशी विपुल रचना त्यांनी केली आहे. 'प्रणय पंढरीचे वारकरी' असे त्यांना संबोधण्यात येते.

प्रेमस्वरूप आई ही कविता 'गज़लांजली' या पुस्तकातून घेतली आहे. 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' असे आईच्या मोठेपणाबद्दल गुणगान केले आहे. 'आईविणे पोरका' राहिलेल्या एका मुलाच्या भावनांचे हळुवार आणि हृदयस्पर्शी चित्रण या कवितेत केले आहे. मातेच्या वियोगाने आणि आठवणीने येणारी व्याकुळता शब्दाशब्दांतून कशी व्यक्त होते. ते या कवितेतून व्यक्त झाले आहे.

**(मूल्य : मातृप्रेम)**

प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई !
बोलावु तूज आता मी कोणत्या उपायी

नाही जगात झाली आबाळ या जिवाची
तूझी उणीव चित्ती आई, तरीहि जाची
चित्ती तुझी स्मरेना काहीच रूपरेखा
आई हवी म्हणूनी सोडी न जीव हेका

विद्याधनप्रतिष्ठा लाभे आता मला ही
आईविणेपरी मी हा पोरकाच राही
सारे मिळे परंतु आई पुन्हा न भेटे
तेणे चिताच चित्ती माझ्या अखंड पेटे

©KTBS Not to be republished

आई, तुझ्या वियोगे ब्रह्मांड आठवे गे !
कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगे
किंवा विदेह आत्मा तूझा फिरे सभोती,
अव्यक्त अश्रुधारा की तीर्थरूप ओती !

ही भूक पोरक्याची होई न शांत आई,
पाहूनिया दुज्यांचे वात्सल्य लोचनांही
वाटे इथून जावे, तूझ्यापुढे निजावे,
नेत्री तुझ्या हसावे, चित्ती तुझ्या ठसावे !

**शब्दार्थ :**

■ आबाळ होणे - हेळसांड होणे ■ हेका - हट्ट ■ जाच - त्रास ■ चित्ती- मनात ■ वियोग - ताटातूट ■ उल्का - तारका ■ विदेह - देहरहीत ■ ब्रह्मांड आठवणे- खूप दुःख होणे ■ वात्सल्य - प्रेम, माया, ममता ■ ठसावे - स्थिर होणे ■ सिंधु - समुद्र, सागर

**स्वाध्याय :**

प्र.1 ला) **खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) माधव जूलियन या मंडळाचे सभासद होते.**
(अ) साहित्य मंडळ (ब) साहित्य अकादमी
(क) रविकिरण मंडळ (ड) चंद्रकिरण मंडळ

**(आ) 'सुधारक' या पुस्तकाचा साहित्य प्रकार हा आहे.**
(अ) खंडकाव्य (ब) सुनीत काव्य
(क) विडंबन काव्य (ड) नाटक

**(इ) कवीचा जीव याचा हेका सोडीना**
(अ) विद्या हवी (ब) आई हवी
(क) धन हवे (ड) वडील हवे

**(ई) काय सोडून उल्के समान वेगाने ये असे म्हंटले आहे.**
(अ) कैलास (ब) आकाश
(क) हिमालय (ड) स्वर्ग

प्र.2 (रा) **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) कवी माधव जूलियनना काय म्हणून संबोधण्यात येत असे?
(आ) कवीचे पूर्ण नाव लिहा.
(इ) विद्याधनप्रतिष्ठा लाभूनसुद्धा कवी पोरकाच का?
(ई) भूक पोरक्याची शांत का होत नाही?

© KTBS Not to be republished

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची तीन किंवा चार वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवीला ब्रह्मांड का आठवत आहे?
(आ) वात्सल्यसिंधु असे कोणाला व का म्हटले आहे?
(इ) दुसऱ्यांचे वात्सल्य पाहून कवीला काय वाटते?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''आईविणेपरी मी हा पोरकाच राही''
(आ) ''नेत्री तुझ्या हसावे, चित्ती तुझ्या ठसावे!

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची आठ ते दहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) मातेच्या वियोगाने आणि आठवणींने येणारी व्याकुळता व्यक्त करा.
(आ) अव्यक्त अश्रुधारा म्हणजे काय?

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील ओळीतील अलंकार ओळखा व लक्षणे सांगा.**
(अ) प्रेमस्वरूप आई ! वात्सल्यसिंधु आई !
(अ) कैलास सोडुनी ये उल्केसमान वेगे

**(आ) पुढील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**
वात्सल्यसिंधु, रूपरेखा, विद्याधनप्रतिष्ठा, विदेह, अव्यक्त.

**(इ) वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**
आबाळ होणे, हेका न सोडणे, ब्रह्मांड आठवणे, चित्ती ठसणे.

**उपक्रम :**

- 'गझल' या काव्यप्रकाराची माहिती मिळवा.
- कवी यशवंत यांची 'आई' ही कविता वाचा.
- 'जननी जन्मभूमी स्वर्गाहुनही श्रेष्ठ' या विषयावर निबंधलेखन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा.

| | | |
|---|---|---|
| मनमिळाऊ | पश्चात्ताप | नेस्तनाभूत |
| प्रगतिशील | सहायक | हार्दिक |


©KTBS Not to be republished

# ७. पोया (पोळा)

**बहिणाबाई चौधरी**

**परिचय :**

बहिणाबाई चौधरी (1880-1951) खानदेशातील खेड्यात शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जन्मजात त्यांना काव्यप्रतिभा लाभली होती. निरक्षर असूनही त्यांच्या कवितेतून जीवनाचे साकल्याने दर्शन घडते. ग्रामजीवन संस्कृती व निसर्ग यांचे सुरेख चित्रण त्यांच्या काव्यातून होते. 'बहिणाबाईंची गाणी' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. अनुभवाचा अस्सलपणा, सुंदर कल्पकता, गेयता, कल्पना विलास, बोलीभाषेचा गोडवा ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. ''निसर्गकन्या'' म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.



पोया ही कविता जित्राब : मराठी ग्रामीण कविता- संपादक प्रा.भैरव कुंभार, प्रा.मंदा कदम या पुस्तकातून घेतली आहे. बैलांच्या वर्षभराच्या कष्टाविषयी कृतज्ञता प्रस्तुत कवितेत व्यक्त केली आहे.

© KTBS Not to be republished

**(मूल्य : कृतज्ञता)**

आला आला शेतकऱ्या
पोयाचा रे सन मोठा
हातीं घेईसन वाट्या
आता शेंदूराले घोटा

आता बांधा रे तोरनं
सजवा रे घरदार
करा आंघोयी बैलाच्या
लावा शिंगाले शेंदूर

लावा शेंदूर शिंगाले
शेंब्या घुंगराच्या लावा
गयामधी बांधा जीला
घंट्या घुंगरू मिरवा

बांधा कवड्याचा गेठा
आंगावऱ्हे झूल छान
माथां रेसमाचे गोंडे
चारी पायात पैंजन

उठा उठा बह्यनाई,
चुल्हे पेटवा पेटवा
आज बैलाले नीवद
पुरनाच्या पोया ठेवा

वढे नांगर वखर
नही कष्टाले गणती
पीक शेतकऱ्या हाती
याच्या जीवावर शेती

उभे कामाचे ढिगारे
बैल कामदार बंदा

©KTBS Not to be republished

याले कहीनाथे झूल
दानचाऱ्याचाज मिंधा

चुल्हा पेटवा पेटवा
उठा उठा आयाबाया
आज बैलाले खुराक
रांधा पुरनाच्या पोया

खाऊ द्या रे पोटभरी
होऊ द्यारे मगदूल
बशीसनी यायभरी
आज करू द्या बागूल

आता ऐका मनातलं
माझं येकीचं सांगनं
आज पोयाच्या सनाले
माझं येवढं मागनं

कसे बैल कुदाळता
आदाबादीची आवड
वझं शिंगाले बांधता
बाशिंगाचं डोईजड

नका हेंडालू बैलाले
माझं ऐका रे जरासं
व्हते आपली हाऊस
आन बैलाले तरास

आज पुंजा रे बैलाले
फेडा उप्काराचं देनं
बैला, खरा तुझा सन
शेतकऱ्या तुझं रीन !

**शब्दार्थ :**

■ शेंदूर - हा एक केशरी रंग ■ घोटा- घोटणे, ढवळणे ■ शेंब्या-शिंगाच्या टोकाला पितळी टोपणाचा अलंकार असतो ■ अंगावऱ्हे - अंगावर ■ बह्यनाई - बहिणाई (बहीण) ■ चुल्हे - चूल, चुलवण ■ पुरनाच्या पोया - पुरणाच्या पोळ्या ■ वखर - शेतीचे अवजार ■ गणती- मोजणी ■ कामदार बंदा- काम

©KTBS Not to be republished

करणारा एकमेव असा ■ हेंडालू - झोंबा झोंबी ■ मगदूल - खाऊन सुस्त होणे ■ बागूल - मुलांना भय दाखवण्याकरता केलेला एक पुतळा ■ खुराक - खाद्य

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) शेतकऱ्याचा मोठा सण कोणता?**

(अ) पोया (ब) पुरन पोया

(क) बैलांचा (ड) शेतीचा

**(आ) 'पोळा' सणाला घरदार कसे सजवावयास सांगितले आहे?**

(अ) शेंदूर लाऊन (ब) तोरण बांधून

(क) पोळ्या करून (ड) नैवेद्य दाखवून

**(इ) बैलांच्या गळ्यामध्ये बांधलेल्या शेंब्या कशाच्या आहेत?**

(अ) घंट्या घुंगरू (ब) कवड्या

(क) रेशमाचे गोंडे (ड) पैंजण

**(ई) बैलांना कशाचा नैवेद्य ठेवावयास सांगितले आहे?**

(अ) पुरणाच्या पोळ्या (ब) दहीभात

(क) कडबू (ड) आंबील

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) शेंदूर घोटण्यास का सांगितले आहे?

(आ) कवयित्रीने घरदार का व कशाप्रकारे सजवावयास सांगितले आहे?

(इ) कोणाच्या कष्टाला गणती नाही, असे कवयित्रीला वाटते?

(ई) शेतकरी कोणाच्या जीवावर शेती पिकवितो?

(उ) 'बैल कामदार बंदा' असे का म्हटले आहे?

(ऊ) पोळा या सणादिवशी बैलांना खुराक कशाचा दिला आहे?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पोळा या सणादिवशी बैलांना सजविण्याचे वर्णन कसे केले आहे?

(आ) बैलाच्या कष्टाचे वर्णन कसे केले आहे?

©KTBS Not to be republished

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'उभे कामाचे ढिगारे, बैल कामदार बंदा
याला कहीनाथे झूल, दानचाऱ्याचाज मिंधा''

(आ) 'नका हेंडालू बैलाले, माझं ऐका रे जरासं
व्हते आपली हाऊस, आन बैलाला तरास''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) पोळा सणादिवशी कवयित्री कोणती विनंती करते?

(आ) बैलाच्या उपकारांच देणं कसं फेडावयास सांगतात?

**प्र.6 (वा) पुढील प्रश्नाचे सात ते आठ ओळीत उत्तर लिहा.**

(अ) पोळा सणाचे वर्णन कवयित्रीने कसे केले आहे, याचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

उपकारांच देणं, तो कामदार बंदा, नाही कष्टाला गणती, तोरण बांधणे, शेंदूर लावणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

शेंदूर, चुल्हे, बंदा, खुराक

**(इ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

घंट्याघुंगरू, पुरणपोळ्या, आयाबाया, घरदार, नांगरवखर, दानचारा

**उपक्रम :**

- ग्रामीण गीतांसाठी ग.ल. ठोकळ यांचा 'मीठ भाकर' हा काव्यसंग्रह वाचा.
- पोळा या सणाबद्दल लेखन करा.
- पाळीव प्राण्यांची चित्रे जमवून त्याचे महत्त्व लिहा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| गुंफित | पलीकडे | प्रतिकार |
| मिस्कील | शारीरिक | समीक्षा |

©KTBS Not to be republished

# ८. आचंद्रसूर्य नांदो

**ग.दि. माडगूळकर**

**परिचय :**

गजानन दिगंबर माडगूळकर (1919 - 1977) प्रसिद्ध कवी, कथाकार, कादंबरीकार, पटकथालेखक. 'जोगिया', 'चैत्रबन', 'गीतरामायण' इत्यादी काव्यसंग्रह 'आकाशाची फळे' ही कादंबरी 'वाटेवरल्या सावल्या' हे आत्मचरित्र ही त्यांची ग्रंथसंपदा. 'जोगिया', 'चैत्रबन', 'मंतरलेले दिवस' या पुस्तकांना म हाराष्ट्र शासनाची पारितोषिके. भारत सरकारतर्फे पद्मश्री किताबाने सन्मानित करण्यात आले. 1976 च्या यवतमाळ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. मराठमोळ्या जीवनाचे विविधरंगी चित्रण व उत्कट भावनाशीलता ही लेखन वैशिष्ट्ये. गीतारामायणाच्या रचनेनंतर त्यांना 'आधुनिक वाल्मि की' म्हणून ओळखले जाऊ लागले.

प्रस्तुत कविता सुरेश गंगाधर तुप्तेवार यांनी संकलन केलेल्या 'देशभक्ती गीतातून' घेतली आहे. स्वतंत्र भारताचा पौराणिक, ऐतिहासिक व राजकीय दृष्टांत देऊन गौरव केलेला आहे.

**(मूल्य – देशप्रेम, देशभक्ती)**

हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।।

कर्तव्यदक्ष भूमी, सीतारघूत्तमाची
रामायणे घडावी, येथे पराक्रमाची
शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।। 1 ।।

येथे नसो निराशा, थोडया पराभवाने
पार्थास बोध केला, येथेच माधवाने
हा देश स्तन्य प्याला, गीताख्य अमृताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।। 2 ।।

येथेच मेळ झाला, सामर्थ्य संयमाचा
येथेच जन्म झाला, सिद्धार्थ गौतमाचा
हे क्षेत्र पुण्यदायी, भगवान तथागताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।। 3 ।।

हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे
सत्यार्थ झुंज घ्यावी, या जागत्या प्रथेचे

©KTBS Not to be republished

येथे शिवप्रतापी, नरसिंह योग्यतेचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।। 4 ।।
येथे परंपरांचा सन्मान नित्य आहे
जनशासनातळीचा पायाच 'सत्य' आहे
येथे सदा निनादो, जयगीत जागृताचे
आचंद्रसूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे ।। 5 ।।

**शब्दार्थ :**

■ आचंद्रसूर्य - चंद्रसूर्य असेपर्यंत ■ प्रेषित- अनुयायी ■ हिमवंत-हिमालय ■ पार्थ - अर्जुन ■ माधव - श्रीकृष्ण ■ गीताख्य- भगवद्गीता ■ जनशासन - लोकसत्ता ■ सीतारघूत्तम- सीता व श्रीराम ■ सत्यार्थ - सत्यासाठी

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) ग. दि. माडगूळकर यांचा जन्म या वर्षी झाला.**
(अ) 1977 (ब) 1919
(क) 1976 (ड) 1980

**(आ) 'आकाशाची फळे' या पुस्तकाचा साहित्य प्रकार हा आहे.**
(अ) कादंबरी (ब) काव्यसंग्रह
(क) आत्मचरित्र (ड) कथासंग्रह

**(ई) पार्थास बोध यांने केला.**
(अ) श्रीरामान (ब) शिवबाने
(क) माधवाने (ड) गौतमाने

**(उ) येथे याचा पायाच सत्य आहे.**
(अ) जनशासनाचा (ब) भांडवलशाहीचा
(क) हुकूमशाहीचा (ड) सावकारशाहीचा

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) 'गदिमांना' भारत सरकारने कोणता किताब दिला?
(आ) 'आधुनिक वाल्मिकी' असे कोणाला म्हटले आहे?
(इ) येथे मेळ कशाकशाचा झाला आहे?
(ई) नरसिंह योग्यतेचे कोण आहे?
(उ) हा देश कशाचे स्तन्य प्याला आहे?

©KTBS Not to be republished

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हे क्षेत्र पुण्यदायी कशाने बनले आहे?
(आ) परंपरांचा सन्मान नित्य आहे असे कवींने का म्हटले आहे?
(इ) या देशातील जागती प्रथा कोणती?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'शिर उंच उंच व्हावे, हिमवंत पर्वताचे'
(आ) 'येथे सदा निनादो, जयगीत जागृताचे''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) कवितेचा सारांश थोडक्यात लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) समानार्थी शब्द लिहा**
बोध, झुंज, अमृत, पर्वत, चंद्र, सूर्य

**(आ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**
आचंद्रसूर्य, कर्तव्यदक्ष, पुण्यदायी, नरसिंह

**(इ) अलंकार ओळखा व लक्षणे लिहा.**
हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे.

**उपक्रम :**

- देशभक्तीपर गीतांचे संकलन करा.
- 'जयभारता' ही कवी कुसुमाग्रजांची कविता मिळवून वाचा.
- 'राष्ट्रीय एकात्मता : काळाची गरज' या विषयावर निबंध लेखन करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| शिशिर | नैर्ऋत्य | तत्काळ |
| जाज्वल्य | प्रथितयश | एकसष्टी |

© KTBS Not to be republished

# ९. हिरवळ आणिक पाणी

**बा.भ. बोरकर**

**परिचय :**

बाळकृष्ण भगवंत बोरकर (1910-1984) यांचा जन्म गोव्यातील बोरी येथे झाला. 'चित्रवीणा', 'दूधसागर', 'कांचनसंध्या', 'अनुरागिणी' इत्यादी कविता संग्रह 'भावीण', 'मावळता चंद्र' या कादंबऱ्या हे त्यांचे साहित्य प्रसिद्ध आहे. हा सौंदर्यवादी वृत्तीचा आनंदयात्री कवी. बोरकरांची भारतीय संस्कृती व जीवन मूल्ये यावर अपार श्रद्धा होती. नादमाधुर्य आणि सौंदर्यसृष्टी हे त्यांच्या लेखनाचे विशेष. भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. महाराष्ट्र राज्य पुरस्कारही त्यांना मिळालेला आहे.

ही कविता त्यांच्या 'चित्रवीणा' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेमध्ये कवीने निसर्गातील सृष्टीसौंदर्य, पाणी, हिरवळ, पशु, पक्षी, वनस्पती यांच्या रूपकातून मानवाच्या भावभावनांचे तसेच परस्परांवरील प्रेम व श्रद्धा यांचे दर्शन घडविले आहे.



©KTBS Not to be republished

**(मूल्य – निसर्गप्रेम)**

हिरवळ आणिक पाणी
तेथे स्फुरती मजला गाणी
निळीतुनी पाखरे पांढरी किलबिलतात थव्यांनी
सुखात चरती गुरे वासरे
लवेतुनी लहरती कापरे
हवेतुनी आरोग्य खेळते गार नि आरसपानी
उरी जिथे भूमीची माया
उन्हात घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानी
जिथे अशी समृद्ध धरित्री
घुमति घरे अन् पुत्रकलत्री
रमे श्रमश्री माहेरीच्या स्वाभाविक लावण्यी
सख्यापरते जिथे न बंधन
स्मितात शरदाचे आमंत्रण
सहजोद्गारी गाढ चांदणे, स्पर्शी स्नेह हिमानी
ऋतूऋतूंतुन जिथे सोहळे
तसेच उघड्यावरी मोकळे
आणि अंगणी शृंगाराची निर्मळ अमृतवाणी
माणूस जेथे हवाहवासा
अभंग-ओवीमधे दिलासा
विश्वासावर जीवन सुस्थिर, श्रद्धा नेक इमानी
देव जिथे हृदयांत सदाचा
भार मनाला नसे उद्याचा
सुखे दुजाच्या हिरवळ चित्ती, दुःखे डोळा पाणी

**शब्दार्थ :**

■ लव - अंगावरील मऊ कोवळे केस ■ आरसपानी - स्वच्छ, पारदर्शी ■ कलत्र- पत्नी ■ लावण्य - सौंदर्य ■ नेक - सरळपणा, सद्वर्तन ■ हिमानी - बर्फाप्रमाणे थंड ■ श्रमश्री - परिश्रमरूपी लक्ष्मी

©KTBS Not to be republished

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) कवीला गाणी हे पाहिल्यानंतर स्फुरतात**

(अ) हिरवळ आणिक पाणी (ब) चंद्र आणि तारे
(क) वेली व फुले (ड) मुले आणि मुली

**(आ) हवेतून खेळणारे आरोग्य असे असते.**

(अ) सुंदर (ब) आरसपानी
(क) धडधाकट (ड) दुबळे

**(इ) शरदाचे आमंत्रण कशात असते?**

(अ) स्मितात (ब) रागात
(क) लोभात (ड) मोहात

**(ई) जीवन सुस्थिर यावर झालेले असते.**

(अ) प्रेम (ब) विश्वासद्ब
(क) अश्रद्धा (ड) भक्ती

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) आनंदाचे पाझर कोठे सापडतात?
(आ) शृंगाराची निर्मळ अमृतवाणी कोठे आढळते?
(इ) दिलासा कशामुळे मिळतो?
(ई) मनाला उद्याचा भार केव्हा नसतो?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) गुरे वासरे कोठे व कशी चरतात?
(आ) समृद्ध धरित्रीच्या ठिकाणाचे वर्णन कवीने कसे केले आहे?
(इ) अंगणात शृंगाराची निर्मळ अमृतवाणी केव्हा असते?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) जिथे अशी समृद्ध धरित्री
घुमति घरे अन् पुत्र कलत्री

(आ) माणूस जेथे हवाहवासा
अभंग-ओवीमधे-दिलासा

©KTBS Not to be republished

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) शरद ऋतूचे वर्णन कवीने कसे केले आहे?

(आ) 'देव जिथे हृदयात सदाचा । भार मनाला नसे उद्याचा' या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

**प्र.6 (वा) खालील प्रश्नाचे सात ते आठ ओळीत उत्तर लिहा.**

(अ) या कवितेमध्ये केलेले निसर्गाचे वर्णन तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील ओळीतील अलंकार ओळखून लक्षण लिहा.**

उरी जिथे भूमीची माया ।
उन्हात घाली हिरवी छाया ।

**(आ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

पानोपानी, निर्मळ, अमृतवाणी, सुस्थिर

**(इ) समानार्थी शब्द लिहा.**

पाणी, पाखरू, पुत्र, चित्त, छाया, धरित्री, डोळा

**उपक्रम :**

- बालकवींच्या 'समग्र बालकवी' या काव्यसंग्रहातील 'श्रावणमास' व 'निर्झरास' या कविता वाचा.
- 'वर्षाऋतू' या विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लिहा.
- सूर्योदयाच्या देखाव्याचे निसर्गचित्र काढा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| अंगीकार | काहिली | तत्कालीन |
| निःस्तब्ध | परीक्षण | माहात्म्य |

© KTBS Not to be republished

# १०. सुंदर ते ध्यान

**पु.ल. देशपांडे**

**परिचय :**

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे (1919-2000) हे मराठीतील नामवंत, प्रतिभाशाली, चतुरस्र विनोदी लेखक. ते प्रारंभी बेळगाव आणि त्यानंतर मुंबई येथील महाविद्यालयात प्राध्यापक होते. काही काळ आकाशवाणीवर अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. सिद्धहस्त नाटककार, नट, दिग्दर्शक, संगीतकार म्हणून ते प्रसिद्ध होते. ते उत्तम वक्ते आणि गायकही होते.

'सुंदर मी होणार', 'तुझे आहे तुजपाशी', 'ती फुलराणी' ही नाटके, 'गणगोत', 'व्यक्ती आणि वल्ली', 'गुण गाईन आवडी', या सारखी व्यक्तिचित्रे. 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'जावे त्याच्या देशा', सारखी प्रवासवर्णने, 'बटाट्याची चाळ', 'वाऱ्यावरची वरात', 'असा मी असा मी' यासारखी त्यांची एकपात्री रंगभूमी केवळ अपूर्व. 'व्यक्ती आणि वल्ली' या त्यांच्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. भारत सरकारने त्यांना पद्मश्री या पुरस्काराने गौरविले आहे.



©KTBS Not to be republished

सुंदर ते ध्यान हा अभंग संत तुकारामांनी लिहिला आहे. या अभंगाचे विडंबन पु.ल. देशपांडे यांनी केले आहे. 'सुंदर ते ध्यान' या अभंगाचे विडंबन राष्ट्र सेवा दल प्रकाशन यानी प्रकाशित केलेल्या 'कलापथक गीते' या पुस्तकातून घेतले आहे. विठ्ठलाच्या जागी कष्टाळू शेतकऱ्याचे रूपक करून वर्णन केले आहे. शेतकऱ्याचा कष्टाळूपणा वर्णिला आहे.

**(मूल्य – कष्टाळूपणा)**

सुंदर तें ध्यान जाई शेतावरीं
औत खांद्यावरी । घेऊनीया ।। धृ. ।।
कांसे पीतांबर त्याची खादीची लंगोटी
करण्या नांगरटी। निघतसे ।।
मकरकुंडले त्याला घामाच्याच धारा
थंडीला उबारा । घोंगडीचा ।।
तुळशि-हार नाहीं गळां, कमरेला विळा
माथ्यावर टिळा । चिखलाचा ।।
झोंपडींत भुकेलेली राही रखुमाई
कष्टणारी आई, अन्नावीण ।।
आरत्या म्हणती त्याचीं भुकेलेलीं पोरें
पोटाचे नगारे । वाजवोनी ।।

**शब्दार्थ :**

■ कासे - कमरेला ■ मकर - मगर ■ माथा - कपाळ ■ औत - नांगर ■ मकर कुंडले - मगरीच्या आकाराचा कानातील अलंकार ■ आरती - स्तुती ■ उबारा - ऊब

टीप : विडंबन काव्य : अशा प्रकारच्या काव्यातून खट्याळपणे विनोदाची उधळण केली जाते. मुक्त गीतांवर व्यंगगीत उभे केले जाते. विडंबन म्हणजे वेडावणे, मात्र हे वेडावणे कवीला उद्देशून नसते. एखादी प्रसिद्ध कविता समोर ठेवून, याच धर्तीची कविता कवी लिहितो. मात्र मूळ कवितेतील विषय गूढ किंवा गंभीर असेल तर, विडंबन काव्यातील विषय साधा व विनोदी असतो. दोन्हीं कवितांचा तोंडावळा सारखाच असला तरी त्यांच्या अंतरंगात जमीन अस्माना इतका फरक असतो.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) सुंदर ते ध्यान असे कोणाला उद्देशून म्हटले आहे.**

(अ) शेतकरी (ब) विठ्ठल
(क) औत (ड) विळा

©KTBS Not to be republished

**(आ) शेतकऱ्यांची मकरकुंडले कोणती आहेत?**

(अ) नांगर-विळा (ब) तुळशि-हार

(क) कासे पीतांबर (ड) घामाच्या धारा

**(इ) झोपडीत रखुमाई कशी राहिली आहे?**

(अ) भुकेलेली (ब) माथ्यावर टिळा लावून

(क) कष्टणारी (ड) कमरेवर हात

**(ई) अन्नावीण देखील आई काय करते?**

(अ) कष्ट करते (ब) वाट पाहते

(क) आरती म्हणते (ड) नगारे वाजविते

**(उ) भुकेलेली पोरे आरत्या कशी म्हणत आहेत?**

(अ) घोंगडीचा उबारा घेऊन (ब) माथ्यावर टिळा लावून

(क) पोटाचे नगारे वाजवून (ड) कष्ट करून

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) शेतकऱ्याचे ध्यान कशावरती आहे?

(आ) शेतकऱ्याचा पोषाख कसा आहे?

(इ) शेतकऱ्याला थंडीला उबारा कशाचा मिळतो?

(ई) चिखलाचा टिळा कोणी व कोठे लावला आहे?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भुकेलेली पोरे आरत्या कशी म्हणत आहेत?

(आ) शेतकरी नांगरटी करण्यासाठी कसा निघाला आहे?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''तुळशि-हार नाही गळां, कमरेला विळा
माथ्यावर टिळा, चिखलाचा''

(आ) ''आरत्या म्हणती त्याची भुकेलेलीं पोरें
पोटाचे नगारे, वाजवोनी''

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) नांगरटी करण्यासाठी शेतकरी निघाला असल्याचे वर्णन कसे केले आहे?

(आ) झोपडीत रखुमाई आणि पोरे कशी राहिली आहेत त्याचे वर्णन करा.

©KTBS Not to be republished

**प्र.6 (वा) पुढील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) शेतकऱ्याचे जीवन चरित्र कसे वर्णन केले आहे ते लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) समानार्थी शब्द लिहा.**

औत, उबारा, घोंगडी, माथा, मकर

**(आ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

पोटनगारा, मकरकुंडले, पीतांबर, तुळशिहार

**उपक्रम :**

- तुम्ही पाहिलेल्या शेतकऱ्याचे व्यक्तिचित्र रेखाटा.
- 'चिंचा आणि बोरे' हा दिलीप कुलकर्णी यांचा विडंबन काव्यसंग्रह वाचा.
- शेतकऱ्याच्या कामाचे लक्ष्यपूर्वक निरीक्षण करून त्याची महत्ती लिहा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| पोषाख | ज्वालाग्राही | दुरवस्था |
| प्रतिष्ठित | रिमझिम | विचारविनिमय |

## विठ्ठलाचा अभंग

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटावरी ठेवूनिया ।।
तुळसीहार गळां कासे पीतांबर ।
आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।
मकरकुंडले तळपती श्रवणीं ।
कंठी कौस्तुभमणि विराजित ।।
तुका म्हणे माझें हेचिं सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीने ।।

- संत तुकाराम

Not to be republished ©KTBS


# ११. माहेराची वाट

**इंदिरा संत**

**परिचय :**

इंदिरा नारायण संत या (1914-2000) मराठीतील नामवंत कवयित्री, लहानपणापासून त्यांना काव्याबद्दलचे आकर्षण होते. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुढे वास्तव्य बेळगावात झाले. 'सहवास', 'शेला', 'मेंदी' 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या', 'मृण्मयी', 'गर्भरेशीम, 'चित्कला', 'वंशकुसुम', 'निराकार' इ. त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'श्यामला', 'कदली', 'चैतू' हे त्यांचे कथासंग्रह. 'मृद्गंध' हा आत्मकथनपर ललितगद्यसंग्रह आणि 'मालनगाथा', 'घुंगुरवाळा' हे त्यांचे लोक साहित्य विषयक लेखनही प्रसिद्ध आहे. 'गर्भरेशीम' काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार व जनस्थान पुरस्कार मिळाला आहे. स्त्रीमनातील हळुवारपणा, विरह-व्याकुळता, वियोग दुःख आणि निसर्गसौंदर्य यांचे संवेदनशील चित्रण त्यांच्या कवितेत येते.

प्रस्तुत कविता 'गर्भरेशीम' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. सासुरवाशिणीला माहेरची आठवण येते, तिचे डोळे माहेरच्या वाटेकडे लागतात. तिच्या डोळ्यासमोर माहेरची निसर्गदृश्ये व आठवणी येतात. तेव्हा तिला भास होतो, की आई तिला भेटण्यास येते, तिची फळाफुलांनी ओटी भरते आणि 'तुझे सौभाग्य अखंड राहो!' असा आशीर्वाद देते असे भावपूर्ण वर्णन या कवितेत आले आहे.



©KTBS Not to be republished

**(मूल्य – आपुलकी, मातृप्रेम)**

माहेराची वाट. तिच्यावर अंथरलेली
निळी मलमल अशी नाजूक कीं,
पिवळ्या चिमुकल्या पिसोळीने जिच्यावरून
अलगद चालत जावें............
अशी वाट. तरी माहेर किती जवळ.
डोळे उघडताच वेशीवरला कडुलिंब पावलांवर
मोहर ढाळतो. पापण्यावरून सुगंध फिरवतो.
अशा माहेरी येते म्हणताना, जिच्यासाठीं माहेर
तीच येते. मन भरून भेटते.
आपल्या चंद्रकोरींतील कुंकू माझ्या कपाळीं टेकते.
फळाफुलांनीं ओटी भरते. आशीर्वादाच्या अक्षता
भांगावर टाकते.
डबडबलेले डोळे सावरीत, हसतमुखशीं
नाहीशी होते. मी माहेरी येते म्हणताना ...

**शब्दार्थ :**

■ ढाळणे - खाली टाकणे

टीप :

■ पिसोळी-कोकण आणि घाटमाथ्याच्या जंगलात आढळणारा शाकाहारी प्राणी. त्याचे तोंड खारीसारखे व शरीर मुंगसासारखे असते. तो काटेरी वाटेवरून न जाता सदैव रूळलेल्या मऊ वाटेवरून जातो.

**स्वाध्याय :**

**प्र.1 (ला) खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) माहेराची वाट अशी आहे.**

(अ) नाजूक निळी मलमल (ब) हिरवा गालिचा

(क) वळणाची (ड) घाटमाथ्याची

©KTBS Not to be republished

**(आ) वेशीवरती हे झाड आहे.**

(अ) नारळ (ब) फणस

(क) कडुलिंब (ड) वड

**(इ) माहेरवाशिणीची ओटी याने भरली.**

(अ) खणनारळ (ब) फळेफुले

(क) तांदूळ (ड) गहू

**(ई) पिसोळी सदैव या वाटेवरून जाते**

(अ) काटेरी (ब) रूळलेली

(क) ओबडधोबड (ड) रुंद

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) वाटेवर काय अंथरलेले आहे?

(आ) कडुलिंब काय ढाळतो आहे?

(इ) 'जिच्यासाठी माहेर तीच येते' असे कोणाला म्हटले आहे?

(ई) तिला काय जवळ वाटत आहे?

(उ) आई लेकीला कोणता आशीर्वाद देते?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) तिचे डोळे डबडबून का येतात?

(आ) ती लेकीला मनभरून कशी भेटते?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ''तिच्यावर अंथरलेली निळी मलमल अशी नाजूक कीं,'

(आ) 'मोहर ढाळतो पापण्यावरून सुगंध फिरवतो'

(इ) 'फळाफुलांनी ओटी भरते.'

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) माहेरच्या वाटेचे वर्णन करा.

(आ) आईच्या भेटीचे वर्णन करा.



Not to be republished ©KTBS

**प्र.6 (वा) पुढील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

चंद्रकोर, हसतमुख, फळेफुले, अनंत, भाजीभाकरी, पंचवटी

**(आ) अलंकार ओळखा व लक्षणे लिहा.**

(अ) वेशीवरला कडुलिंब पावलांवर मोहर ढाळतो.

(आ) 'निळी मलमल अशी नाजूक की'

**(इ) समानार्थी शब्द लिहा.**

माता, सुगंध, चिमुकला, फुल, डोळे, वाट

**(ई) विरुद्धार्थी शब्द लिहा.**

जवळ, नाजूक, सुगंध, माहेर, हसत

**उपक्रम :**

- कवी कृ. ब. निकुम्ब यांची 'घाल घाल पिंगा वाऱ्या' ही कविता मिळवून वाचा.
- 'रम्य ते बालपण' यावर दहा ओळी लिहा.
- 'आईसारखे दुसरे दैवत नाही' कल्पनाविस्तार करा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| प्रियदर्शिनी | चिकटलेला | रक्तस्राव |
| श्वासोच्छ्वास | आशीर्वाद | वक्तृत्व |

©KTBS
Not to be republished


# १२. पाखरांनो तुम्ही

**रमेश तेंडुलकर**

**परिचय :**

प्रा. रमेश अच्युत तेंडुलकर हे (1930 - 1999) मराठीचे नामवंत प्राध्यापक, प्रतिभावंत कवी व समीक्षक होत. मराठी विषयात एम. ए. पदवी संपादन करून त्यांनी एम.ए. ला न. चिं. केळकर सुवर्णपदक आणि बी.ए. ला तर्खडकर सुवर्णपदक प्राप्त केले. त्यांनी 'कीर्ती' महाविद्यालय मुंबई येथे मराठी विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहिले होते. त्यांचा 'गीतभान' हा समीक्षालेखांचा संग्रह प्रसिद्ध आहे. त्यांनी मुख्यतः काव्य आणि समीक्षात्मक लेखन केले आहे. 'सत्यकथा', 'आलोचना', 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका', 'युगवाणी', इ. नियतकालिकांतून त्यांनी सातत्याने लेखन केले. 'कविता दशकाची' हे काव्यलेखन केले. नवीन दहा कवींच्या कवितांचे संपादन त्यांनी केले. त्यामध्ये भा.रा. तांबे, पु.शि. रेगे, अनंत काणेकर, बा.भ. बोरकर, ग.दि. माडगूळकर यांच्या काव्यसमीक्षा प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे अनंत काणेकर व इंदिरा संत यांच्या कवितांची चिकित्सक प्रस्तावनेसह संपादने प्रकाशित आहेत.

प्रस्तुत कविता 'सत्यकथा' (जून 1977) या अंकातून प्रसिद्ध झालेली आहे. सध्याच्या पर्यावरण प्रदूषणाने मानवी जीवन व पाखरांची झालेली अवस्था या कवितेत वर्णन केलेली आहे. आजच्या विज्ञानयुगातील युद्ध्यमान जीवनसंघर्ष अनुभवणाऱ्या एका कविमनाचे दर्शन घडविणारी ही कविता आहे.



©KTBS Not to be republished

**(मूल्य – पर्यावरण संवर्धन, भूतदया)**

पाखरांनो, तुम्हांलाही आता याची सवय झाली असेल ....
स्वच्छ, निळ्या आकाशात रोज सकाळी
सायरनचे सूर पसरतात, त्या वेळी
तुम्ही कुठे असता?
हवेत चढत जातात त्या सुरांची उंच, उंच कंपने
तुमच्यासारखीच ... तेव्हा तुम्ही कुठे जाता?
समजतात तुम्हांला हे धोक्याचे इशारे
नि नंतरचे उतरत्या सुरांतले
'ऑल क्लिअर' चे दिलासे....
-'युद्ध्यमान जीवनसंघर्षाची आमची ही रोजची तालीम...
पाखरांनो तुम्ही काय करता?
..आम्ही आमची घड्याळे लावतो,
आणि कामाला जायला
किती वेळ आहे याचा अंदाज घेतो!
पाखरांनो, तुम्ही......

**शब्दार्थ :**

■ सायरन - इशारा देणारे ध्वनीक्षेपक, धोक्याची सूचना देणारा भोंगा ■ ऑल क्लिअर- सर्व ठीक ■ युद्ध्यमान - सतत युध्दाची परिस्थिती ■ तालीम- सराव

**स्वाध्याय :**

प्र.1 (ला) **खालील पर्यायातून योग्य तो पर्याय निवडून लिहा.**

**(अ) रोज सकाळी याचे सूर पसरतात.**

(अ) गाण्याचे (ब) किलबिलाटाचे
(क) सायरनचे (ड) पाखरांचे

**(आ) दिलासे कसले दिले जातात?**

(अ) विश्वासाचे (ब) जीवनाचे
(क) ऑल क्लिअरचे (ड) होल्डचे

©KTBS Not to be republished

**(इ) न जुळणारा शब्द लिहा.**

(अ) खग (ब) अंडज

(क) विहग (ड) नभ

**(ई) घड्याळावर यांचे जीवन अवलंबून आहे.**

(अ) पक्ष्यांचे (ब) माणसांचे

(क) प्राण्यांचे (ड) यापैकी नाही.

**प्र.2 (रा) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

(अ) 'सायरन' म्हणजे काय?

(आ) आकाश कसे आहे?

(इ) हवेत कशाची कंपने आहेत?

(ई) कवीने कोणाला उद्देशून ही कविता लिहिली आहे?

(उ) पाखरांना कशाची सवय झाली असेल?

**प्र.3 (रा) खालील प्रश्नांची दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सायरनच्या आवाजाचा पाखरांवर काय परिणाम होतो?

(आ) कवीची रोजची तालीम कशी आहे?

**प्र.4 (था) संदर्भासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) 'हवेत चढत जातात त्या सुरांची उंच उंच कंपने'

(आ) 'पाखरांनो तुम्हालाही आता याची सवय झाली असेल...'

**प्र.5 (वा) खालील प्रश्नांची पाच ते सहा ओळीत उत्तरे लिहा.**

(अ) कवीने पाखरांना कोणकोणते प्रश्न विचारले आहेत?

(आ) सायरनचे सूर ऐकल्यावर माणसे कोणती प्रतिक्रिया व्यक्त करतात?

**प्र.6 (वा) पुढील प्रश्नाचे आठ ते दहा ओळीत उत्तर लिहा.**

(अ) पाखरांच्या आताच्या जीवनावर कोणकोणत्या कारणांमुळे समस्या निर्माण झाल्या आहेत ते लिहा ?

©KTBS Not to be republished

**भाषाभ्यास :**

**(अ) खालील शब्दांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

इशारा, दिलासा, तालीम.

**(आ) खालील शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

युद्ध्यमान, जीवनसंघर्ष, न्यायान्याय, दररोज, वनभोजन

**(इ) समानार्थी शब्द लिहा.**

पाखरू, जीवन, आकाश, धोका, इशारा, वृक्ष

**(ई) युद्ध्यमान= युद्ध्य + मान. 'मान' जोडून तयार झालेले आणखी चार शब्द सांगा.**

**उपक्रम :**

- विज्ञानयुगात पशुपक्ष्यांच्या समस्यावर उपाययोजना सुचवा.
- 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' हा संत तुकारामांचा अभंग मिळवा व वाचा.
- विज्ञानयुगातील युद्धसामग्री - शस्त्रास्त्रे यांची माहिती व छायाचित्रे यांचा संग्रह करा.
- 'पर्यावरण प्रदूषण' या विषयावर पंधरा ओळी निबंध लिहा.

**शुद्धलेखन :**

हे शब्द असेच लिहा

| | | |
|---|---|---|
| औद्योगिकीकरण | ज्येष्ठ | दीपक |
| सर्जनशीलता | क्रीडा | विद्वत्त्व |

©KTBS Not to be republished

# १३. जग बदल घालुनी घाव!

**अण्णा भाऊ साठे**

**परिचय :**

अण्णा भाऊ साठे : सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे जन्म. प्रसिद्ध कादंबरीकार, कथाकार लोकशाहीर म्हणून महाराष्ट्राच्या, सांस्कृतिक क्षेत्रात व जनचळवळीत आघाडीवर. यांची कित्येक गीते, पोवाडे व तम ाशे आहेत. लोकनाट्य चळवळीचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून ओळखले जातात. यांच्या अनेक कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले आहेत. पहिल्या दलित साहित्य संम्मेलनाचे ते अध्यक्ष होते.

**जन्मः 3 ऑगष्ट 1920** **मृत्यू: 18 जुलै 1969**

**मूल्यः बंधूभाव**

जग बदल घालुनी घाव ।
सांगून गेले मला भीमराव ।।
गुलामगिरीच्या या चिखलात ।
रूतून बसला हा ऐरावत ।
अंग झाडूनी निघ बाहेरी ।
घे बिनीवरती धाव।।
धनवंतानी अखंड पिळले ।
धर्मांधांनी तसेच छळले।
मगराने जणू माणिक गिळीले ।
चोर जाहले साव।।
ठरवून आम्ही हीन कलंकित ।
जन्मोजन्मी करूनी अंकित।
जिणे लादुनी वर अवमानित ।
निर्मून हा भेदभाव ।।
एकजुटीच्या या रथावरती ।
आरूढ होऊन चल बा पुढती।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती ।
करी प्रकट निज नाव।।

**शब्दार्थ व टीपा**

■ घाव - जखम, वार ■ एरावत - इंद्राचा हत्ती ■ बिनीवरती - वर्मावर ■ घनवंतानी - धनिक, श्रीमंत ■ धर्मांधानी - धर्माने अंघ मनुष्य ■ माणिक -रत्न ■ धर्मांध - अंधश्रद्धाळु ■ अंकित - वश ■ अवमानित - अपमानित ■ आरूढ - स्वार ■ निज - स्वता:

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

**प्र. 1 खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) जग बदल घालूनी घाव असे कोण सांगून गेले?
(2) गुलामगिरीच्या चिखलात काय रूतून बसले आहे?
(3) अखंड कोणी पिळले असे कवी म्हणतो?
(4) मगराने काय गिळले होते?
(5) दलितावर कशा प्रकारचे जिणे लादले होते?
(6) एकजुटीने कशावर आरूढ होऊ असे कवी म्हणतो?

**प्र. 2 खालील ओळीतील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(1) ....... घालूनी घाव । सांगून गेले मला भीमराव ।।
(2) अंग झाडूनी निघ बाहेरी । घे .... धाव ।।
(3) धनवंतांनी अखंड पिळले । .... तसेच छळले ।
(4) जिणे लादुनी वर .... । निर्मून हा भेदभाव ।।
(5) एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊन .....।
(6) नव ... निर्मून जगती । करी प्रकट निज नाव ।

**प्र. 3 खालील प्रश्नाची तीन ते चार वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) दलितांना कोणी कोणी त्रास दिला?
(2) दलितानी पुढे जाण्यासाठी काय करावे?
(3) डॉ. भीमराव आंबडेकर दलिताना कोणता सल्ला देतात?

**प्र. 4 खालील प्रश्नांची पाच ते सहा वाक्यात उत्तरे लिहा.**

(1) दलितांचे जगणे कशा प्रकारचे होते?
(2) परंपरेच्या पकडीतून बाहेर पडण्यासाठी डॉ. भीमराव आंबेडकर दलिताना काय सांगतात?
(3) कलंकित जिणे टाकुन दलितानी काय करावे असे कवीने सांगितले आहे?

**प्र. 5 खालील आळींचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**

(1) धनवंतानी अखंड पिळले । धर्मांधांनी तसेच छळले।
मगराने जणू माणिक गिळले । चोर जाहले साव ।।
(2) एकजुटीच्या या रथावरती । आरूढ होऊन चल बा पुढती ।।
नव महाराष्ट्रा निर्मून जगती । करी प्रकट निज नाव।।

**प्र. 6 खालील प्रश्नाचे उत्तर सात आठ वाक्यात लिहा**

(1) या कवितेचा सारांश लिहा

**भाषाभ्यास**

**(अ) विरुद्धार्थी शब्द लिहा**

गुलामगिरी, भेदभाव, प्रकट, खंड, कलंकित

**उपक्रम**

- आण्णा भाऊ साठे यांच्या लावण्या व पोवाडे यांचे पुस्तक वाचा.

Not to be republished ©KTBS

# १४. व्याकरण विभाग
## अलंकार

विद्यार्थी मित्रानो, आठवीच्या वर्गात अलंकारांचा अभ्यास केला आहे. नववीच्या वर्गात श्लेष, व्यतिरेक व अतिशयोक्ती या तीन अलंकारांचा अभ्यास करावयाचा आहे.

श्लेष अलंकार : जेव्हा गद्यात किंवा पद्यात एकाच शब्दातून दोन किंवा अधिक अर्थ व्यक्त होतात तेव्हा शब्द चमत्कृती साधली जाते तेव्हा 'श्लेष' अलंकार होतो. हा शब्दालंकार व अर्थालंकारही आहे.

उदा : 1. श्रीकृष्ण नवरा मी नवरी
नवरी = नववधू.

2. शिशुपाल नवरा मी न-वरी
न वरी = वरणार नाही.

उदा : हे मेघा, तू सर्वांना जीवन देतोस.
मित्राच्या उदयाने कोणास आनंद होत नाही.

व्यतिरेक : जेव्हा उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे वर्णन केलेले असते. तेव्हा 'व्यतिरेक' अलंकार होतो.

उदा : मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रास भेदू ऐसे ।।

वरील उदाहरणात 'विष्णुदास' हे उपमेय व 'मेण' हे उपमान आहे. मेणाच्या मऊपणापेक्षा विष्णुदासांचा मऊपणा अधिक आहे. म्हणजेच उपमानापेक्षा उपमेय श्रेष्ठ आहे असे सांगितले आहे. कठीण अशा वज्राला भेदण्याचे सामर्थ्य (काठीण्य) विष्णुदासांजवळ आहे.

उदा : तू माऊलीहून मयाळ
चंद्राहूनी शितळ ।
पाणियाहून पातळ
कल्लोळ प्रेमाचा ।

अतिशयोक्ती : जेव्हा कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगितलेली असते व त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते त्यावेळी 'अतिशयोक्ती' अलंकार होतो.

उदा : जो अंबरी उफाळता खूर लागला हे
तो चंद्रमा निज तनूवरि डागलाहे ।

चंद्रावरचा डाग म्हणजे नलराजाच्या घोड्याच्या उफाळण्यामुळे त्याच्या खुराचा लागलेला डाग. हे जरी असंभवनीय असले तरी ते घडल्याचे वर्णन केल्यामुळे अतिशयोक्ती झाली.

©KTBS Not to be republished

# वृत्ते

इयत्ता आठवीच्या वर्गात आपण काही अक्षरगणवृत्ते व मात्रावृत्ते यांची ओळख करून घेतली आहे. नववीच्या अभ्यासक्रमात 'मालिनी', 'शार्दूल विक्रीडित' ही अक्षरगणवृत्ते आणि आर्या व दिंडी ही मात्रावृत्ते अभ्यासायची आहेत.

## अक्षरगणवृत्ते

**(1) मालिनी :**

अनुदिन अनुतापे तापलो रामराया
परमदिनदयाळा नीरसी मोहमाया
परम दिनद याळानी रसीमो हमाया

| UUU | UUU | – – – | U – – | U – – |
|---|---|---|---|---|
| न | न | म | य | य |

**लक्षणे**

(1) अक्षर संख्या - पंधरा
(2) गण - न न म य य
(3) यती - आठव्या अक्षरावर

**खालील उदाहरणे सोडवा.**

(अ) रघुपतिसह शय्या भूमि हे मायवाटे
(आ) मृदु सुपथि-हुनी ही मानिते पायवाटे.
(इ) कनक मृग म्हणे, तो पाठिसी राम लागे.
(ई) अवचट मिळतां तें श्वान सं-तोष पावे.

**(2) शार्दूलविक्रीडित :**

विद्या बंधु असे विदेश गमनीं विद्या महादेवता ।
विद्या पूज्य नृपास हा नर पशू ती वेगळा तत्वतां।।
विद्यापू ज्यनृपा सहान रपशू तीवेग ळातत्व त

| – – – | UU – | U–U | UU– | – – U | – –U | – |
|---|---|---|---|---|---|---|
| म | स | ज | स | त | त | ग |

©KTBS Not to be republished

**लक्षणे**

(1) अक्षरसंख्या - एकोणीस

(2) गण - म स ज स त त ग

(3) यती - बाराव्या अक्षरावर

**खालील उदाहरणे सोडवा.**

(अ) आम्ही कोण म्हणूनि काय पुसता? आम्ही असू लाडके

(आ) देवाचे, दिधले असे जग तयें अम्हास खेळावया.

(इ) चंद्राला दिवसा प्रकाश नसणें ये कामिनीला जरा

(ई) आम्हाला वगळा-गतप्रभ झणी होतील साप्ताहिके

**(3) भुजंगप्रयात :**

प्रजा हाच की वत्स भू-धेनुकेचा ।।

| | | | |
|---|---|---|---|
| प्रजाहा | चकीव | त्सभूधे | नुकेचा |
| U– – | U– – | U – – | U – – |
| य | य | य | य |

**लक्षणे**

(1) अक्षरसंख्या - बारा

(2) गण - य य य य

(3) यती - सहाव्या अक्षरावर

**खालील उदाहरणे सोडवा.**

(अ) नृपा तू करी फार सांभाळ त्याचा

(आ) कुणी दुष्ट अंगास लावील हात.

♦❀♦❀♦❀♦❀♦❀♦

©KTBS Not to be republished

# मात्रावृत्ते

**(1) दिंडी :**

| उभा | दारी | कर | लावुनी | कपाळा |
|---|---|---|---|---|
| U – | – – | U U | – U – | U – – |
| 1 2 | 2 2 | 1 1 | 2 1 2 | 1 2 2 |
| | 9 मात्रा | | | 10 मात्रा |

**लक्षणे**

मात्रा संख्या - प्रत्येक ओळीत 19 मात्रा असतात.

प्रत्येक ओळीचे दोन भाग. पहिल्या पूर्वाधात 9 व उत्तरार्धात 10 मात्रा असतात.

**खालील उदाहरणे सोडवा**

(अ) दीन शेतकरी दाबुनी उमाळा (आ) 'आणि ही रे !' पुसतसे सावकार

(इ) उडे हास्याचा चहुकडे विखार । (ई) करी भक्ती चित्तात नृत्यलीला ।

**(2) आर्या**

| गंध | नगा | देवांच्या | ज्याचा | करि | त्या | तशास | बंधन | गा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| – U | U – | – – – | – – | U U | – | U – U | – U U | – |
| 2 1 | 1 2 | 2 2 2 | 2 2 | 1 1 | 2 | 1 2 1 | 2 1 1 | 2 |
| | 12 मात्रा | | | | | 18 लक्षणे | | |

(1) मात्रा संख्या - प्रत्येक ओळीत 30 मात्रा असतात

आर्याचे दोन मोठे चरण असतात. पूर्वार्ध 12 मात्रांचा व उत्तरार्ध 18 मात्रांचा असतो. पण साम न्यतः आर्येचे चार चरण मानतात. त्यातील पहिल्या व तिसऱ्या चरणांत प्रत्येकी 12 मात्रा असून, दुसऱ्या व चौथ्या चरणांत प्रत्येकी 18 मात्रा असतात.

**खालील उदाहरणे सोडवा.**

(1) ऐसे म्हणुनि यशोदा उखळी दामें स्वभाग्य बांधी ते ।
बा ! त्या हितैषिणीच्या बंधन अवघड गमेल कां धीतें ? ।।

(2) सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची
ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयूरपंताची

© KTBS Not to be republished

# समास

समास हा शब्द 'सम् + अस्' या संस्कृत धातूपासून तयार झाला आहे. याचा अर्थ 'एकत्र करणे' असा होतो. समासात जोडशब्द असतो. म्हणून त्या जोडशब्दातील परस्पर संबंध दाखविणारे शब्द किंवा विभक्तीचे प्रत्यय गाळून त्या शब्दांचे एकत्रीकरण केले जाते. शब्दांच्या अशा प्रकाराच्या एकत्रीकरणास 'समास' असे म्हणतात.

सामासिक शब्द - शब्दांच्या अशा एकत्रीकरणाने जो जोडशब्द तयार होतो. त्याला सामासिक शब्द म्हणतात.

विग्रह - समासातील गाळलेले प्रत्यय किंवा शब्द घालून त्याच्या अर्थाची फोड करण्याच्या पद्धतीला विग्रह असे म्हणतात.

समासाचे प्रमुख चार प्रकार आहेत.

(1) अव्ययीभाव समास | (2) तत्पुरुष समास
(3) द्वंद्व समास | (4) बहुव्रीही समास

(1) अव्ययीभाव समास - जेव्हा समासातील पहिले पद महत्त्वाचे असते व ते अव्यय असते. या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणासारखा केला जातो. त्याला अव्ययीभाव समास असे म्हणतात.

उदा : आजन्म - जन्मापासून, यथाशक्ती- शक्तीप्रमाणे, आमरण - मरेपर्यंत, प्रतिदिन - प्रत्येक दिवशी, गावोगाव - प्रत्येक गावी.

(2) तत्पुरुष समास - ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थांच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो त्याला तत्पुरुष समास असे म्हणतात.

तत्पुरुष समासाचे प्रकार

(1) विभक्ती तत्पुरुष समास - ज्या तत्पुरुष समासात विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून ती दोन्ही पदे जोडली जातात. त्याला विभक्ती तत्पुरुष समास असे म्हणतात.

या समासाचा विग्रह करताना एका पदाचा दुसऱ्या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्तीप्रत्ययाने दाखविला जातो. त्याच विभक्तीचे नाव त्या समासाला दिले जाते.

©KTBS Not to be republished

उदा : (अ) द्वितीया तत्पुरुष : कृष्णाश्रित - कृष्णाला आश्रित - येथे विग्रहात 'ला' हा द्वितीयेचा प्रत्यय आला आहे. देशगत - देशाला गत. पुढील उदाहरणे सोडवा : राजाश्रित, दुःखप्राप्त.

(ब) तृतीया तत्पुरुष - तोंडपाठ - तोंडाने पाठ - येथे 'ने' हा तृतीयेचा प्रत्यय आलेला आहे.

गुणहीन - गुणाने हीन. ईश्वरनिर्मित, भक्तीवश.

(क) चतुर्थी तत्पुरुष - क्रीडांगण - क्रीडेसाठी अंगण. या उदाहरणात 'साठी' हे शब्दयोगी अव्यय चतुर्थीचा अर्थ सांगणारे आले आहे. गायरान-गायीसाठी रान. पुढील उदाहरणे सोडवा : पोळपाट, वाटखर्च

(ड) पंचमी तत्पुरुष - ऋणमुक्त- ऋणातून मुक्त. या शब्दात 'ऊन' हा पंचमीचा प्रत्यय आलेला आहे. सेवानिवृत्त- सेवेतून निवृत्त. पुढील उदाहरणे सोडवा : जातीभ्रष्ट, चोरभय.

(इ) षष्ठी तत्पुरुष समास - राजपुत्र - राजाचा पुत्र. या विग्रहात 'चा' हा षष्ठीचा प्रत्यय आलेला आहे. देवपूजा - देवाची पूजा. पुढील उदाहरणे सोडवा : लक्ष्मीकांत, आंबराई.

(ई) सप्तमी तत्पुरुष समास - घरजावई - घरातील जावई या विग्रहात 'ई' सप्तमीचा प्रत्यय आलेला आहे. वनभोजन - वनातील भोजन. पुढील उदाहरणे सोडवा : कूपमंडूक, कलाकुशल.

(2) उपपद तत्पुरुष समास : ज्या तत्पुरुष समासामध्ये दुसरे पद धातुसाधित किंवा कृदन्त असते. त्या समासाला 'उपपद' तत्पुरुष समास' असे म्हणतात. उदा : पंकज - पंकात जन्मणारे ते, ग्रंथकार - ग्रंथ लिहितो तो. पुढील उदाहरणे सोडवा : जलद, द्विज.

(3) नञ् तत्पुरुष समास - ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद नकारार्थी असते. त्यास 'नञ् तत्पुरुष समास' असे म्हणतात.

या समासात 'अ, अन्, न, ना, नि, बे, गैर' अशी अभाव किंवा निषेध दर्शविणारी पहिली पदे येतात. उदा : अयोग्य-योग्य नव्हे ते, अनादर - आदर नसलेला. पुढील उदाहरणे सोडवा : नापसंत, नावड.

(4) कर्मधारय समास - ज्या तत्पुरुष समासातील पदे एकाच विभक्तीत म्हणजेच प्रथमा विभक्तीत असतात. तेव्हा त्याला 'कर्मधारय समास' असे म्हणतात.

©KTBS Not to be republished

या समासात पहिले पद विशेषण व दुसरे पद विशेष्य म्हणजे नाम असते. दोन्ही पदातील संबंध विशेषण-विशेष्य किंवा उपमान-उपमेय असे असते. उदा : रक्तचंदन - रक्तसारखे चंदन, मुखकमल - मुख हेच कमल, भाषांतर - अन्य भाषा, पांढरा शुभ्र - अतिशय पांढरा. पुढील उदाहरणे सोडवा : वेषांतर, नीलकमल, हिरवागार, पुरुषोत्तम.

(5) द्विगू समास - ज्या समासातील पहिले पद संख्यावाचक असते. व त्या सामासिक शब्दावरून समुच्चयाचा अर्थ दर्शविला जातो त्याला 'द्विगु समास' म्हणतात. उदा : पंचवटी - पाच वटांचा समूह, नवरात्र - नऊ रात्रींचा समूह. पुढील उदाहरणे सोडवा : त्रिभुवन, सप्ताह.

(6) मध्यमपदलोपी समास - जेव्हा सामासिक शब्दातील पहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी मधली काही पदे लोप करावी लागतात. म्हणून या समासाला 'मध्यमपदलोपी समास' असे म्हणतात. या सामासिक शब्दांचा विग्रह करताना 'युक्त, द्वारा, पुरता, असलेला' ही गाळलेली पदे घालावी लागतात. उदा. डाळवांगे - वांगेयुक्त डाळ, पुरणपोळी - पुरण घालून तयार केलेली पोळी, चुलत सासरा -नवऱ्याचा चुलता या नात्याने सासरा. पुढील उदाहरणे सोडवा : नातसून, कांदेपोहे.

(3) द्वंद्व समास - ज्या समासातील दोन्हीपदे अर्थदृष्ट्या प्रधान म्हणजेच समान दर्जाची असतात. त्याला 'द्वंद्व समास' म्हणतात.

याचे तीन प्रकार आहेत :

(अ) इतरेतर द्वंद्व समास
(ब) वैकल्पिक द्वंद्व समास
(क) समाहार द्वंद्व समास

(अ) इतरेतर द्वंद्व समास -ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि', 'व' अशा समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करावा लागतो त्याला इतरेतर द्वंद्व समास म्हणतात. उदा. आईवडील - आई आणि वडील, हरिहर - हरि आणि हर.

(ब) वैकल्पिक द्वंद्व समास - ज्या समासाचा विग्रह करताना 'किंवा', 'अथवा', 'वा' अशा विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांचा उपयोग करावा लागतो त्याला वैकल्पिक द्वंद्व समास असे म्हणतात. उदा. खरेखोटे - खरे किंवा खोटे, तीनचार - तीन किंवा चार. पुढील उदाहरणे सोडवा: पासनापास, धर्माधर्म.

Not to be republished ©KTBS

(क) समाहार द्वंद्व समास - ज्या समासातील पदांचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश केलेला असतो. त्याला समाहार द्वंद्व समास असे म्हणतात. उदा. मीठभाकर - मीठ, भाकरी, चटणी इतर साधे खाद्यपदार्थ वगैरे वगैरे, चहापाणी - चहा, पाणी व फराळाचे जिन्नस वगैरे वगैरे. पुढील उदाहरणे सोडवा : भाजीपाला, पालापाचोळा.

(4) बहुव्रीही समास - ज्या समासामध्ये त्यातील दोन्ही पदांना प्राधान्य नसून त्या दोन्हीवरून सूचित होणाऱ्या तिसऱ्या पदाचा बोध होतो व त्याला प्राधान्य असते. त्याला बहुव्रीही समास असे म्हणतात.

या समासाचे तीन प्रकार आहेत.

(अ) विभक्ती बहुव्रीही समास
(ब) नञ् बहुव्रीही समास
(क) सह बहुव्रीही समास

(अ) विभक्ती बहुव्रीही समास - बहुव्रीही समासाचा विग्रह करताना शेवटी एक संबंधी सर्वनाम येते. हे संबंधी सर्वनाम ज्या विभक्तीत असते तिचेच नाव या समासाला देतात. उदा. : प्राप्तधन - प्राप्त आहे धन ज्याला असा तो (चतुर्थी), जितेंद्रिय - जित (जिंकली)आहेत इंद्रिये ज्याने असा तो (तृतीया), दशमुख - दश आहेत मुखे ज्याला असा तो, चक्रपाणि - चक्र आहे पाणिमध्ये ज्याच्या असा तो, लंबोदर - लंब आहे उदर ज्याचे असा तो.

(ब) नञ् बहुव्रीही समास - ज्या बहुव्रीही समासामध्ये पहिले पद 'अ, अन्, न, नि' असे नकारदर्शक असते. त्याला नञ् बहुव्रीही समास असे म्हणतात. उदा : अनंत - अंत नाही ज्याला असा तो, नीरस - नाही रस ज्यामध्ये असे ते. पुढील उदाहरणे सोडवा : अव्यय, अनादी.

(क) सह बहुव्रीही समास - ज्या बहुव्रीही समासात पहिले पद 'सह' किंवा 'स' असे येते. त्याला सहबहुव्रीही समास असे म्हणतात. उदा : सादर- आदराने सहित असा जो, सहकुटुंब - कुटुंबाने सहित असा जो. पुढील उदाहरणे सोडवा : सनाथ, सफल.

©KTBS Not to be republished

# प्रयोग

वाक्यात कर्ता, कर्म व क्रियापद हे महत्त्वाचे घटक. वाक्यात कर्ता, कर्म व क्रियापद यांचा परस्पर संबंध असतो. म्हणून कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी संबंध दर्शविणारी अशी जी रचना असते तिला व्याकरणात 'प्रयोग' असे म्हणतात.

**प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत.**

(1) कर्तरी प्रयोग

(2) कर्मणी प्रयोग

(3) भावे प्रयोग

(1) कर्तरी प्रयोग : जेव्हा वाक्यात कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे, क्रियापदाचे रूप असते किंवा बदलते तेव्हा त्यास कर्तरी प्रयोग असे म्हणतात.

**कर्तरी प्रयोगाची वैशिष्ट्ये –**

(अ) कर्ता प्रथमा विभक्तीत असतो.

(ब) कर्म प्रथमान्त, किंवा द्वितीयान्त असते.

(क) क्रियापद कर्त्याच्या लिंगवचन पुरुषप्रमाणे असते.

उदा : (1) सीता गाणे गाते

(2) तो शाळेला जातो.

**कर्तरी प्रयोगाचे दोन प्रकार आहेत.**

(अ) सकर्मक कर्तरी

(ब) अकर्मक कर्तरी

(अ) सकर्मक कर्तरी प्रयोग - ज्या कर्तरी प्रयोगात कर्म असते म्हणजेच सकर्मक क्रियापद असते, त्याला 'सकर्मक कर्तरी' प्रयोग म्हणतात.

उदा : (1) पोपट पेरू खातो.

(2) सीता पेरू खाते.

(3) तो बैलास बांधतो.

(4) आम्ही गिरसप्पा धबधबा पाहतो.

**(ब) अकर्मक कर्तरी प्रयोग – ज्या कर्तरी प्रयोगात कर्म नसते व अकर्मक क्रियापद असते. त्याला अकर्मक कर्तरी प्रयोग म्हणतात.**

उदा : (1) शेवटी ती वेल वाळून गेली.

(2) तो शाळेला जातो.

(3) प्रेक्षक अस्वस्थ होते.

(4) झाड खाली पडले.

Not to be republished ©KTBS

**(2) कर्मणी प्रयोग : जेव्हा वाक्यात कर्माच्या लिंगवचनपुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप असते किंवा बदलते. तेव्हा त्यास कर्मणी प्रयोग असे म्हणतात.**

कर्मणी प्रयोगाची वैशिष्ट्ये -

(अ) कर्ता तृतीया विभक्तीत असतो.

(ब) कर्म प्रथमा विभक्तीत असते.

(क) क्रियापद कर्माच्या लिंगवचन पुरुषाप्रमाणे असते.

(ड) विशेषकरून क्रियापद भूतकाळी असते.

उदा : (1) आजीने गोष्ट सांगितली.

(2) हरणाने कान टवकारले.

(3) आम्ही धबधबा पाहिला.

(4) पोलिसांनी चोर पकडला.

**(3) भावे प्रयोग : जेव्हा वाक्यात कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंगवचनपुरुषाप्रमाणे क्रियापद बदलत नाही. ते नेहमी तृतीय पुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी व स्वतंत्र असते अशा प्रकारच्या वाक्यरचनेस भावेप्रयोग असे म्हणतात.**

भावे प्रयोगाची वैशिष्ट्ये -

(अ) कर्ता तृतीयान्त असतो किंवा चतुर्थी विभक्तीतही असतो.

(ब) कर्म असल्यास कर्माची 'स' प्रत्ययी द्वितीया विभक्ती असते.

(क) अकर्मक भावे प्रयोगात क्रियापद विध्यर्थीच असते.

(ड) क्रियापद तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी व स्वतंत्र असते.

(ई) शक्यार्थक क्रियापदांचा नेहमी भावे प्रयोग होतो.

भावे प्रयोगाचे दोन प्रकार आहेत.

(अ) सकर्मक भावे प्रयोग

(ब) अकर्मक भावे प्रयोग

(अ) सकर्मक भावे प्रयोग : ज्या भावे प्रयोगात कर्म असते. तो सकर्मक भावे प्रयोग होय.

उदा : (1) रामाने रावणास मारले.

(2) त्याने बैलास बांधले.

(3) पोलिसांनी चोरास पकडले.

(4) मांजराने उंदरास पकडले.

**(ब) अकर्मक भावे प्रयोग : ज्या भावे प्रयोगात कर्म नसते. तो अकर्मक भावे प्रयोग होय.**

उदा : (1) त्याने आता घरी जावे.

(2) मुलींनी आसनावर बसावे.

(3) त्याला काम करवते.

©KTBS Not to be republished

# म्हणी आणि त्यांचे अर्थ

| म्हणी | अर्थ |
| --- | --- |
| अचाट खाणे, मसणात जाणे. | खाणे पिणे ह्याचा अतिरेक मृत्यूस निमंत्रण देतो. |
| आधी बुद्धी जाते मग लक्ष्मी जाते. | आधी आचरण बिघडते, मग अवदसा येते. |
| एका हाताने टाळी वाजत नाही. | भांडण एका पक्षाकडूनच होते असे नाही, दुसऱ्या पक्षाचाही दोष असतो. |
| ऐकावे जनाचे, करावे मनाचे | लोकांचे मत घ्यावे आणि मग आपणास प्रशस्त वाटेल, ते करावे. |
| कर नाही, त्याला डर नाही. | ज्याच्या हातून पाप घडलेले नाही, त्याला भीती बाळगण्याचे कारण नाही. |
| काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही. | खऱ्या अभेद्य गोष्टी क्षुद्र शस्त्राने भंगपावत नाहीत. |
| कुसंतानापेक्षा नि:संतान बरे. | वाईट पुत्र असण्यापेक्षा पुत्र मुळीच नसलेला बरे. |
| कोल्हा काकडीला राजी. | फुकटात मिळालेली वस्तू प्रिय. |
| गरजवंताला अक्कल नसते. | गरजू माणसाला निवडीचा अधिकार नसतो. |
| गाढवाला गुळाची चव काय माहीत? | चांगल्या वस्तुचे गुण अपात्र माणसाला कळत नाहित. |
| घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात. | प्रतिकूल परिस्थितीत लहान मोठे सर्वच उलट वागू लागतात. |
| चोरांची पावले चोरांस ठाऊक. | समान वृत्तीच्या माणसांना एकमेकांचे गुणदोष माहीत असतात. |
| जित्याची खोड मेल्यावाचून जात नाही. | काहीही झाले तरी माणसांचा वृत्ती पालटत नाहीत |
| झाकली मूठ सव्वा लाखाची | आपल्या उणिवा न दाखविणे. |
| टिटवी देखील समुद्र आटविते. | क्षुद्र माणूसही प्रसंग पडल्यास मोठे कृत्य करू शकतो. |
| एक ना धड भाराभर चिंध्या. | एका वेळी अनेक गोष्टी केल्यास एकही नीट होत नाही. |
| खाण तशी माती. | आई वडिलाप्रमाणेच मुले असतात. |
| गर्जेल तो पडेल काय! | जो तोंडाने नुसती बडबड करतो, त्याच्या हातून काही होईलच याची खात्री नसते. |
| पालथ्या घड्यावर पाणी. | केलेले प्रयत्न वाया जाणे. |

©KTBS Not to be republished

# वाक्प्रचार व अर्थ

| | वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|---|
| 1. | अंगावर शेकणे | नुकसान होणे |
| 2. | ऊर फोडणे | फार श्रम करणे |
| 3. | ओटीत घालणे | हवाली करणे |
| 4. | कंठ फुटणे | वाचा फुटणे |
| 5. | काळजाला घरे पडणे | हृदयाला दुःख होणे |
| 6. | डोक्यात राख घालणे | संतापणे, राग येणे |
| 7. | डोळे उघडणे | खऱ्या गोष्टीची जाणीव होणे. |
| 8. | तोंडसुख घेणे | यथेच्छ शिवीगाळ करणे |
| 9. | नाकाने कांदे सोलणे | बढाया मारणे |
| 10. | पाऊल काढणे | माघार घेणे |
| 11. | पोटात कावळे ओरडणे | भूक लागणे |
| 12. | मन तुटणे | हिरमोड होणे |
| 13. | हात देणे | मदत करणे |
| 14. | हात, पाय हालविणे | प्रयत्न करणे |
| 15. | वरवंटा फिरविणे | विध्वंस करणे |
| 16. | शरण जाणे | हार पत्करणे, माघार घेणे |
| 17. | साखर पेरणे | गोड बोलून मन वळविणे |
| 18. | हातखंडा असणे | तरबेज असणे |
| 19. | हळद लावणे | मान मान्यतेस चढणे |
| 20. | मनात मांडे खाणे | मनोराज्य करणे |
| 21. | ब्रहमांड आठवणे | प्रचंड हादरा बसणे |

©KTBS Not to be republished

# निबंध

निबंध हा शब्द संस्कृत 'नि + बंध' या धातुपासून तयार झाला आहे. या शब्दाचा अर्थ बांधणे, गुंफणे जुळविणे असा होतो.

निबंध लेखनासाठी एखादा विषय दिल्यानंतर त्या संदर्भात अनेक विचार येतात. त्यांची आकर्षकरित्या मांडणी आपण करतो. अशी सुसंगतपणे केलेली मांडणी म्हणजे निबंध होय.

निबंध लेखनातून विद्यार्थ्यांची वाचनक्षमता व लेखनक्षमता विकसित करता येते. निबंधाची पूर्वतयारी विद्यार्थ्यांनी करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी सतत शोधक दृष्टिकोनातून निरीक्षण करणे आवश्यक आहे. नवनवीन माहितीचा संग्रह करणे, दैनंदिन वर्तमानपत्रांतील बातम्या, तसेच सामाजिक, राजकीय व शैक्षणिक घडामोडींचे वाचन करणे, टाचण करणे, भरपूर वाचन करणे, थोर पुरुषांची चरित्रे वाचणे अशा सवयीतून विद्यार्थ्यांना स्वतःचे मत तयार करण्याची क्षमता हळूहळू विकसित होत जाते. अशा विचाराचे संकलन करून सूत्रबध्द मांडणी आणि स्वतंत्र मत प्रतिपादन यामुळे निबंधाला महत्त्व प्राप्त होते. निबंधाचे प्रकार अनेक आहेत.

आपल्या नववीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे पाच प्रकारच्या निबंधाचा समावेश होतो.

निबंधाचे प्रकार (1) वर्णनात्मक निबंध
(2) चरित्रात्मक निबंध
(3) कल्पनाविलासात्मक निबंध
(4) आत्मकथनात्मक निबंध
(5) वैचारिक निबंध

**निबंध लेखनासाठी महत्त्वाचे मुद्दे :**

1. मी पाहिलेला एक रम्य देखावा : प्रभातकाळच्या देखाव्याचे वर्णन- सूर्योदयाच्या वेळचे वर्णन-प्रातः काळी होणारी सडारांगोळी-ऐकू येणाऱ्या भूपाळ्या, भक्तीगीते यांचे वर्णन - आनंदी व प्रसन्न वातावरण - सूर्योदयामुळे होणारे सृष्टीतील बदल - पशु-पक्षी, झाडे-वेली, फुलपांखरे यांच्यातील बदल - झाडे डोलतात - दवबिंदू चमकतात, पाखरे गातात - शेतकरी शेताला जातात - लोक शुद्ध हवेत फिरावयास जातात - व्यायाम करतात - सूर्योदयाची प्रसन्नवेळ माणसाला आरोग्यदायक, आनंददायक, स्फूर्तिदायक असते.

2. आदर्श समाज सुधारक : महात्मा फुले एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आद्य कर्ते सुधारक महात्मा जोतीबा फुले हे होत - आदर्श समाजसुधारकाचा एक मानदंड त्यांनी निर्माण केला - त्यांचा

©KTBS Not to be republished

जन्म - त्यांचे शिक्षण - त्यांचे कार्य - तळागाळातील लोकांच्या उत्कर्षासाठी खूप प्रयत्न केले - सत्यशोधक समाजाची स्थापना - उपेक्षितांकडे लक्ष वेधले - लेखन जनजागृती - मुलींसाठी शाळा स्थापन केल्या - जनतेने 'महात्मा' ही उपाधी दिली - शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक बदल केले - अन्यायमार्ग, परंपरेविषयी सातत्याने लेखन.

3. वर्तमानपत्रे बंद झाली तर.... : वर्तमानपत्रांचे महत्त्व - त्याची आवश्यकता - वर्तमानपत्रे बंद झाली तर गोंधळ माजेल - संपादक, लेखक, बातमीदार, कामगार, विक्रेते यांच्यावर होणारा परिणाम - व्यावसायिक लोकांचे हाल होणार - जाहिराती येणार नाहीत म्हणून मालाचा खप कमी होईल - लोकांची करमणूक बंद होईल - चित्रपट, नाटक, मालाच्या भावांचे चढउतार कळणार नाहीत - वर्तमानपत्र करमणुकीचे, लोकशिक्षणाचे माध्यम - देशातील, जगातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, साहित्यिक, राजकीय, शैक्षणिक, चालू घडामोडी समजणार नाहीत - समाजात गोंधळ माजेल.

4. पुस्तकाचे आत्मवृत्त : पुस्तकाची रचना - नवेपणाचे कौतुक - वाचनालय, शाळा, शिक्षक, विद्यार्थी व लोकांकडून हाताळण्याची विविध पद्धत - जीर्णावस्था - वाचकांचे दुर्लक्ष - अडगळीच्या जागेत रवानगी - पुस्तकाच्या नशिबाला आलेली दुरवस्था, निराशा व खंत - वाचनाकडे कानाडोळा - 'वाचाल तर वाचाल' - मी मात्र शापीत धूळ खात जगतो - ना आई ना बाप.

5. साक्षरतेचे महत्त्व : साक्षरता अर्थ व्याप्ती - निरक्षरतेमुळे होणारे नुकसान - साक्षरतेमुळे कुटुंब सुशिक्षित बनेल - प्रत्येक गोष्टीत लक्ष घालून जास्त फायदा मिळवता येतो. उदा :शेती, उद्योग, व्यवसाय, व्यापार, राजकारण, आजच्या काळात आपला विकास आपणच करायचा तर जो 'शिकेल तोच टिकेल हेच खरे! साक्षर जनता भूषण भारता!

© KTBS Not to be republished

# पत्रलेखन

पत्र म्हणजे एका अर्थाने लेखी दिलेला निरोपच. आपण आपला निरोप एका कागदावर लिहितो, तो त्याला कळवितो, येथेच पत्रलेखनाचा जन्म होतो. भाषेला लिखित स्वरूप आल्यापासून पत्रलेखन केले जात आहे. साहजिकच त्याचे एक शास्त्र बनले आहे. पत्ता, तारीख, मायना, मजकूर, समारोप, शेवट व स्वाक्षरी असे तंत्र ठरले आहे. खासगी पत्रात जेव्हा पत्रलेखक आपल्या भावभावना, विचार खुल्या मनाने, तळमळीने, घरगुती मनमोकळ्या अलंकारिक भाषेत व्यक्त करतो. तेव्हा ते पत्र कलात्मक बनते. अशावेळी पत्रलेखन ही कला ठरते.

## पत्राचे प्रमुख विभाग :

**(अ) पत्र लिहिणाऱ्याचा पत्ता व दिनांक**

पत्र लिहिताना पत्राच्या वरच्या उजव्या कोपऱ्यात आपले नाव, संपूर्ण पत्ता, पिनकोड, दूरध्वनी क्रमांक व दिनांक लिहावा.

उदा : श्री अ. ब. क.
11 'अक्षर सहवास' सुखनिवास कॉलनी
वांद्रा, मुंबई, पिन-425004
दूरध्वनी - (0223)2443607
दिनांक - 16-04-2012

**(ब) मायना**

पत्राच्या सुरूवातीला अभिवादनाचा जो मजकूर लिहिला जातो त्याला 'मायना' असे म्हणतात. यामध्ये समाजातील व कौटुंबिक व्यक्तिविषयी मायना कसा लिहावा यासंबंधी पुढील कोष्टक दिलेले आहे.

| अ.क्र. | कोणास | सुरूवात | शेवट |
|---|---|---|---|
| 1. | आई / वडील | तीर्थरूप .. यांना शि.सा.न. वि.वि | तुझा/ तुमचा |
| 2. | वडील मंडळीस | तीर्थस्वरूप .. यांना सा. न. वि.वि | आपला/ आपली |
| 3. | शिक्षकांस | गुरुवर्य.. यांना सादर प्रणाम वि.वि. | तुमचा आज्ञाधारक |
| 4. | धाकटा भाऊ/बहीण | चिरंजीव .. यांस अनेक आशीर्वाद | तुझा / तुझी |
| 5. | मित्र / मैत्रीण | प्रिय मित्र/ मैत्रीण .. ह्यास / हीस.. सप्रेम नमस्कार | तुझा/ तुझी |

©KTBS Not to be republished

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | सन्माननीय व्यक्ती | माननीय... यांना सा. न.वि. वि. | आपला नम्र / आपली नम्र |
| 7. | अधिकारी | प्रति (हुद्दा, संस्थेचे नाव) महोदय | आपला/आपली विश्वासू |

**(क) मजकूर**

पत्रातील मुख्य आशय यात लिहावा तो सुस्पष्ट, नेमका असावा.

**(ड) समारोप व स्वाक्षरी**

'कळावे ही विनंती' असे लिहून, खालच्या ओळीत 'आपला / तुझा' लिहून त्याखाली आपली सही करावी.

**(इ) ज्याला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता, पिनकोडसह**

पत्राच्या खाली डाव्या कोपऱ्यात ज्याला पत्र पाठवायचे आहे, त्याचा पत्ता मोजक्या शब्दात व चांगल्या अक्षरात लिहावा. पत्ता लिहिताना नाव, घरनंबर, विभाग, गाव, तालुका, जिल्हा, पिनकोड नंबर या गोष्टी लिहिणे आवश्यक असते.

उदा : श्री प. फ.ब
3288 'माहेर' बंगला
जागृती नगर, पुणे
पिन - 490032.

**पत्रलेखनात दोन महत्त्वाचे प्रकार आहेत.**

1. कौटुंबिक पत्रे
2. सामाजिक किंवा व्यावसायिक पत्रे

कौटुंबिक पत्राचे विषय व सामाजिक पत्रांचे विषय वेगळे असतात. विषयानुसार पत्राचा मजकूर कमी-जास्त होऊ शकतो. पत्र लिहिताना ते आटोपशीर असावे परंतु विषयाचा पूर्ण खुलासा करणारे असावे याकडे लक्ष दिले पाहिजे.

परीक्षेसाठी पत्र लिहिताना तांत्रिक बाबीकडे लक्ष द्यावे. विरामचिन्हे योग्यरीतीने द्यावीत. त्याला स्वतंत्र गुण असतात. परीक्षेत पत्र लिहिताना लिहिणाऱ्याने आपल्या नावाचा उल्लेख करू नये.

नमुन्यादाखल एक घरगुती पत्र दिले आहे.

Not to be republished ©KTBS

## 2. कौटुंबिक किंवा घरगुती पत्र

दहावीचा अभ्यास कसा चालला आहे, हे थोडक्यात पत्राने मित्रास कळवा.

अ.ब.क
सरोज निवास,
घ.नं. 3228

गुरुवार पेठ, पुणे,
पिन - 4992006.

दि. 16-3-12

प्रिय मित्र सुयश यास,

सप्रेम नमस्कार वि.वि.

तुझे पत्र मिळाले, वाचून आनंद झाला. सध्या माझा दहावीचा अभ्यास सुरू आहे. पुढच्याच आठवड्यात माझी प्रथम सराव परीक्षा आहे. या परीक्षेत पहिला नंबर प्राप्त करण्याचा माझा दृढनिश्चय आहे. म्हणून इतर कोणत्याही कारणास्तव वेळ वाया न घालवता अभ्यासच करत आहे. कंटाळा आलाच तर फिरणे व थोडे खेळणे एवढेच करत आहे. झालेल्या सहामाही परीक्षेत सहा गुण कमी पडले आणि माझा प्रथम क्रमांक आला नाही. पण यावेळी निश्चित येईल, निकाल लागताच तुला पत्राने कळवेन. परीक्षेनंतर मला बाबा मुंबईला नेणार आहेत व तेथील प्रेक्षणीय स्थळे मला पहायला मिळणार आहेत. केव्हा एकदाची सुट्टी होते असे मला झाले आहे. तुझा अभ्यास कसा काय चालला आहे ते कळव.

**तुझा मित्र**

**ओंकार**

पत्ता :
प.फ.भ
सुगम निवास
घ.न 892, नेहरू चौक
सोलापूर,
पिन - 440059

©KTBS Not to be republished

## रजा अर्ज

नमुन्यादाखल एक रजेचा अर्ज दिला आहे. विद्यार्थी आजारी आहे. त्यासाठी त्याने वर्गशिक्षकाकडे रजेचा अर्ज केलेला आहे.

अ.ब.क
ह.क्र. 21, नववी 'अ'
गांधी विद्यालय,
धारवाड

13 जुलै 2013

प्रति

माननीय वर्गशिक्षक

नववी 'अ'

गांधी विद्यालय, धारवाड.

**विषय : चार दिवसांची रजा मंजूर करून घेणेबाबत**

महोदय,

आता अर्ज करण्यास कारण की, मी तापाने फारच आजारी आहे. डॉक्टरांनी मला विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. तरी मला 13 जुलै 2013 ते 16 जुलै 2013 पर्यंत चार दिवसांची रजा मंजूर करावी ही नम्र विनंती. शाळेत हजर झाल्यानंतर अपूर्ण राहिलेला सर्व अभ्यास पूर्ण करीन, अशी खात्री देतो.

कळावे

आपला

आज्ञाधारक विद्यार्थी

अ.ब.क.

पालकांची सही.

©KTBS Not to be republished

## आमंत्रणपत्रिका

आमंत्रणपत्रिका तयार करणे हे कौशल्यपूर्ण काम असते. त्याचे स्वतः चे असे एक मांडणी तंत्र असते. कौटुंबिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन क्षेत्रामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या विविध समारंभानिमित्त आमंत्रण पत्रिका छापल्या जातात. त्याचा एक नमुना खाली दिला आहे.

### स्नेह संमेलनाची आमंत्रण पत्रिका

सौ. व श्री ...............

सप्रेम नमस्कार विनंती विशेष,

आमच्या शारदा विद्यालयामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ दि. 28 डिसेंबर 2013 रोजी आयोजित केला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. जिल्हाशिक्षणाधिकारी.... हे आहे

तसेच आमच्या शिक्षण सेवा मंडळाचे अध्यक्ष मा. ........ हे अध्यक्षपद भूषविणार आहेत. तरी आपण सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित रहावे. ही नम्र विनंती.

दि. 28 डिसेंबर 2013
वेळ - दुपारी 3 ते 6 वा.
स्थळ - शारदा महाविद्यालयाचे प्रांगण

आपले नम्र

विद्यार्थी प्रतिनिधी विद्यार्थीनी प्रतिनिधी सांस्कृतिक विभाग प्रमुख मुख्याध्यापक

©KTBS Not to be republished

## नोकरीसाठी अर्ज

शासकीय, खाजगी संस्थामध्ये नोकरी मिळविण्यासाठी अर्ज करावा लागतो. काही संस्था विशिष्ट स्वरूपात छापलेल्या अर्जाचा स्वीकार करतात. पण अनेक ठिकाणी उमेदवाराने स्वहस्ते लिहिलेल्या अर्जाचा स्वीकार केला जातो. अर्जलेखन व मजकुराची मांडणी हे कौशल्य असते. अशा अर्जात स्वतःविषयी संपूर्ण माहिती स्पष्टपणे, अचूकपणे लिहिणे आवश्यक आहे. की ज्यातून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव जाणवेल असे लेखन असावे. अर्जात चुकीचे लेखन किंवा त्यामध्ये अतिशयोक्ती असू नये.

नोकरीसाठी अर्ज करताना खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात.

(1) अर्जदाराचे नाव, पत्ता व तारीख कागदाच्या वरील बाजूस आपल्या उजवीकडे असावा.

(2) नोकरी देणाऱ्या संस्थेचे नाव म्हणजेच त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या पदनामाने (अध्यक्ष/सचिव /व्यवस्थापक/मुख्याध्यापक/ प्राचार्य) मूळ पत्त्यासह स्पष्ट लिहावा.

(3) पत्रांचा विषय स्पष्टपणे निर्दिष्ट करावा.

(4) 'महोदय' या आदरार्थी संबोधनाने पत्राची सुरुवात करावी.

(5) अर्जाच्या मजकुरात नोकरीसाठी जाहिरात कोठे प्रसिद्ध झाली त्याचा संदर्भ द्यावा. किंवा रिक्त पदाविषयी कोणत्या माध्यमाद्वारे माहिती समजली त्याचा संदर्भ दिला जावा.

(6) वय आणि शैक्षणिक पात्रता यासंबंधी माहिती नीट लिहावी.

(7) अनुभव व त्यांसंबंधी प्रमाणपत्र याची माहिती लिहिली असेल तर ती प्रमाणपत्रे सोबत जोडलेली आहेत. अशी नोंद करावी.

(8) नियुक्ती झाल्यास प्रामाणिकपणे काम करण्याची ग्वाही द्यावी.

(9) शेवटी 'आपला विश्वासू' असे लिहून सही करावी व नाव लिहावे.

(10) डाव्या बाजूला स्थळ आणि तारीख यांचा उल्लेख करावा.

### नमुना : नोकरीसाठी अर्ज

श्री अ. ब. क. रा. गोधीळी ता. खानापूर जि. बेळगाव हे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, बेळगाव या संस्थेत मराठी विषय शिक्षक पदासाठी अर्ज करीत आहेत. त्या अर्जाचा नमुना पुढील प्रमाणे -

नाव अ ब क<br>
रा. गोधोळी ता. खानापूर<br>
जि. बेळगाव<br>
दि. 23-5-2013

©KTBS Not to be republished

प्रति

मा. मुख्याध्यापक

कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय

बेळगाव

**विषय : मराठी विषय शिक्षक पदासाठी अर्ज**

**संदर्भ : दैनिक सुप्रभात मधील दि. 13-5-2013 जाहिरात**

महोदय,

आपल्या शाळेत शिक्षकांच्या रिक्त जागा भरावयाच्या आहेत. त्याबद्दलची जाहिरात दैनिक सुप्रभातच्या 13-5-2013 च्या अंकात वाचली. जाहिरात पाहून मी मराठी शिक्षकाच्या जागेसाठी अर्ज करीत आहे.

**माझी वैयक्तिक माहिती खालील प्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | संपूर्ण नाव | : | अ. ब. क |
| (2) | पत्ता | : | रा. गोधोळी, ता. खानापूर. जि. बेळगाव, |
| (3) | जन्मतारीख | : | 25-7-1987 |

**माझी शैक्षणिक पात्रता खालील प्रमाणे आहे.**

(1) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा बेंगळूर - 2005 - 74% गुण

(2) बी.ए. कर्नाटक विद्यापीठ, धारवाड - 2008 - 78% गुण

(3) बी.एड्. कर्नाटक विद्यापीठ, धारवाड - 2009 - 75% गुण

(4) एम.ए. कर्नाटक विद्यापीठ, धारवाड - 2012 - 70% गुण

आपल्या शाळेत मला शिक्षकाची नोकरी दिल्यास मी प्रामाणिकपणे व निष्ठेने अध्यापनाचे कार्य करीन, तरी मला नोकरीची संधी द्यावी, ही नम्र विनंती.

कळावे

स्थळ : गोधोळी आपला विश्वासू

दिनांक : 23-5-13 अ.ब.क.

© KTBS Not to be republished

सोबत जोडलेल्या प्रमाणित प्रती :

(1) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा गुणपत्रक

(2) बी.ए. गुणपत्रक

(3) बी. एड्. गुणपत्रक

(4) एम. ए. गुणपत्रक

मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

**आकलन**

लेखन कौशल्यांशी संबंधित असलेल्या आणि विद्यार्थ्यांची 'आकलनक्षमता' विकसित करणारा हा प्रकार आहे. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या गद्य व पद्य उताऱ्याचे आकलन पडताळून पाहण्यासाठी 'उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे' लिहिण्यास सांगितले जाते. यालाच उताऱ्याचे आकलन असे म्हणतात. त्यासाठी दिलेला उतारा विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वाचावा. मध्यवर्ती आशय नीट समजून घ्यावा. प्रश्नांचा अर्थ लक्षात घेऊन उत्तरे आपल्या भाषेत समर्पक अशी लिहावीत. भाषेचे कौशल्य, शब्दाचा वापर, वाक्याची मांडणी व नेमके उत्तर यातून दिलेल्या उताऱ्याचे विद्यार्थ्यांस किती आकलन झाले आहे हे त्यावरून कळते.

नमुना उतारा : (1)

पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

सामाजिक भावना हा विकसनशील मानवी जीवनाचा आत्मा आहे. ही भावना नेहमी तीन प्रकारांनी प्रकट होते. शब्दांनी, अश्रूंनी आणि कृतींनी. 'काव्य' हे भावनेचे पहिले सुंदर स्वरुप पण काव्यातील शब्द कितीही सुंदर असले तरी शेवटी ते वाऱ्यावरच विरून जातात. 'अश्रू' हे भावनेचे दुसरे रूप ! पण माणसाच्या क्षुब्ध हृदयसागरातून बाहेर येणारे हे मोती शेवटी मातीमोलच ठरतात. डोळ्यातल्या पाण्याने मनुष्य स्वतःच्या हृदयातील आग सुद्धा शांत करू शकत नाही. मग जगातला वणवा तो काय विझवणार? सभोवतालचे दुःख पाहून व्याकूळ झालेले माणसाचे मन हलके करण्यापलिकडे शब्द आणि अश्रू यांच्यात सामर्थ्य असत नाही.

या भावनेचे तिसरे स्वरूप म्हणजे 'कृती' जे मानवी प्रगतीला उपकारक होऊ शकते. या स्वरूपात ती तोंडाने किंवा डोळ्यांनी बोलत नाही. ती नेहमी हातानेच बोलते. स्वतःचे रक्त शिंपून ती इतरांचे जीवन फुलविते.

शब्द, अश्रू आणि रक्त ! तिघांच्या उगमाचे स्थान एकच पण त्याची जगे किती भिन्न.

**लेखक : वि.स. खांडेकर**

©KTBS Not to be republished

प्रश्न :

(1) विकसनशील मानवी जीवनाचा आत्मा कोणता आहे?

(2) भावना कोणत्या तीन प्रकारांनी व्यक्त होतात?

(3) मनुष्य डोळ्यातल्या पाण्याने काय शांत करू शकत नाही?

(4) मानवी प्रगतीला काय उपकारक ठरते?

(5) वरील उताऱ्यास योग्य ते शीर्षक द्या.

**उतारा (2)**

हास्य ही जीवनाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. वाङ्मयामध्ये त्याला रसाचे स्थान प्राप्त झाले आहे. शब्दांच्या योजनेने हास्यरस निर्माण करणे ह्याला विनोद म्हणतात. सुशिक्षित अन सुसंस्कृत माणसांच्या समाजात आणि वाङ्मयात विनोदाला फार मोठी प्रतिष्ठा आहे. किंबहुना विनोदबुद्धी असणे हे संस्कृतीचे लक्षण समजले जाते. विनोद हा काही नुसता शब्दांचा खेळ नाही. ती जीवनाकडे पाहण्याची एक विशाल दृष्टी आहे. व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बुद्धीचा विकास झाल्यावाचून ही दृष्टी त्यांना प्राप्त होत नाही. ज्या समाजात व्यक्तीला संपूर्ण स्वातंत्र्य आहे, त्या समाजात तारुण्याचे वातावरण उत्पन्न होते; खेळ, कला, उत्सव याची वाढ होते; आणि सामाजिक जीवन समृद्ध होते. आशावादित्व, औदार्य, खेळाडूपणा आणि सहानुभूती ह्या सद्‌गुणांचा अशा समाजात विकास होतो आणि मग त्यामधून विनोदाचे तत्त्वज्ञान निर्माण होते. विनोद हा इंग्रज आणि अमेरिकन लोकांच्या जीवनाचा तर एक स्थायीभाव होऊन बसलेला आहे. ज्या समाजात व्यक्तीला स्वातंत्र्य नाही, किंबहुना समाजाच्या हितासाठी किंवा सुरक्षेसाठी व्यक्तीचे स्वातंत्र्य नियमांनी, रूढींनी आणि कायद्यांनी ज्या समाजात मर्यादित केलेले असते, त्या समाजात विनोदाची वाढ होऊ शकत नाही.

**आचार्य प्र. के. अत्रे**

प्रश्न :

(1) विनोद कशाला म्हटले जाते?

(2) विनोदाला फार मोठी प्रतिष्ठा कशात आहे?

(3) सद्‌गुणांचा विकास कोणत्या समाजात होतो?

(4) विनोदाची वाढ कोणत्या समाजात होत नाही?

(5) वरील उताऱ्यास योग्य शीर्षक लिहा.

©KTBS Not to be republished

## भित्तीपत्रक

शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यातील एक उपक्रम म्हणजे भित्तीपत्रक होय. हा उपक्रम विद्यार्थी व शिक्षकांनी मिळून करावयाचा आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या विविध सुप्त कलागुणांना संधी मिळावी त्यातून भाषाकौशल्याचा विकास व्हावा हा हेतू आहे. निबंध लेखन, घोषवाक्ये, चित्रे आणि माहिती विद्यार्थ्यांकडून घेणे आणि ती शाळेच्या योग्य ठिकाणी प्रदर्शित करणे. या उपक्रमामुळे ज्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला आहे त्यांना प्रोत्साहन मिळेल. आणि भित्तीपत्रकातील माहितीचा व ज्ञानाचा विद्यार्थ्यांना उपयोग होईल.

**उदा :**

(1) पाच जून पर्यावरण दिन : या दिनाच्या अगोदर विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयाबद्दल माहिती संकलन करण्यास सांगणे.

(अ) पर्यावरणासंबंधी विविध स्वरूपात चित्रे काढणे.

(आ) पर्यावरणातील समस्या व त्यावर उपाय यावर लेखन करण्यास सांगणे.

(इ) पर्यावरणासंबंधी घोषवाक्ये तयार करण्यास सांगणे

(ई) पर्यावरणाविषयी काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचे संकलन करणे.

अशा विविध स्वरूपात विद्यार्थ्यांकडून संकलन करवून घेणे व पर्यावरण दिनानिमित्त योग्य ठिकाणी व सर्वांना वाचता येईल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे.

**खालील दिलेल्या विषयांवर आपल्या शाळेत विविध उपक्रम राबवावेत :**

(1) 31 मे व्यसनमुक्ती दिन.

(2) 5 जून जागतिक पर्यावरण दिन.

(3) 7 जुलै वनमहोत्सव दिन.

(4) 11 जुलै जागतिक लोकसंख्या दिन.

(5) 2 आक्टोबर महात्मा गांधी जयंती.

(6) 1 डिसेंबर एड्स दिन.

Not to be republished ©KTBS

# शब्दसंग्रह

## अ

अनुरागे - प्रेमाने

अप्रमत्त - नम्र

अवगणना - निंदा

अखंड - खंड नसलेला

अनर्थ - संकट

अस्त्र - मंत्रोच्चाराने उगारण्याचे हत्यार

अधाशी - हावरट

अधम - नीच

अपरिचित - अनोळखी

अनामिक - नाव नसलेले

## आ

आपंगिले - आपला म्हटले

आबाळ होणे - हेळसांड होणे.

आदाब - वंदन, मुजरा

आरसपानी - स्वच्छ, पारदर्शी

आरती - स्तुती

## इ

इंगळ - मोठा विंचू

## उ

उलाढाली - उचापती, उपद्‌व्याप

उद्विग्न - हताश, निराश

उद्‌धृत - सांगणे

उत्कर्ष - भरभराट

## ऊ

ऊहापोह - चर्चा

## ऋ

ऋण - उपकार

## ओ

ओशाळणे - लज्जित होणे.

## क

कपी - वानर, प्राणी

कंजूष - कृपण

कलत्र - पत्नी

कवाड - दार

कलागत - भांडण

कटवले जाणे - दूर करणे

कासे - कमरेला

कालवा - गर्दी

कैवारी - संकट मुक्त करणारा

## ख

खीरारी - गुराखी

खुराक - खाद्य

खुशामत - स्तुती

## ग

गढी - लहान किल्ला

गीताख्य - भगवद्‌गीतेने सांगितलेले

गुर्मी - मगरूरी

गोत्यात - संकटात

©KTBS Not to be republished

**च**

चडकणा - हाताचा प्रहार करून

चित्ती - मनात

चोखंदळ - चिकित्सक

**ज**

जबानी - तोंडी हकीकत

जलद - ढग, मेघ

जाच - त्रास

**ठ**

ठाम - दृढ

**ड**

डाफरणे - रागावणे

**ढ**

ढाळणे - खाली टाकणे

**त**

तळुसुति - कंबरकसून

ताटी - दरवाजा

तांबूल - विडा

तालीम - सराव

**द**

दखल घेणे - लक्ष देणे

दरवेशी - अस्वलाचा खेळ दाखविणारा

दारा - पत्नी

दुर्मंत्री - दुष्ट स्वार्थी मंत्री

द्योतक - प्रतीक

**न**

नलिनी - कमळ

निखारा - विस्तव

निज - स्वत:चा

नियंता - नियंत्रण ठेवणारा

निर्विकार - आकार नसलेले

नेक - सरळपणा

नौबद - नगारा

**प**

पराव्या कारणे - दुसऱ्याच्या कल्याणासाठी

पाकालय - स्वयंपाकघर

पांद - लहान वाट

पार्थ - अर्जुन

पिंड बांधणे - जखम बांधणे

पोया - पोळा

प्रगल्भता - परिपक्वता

प्रेषित - अनुयायी

**ब**

बळीराजा - शेतकरी

बिकट - कठीण

बिलाकसूर - बिनचूक

बैरागी - संन्यासी, साधु

बोज - रुबाब, मान

बोली - वाणी

**भ**

भुजबळा - बाहुसामर्थ्याने

©KTBS Not to be republished

**म**

मगदूल - खाऊन सुस्त होणे

महत्ता - महत्त्व, मोठेपणा

मा - लक्ष्मी

माथा - कपाळ

माधव - श्रीकृष्ण

मुकिया - मुका

मैफल - संगीत सभा

मोकलिती - दूरकरणे

मोगरी - लाकडी हातोडा

**य**

यती - साधु

येरगटणे - गुरफटणे

**र**

राव - राजा

रास - ढीग

**ल**

लंघन - उपवास

**व**

वटपत्र - वडाचे झाड

वध - ठार मारणे

वर्धिष्णु - वाढणारा

वर्म - उणीव असलेली गोष्ट

वसनागार - कपडे ठेवण्याची जागा

वाचा - बोलणे

वात्सल्य - प्रेम, माया

विदेह - देहरहित

विभव - संपत्ती

वियोग - ताटातूट

व्यय - खर्च

**श**

शक्कल - युक्ती

शेज - अंथरूण, शय्या

**स**

सत्यार्थ - सत्यासाठी

संतती - मुलेबाळे

सन्मती - चांगली बुद्धी

सन्मौक्तिक - सुंदर मोती

सा - ती (सर्वनाम)

सायरन - धोक्याची सूचना देणारा भोंगा

सिंधु - सागर, समुद्र

सीवारु - रानात

स्फुरण - स्फूर्ति

**ह**

हवाला - ताबा

हिमायत - पाठबळ, आश्रय

हेका - हट्ट, निश्चय

हेंडालू - झोंबाझोंबी

©KTBS Not to be republished